# लोकराज्य

जानेवारी २०१७ / पाने ६० / किंमत ₹१०



अतिथी देवो भव:

२०१७

## व्हिजिट महाराष्ट्र

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण विभाग



**मा. नरेंद्र मोदी**

मा. पंतप्रधान, भारत सरकार



**श्री. देवेंद्र फडणवीस**

मा. मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य



**श्री.विनोद तावडे**

मा.मंत्री, शालेय शिक्षण
महाराष्ट्र राज्य

# गुणवत्तेचं सरकार... कामगिरी दमदार !

राज्य शैक्षणिक गुणवत्तेत देशात क्रमवारीत पहिल्या तीनमध्ये आणण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची सुरवात.

राज्यातील १०० टक्के विद्यार्थ्यांची नावानिशी, शिक्षक, शाळा व संस्थांची माहिती सरल या संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध.

राज्यातील इयत्ता ८ वी पर्यंतच्या १.६१ कोटी विद्यार्थ्यांची वर्षभरातून तीनवेळा चाचणी.

राज्यात १०० टक्के विद्यार्थी प्रगत असलेल्या १९,७९४ शाळा- लोकसहभागातून शाळांना रु.१७३ कोटी निधी उपलब्ध

तंत्रस्नेही चळवळीतून २५,७७४ डिजीटल शाळांची उभारणी. मार्च - २०१७ अखेर राज्यातील सर्व शाळांमधील प्रत्येक वर्ग डिजीटल करण्याचे नियोजन.

तंत्रस्नेही शिक्षकांकडून २,३०६ शैक्षणिक ॲप्स्, ४४,४५६ शैक्षणिक व्हिडीओज् व १,९९२ संकेतस्थळ / ब्लॉगज्ची निर्मिती.

दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त ९ कोटी पुस्तकांचे विद्यार्थ्यांकडून वाचन

इयत्ता १० वी मध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य सेतू कार्यक्रम.

शैक्षणिक गुणवत्ता उत्कृष्ट असणाऱ्या मराठी शाळांमध्ये १४,००० विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून पुर्नप्रवेशित.

शिक्षकांच्या समृद्धिकरणासाठी शिक्षणाच्या वारीचे आयोजन.

१० आदिवासी बोलीभाषांमधील द्विभाषिक पुस्तकांची निर्मिती.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचविण्यासाठी इयत्ता १० वी व १२ वी ची फेरपरीक्षा

राज्यातील इयत्ता १० वी च्या सर्व १६ लाख विद्यार्थ्यांची कलमापन चाचणी व व्यवसाय मार्गदर्शन.

दफ्तराचे ओझे कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींचा लाभ.

८,००० माध्यमिक शाळांमध्ये ICT योजना.

इंग्रजी समृद्धिकरणासाठी तेजस कार्यक्रम.

गणित समृद्धिकरणासाठी गणिताचार्य भास्कराचार्य कार्यक्रम.

राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० दिपस्तंभ शाळा स्थापन करण्याचे नियोजन.

ज्ञानदीप मिटवी अंधार

शिक्षणाचा अधिकार


सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

पढ़े चलो, बढ़े चलो

RASHTRIYA MADHYAMIK SHIKSHA ABHIYAN

**६ चला, महाराष्ट्र बघू या...**



महाराष्ट्राला ७२० किमी. लांबीचा विशाल समुद्रकिनारा लाभलेला आहे तर ५ राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये व ४५ वनउद्याने आणि अनेक धर्मांची तीर्थस्थाने इत्यादींमुळे महाराष्ट्र पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे.

**१२ अमर्याद आणि मनमोहक**



मनामनांमध्ये पर्यटन संस्कृती रुजवून ती विकसित करण्यावर सर्वाधिक भर राज्याच्या पर्यटन विभागाचा राहील, असे सांगताहेत राज्याचे पर्यटन तथा रोजगार हमी योजना मंत्री जयकुमार रावल.

**१६ महाराष्ट्र अनलिमिटेड...**



महाराष्ट्राच्या पर्यटनवृद्धी योजनांना केंद्र सरकार संपूर्ण साहाय्य व प्रोत्साहन देत असल्याचे सांगताहेत केंद्रीय पर्यटन विकास मंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. महेश शर्मा.

**१८ माझा महाराष्ट्र, मस्त महाराष्ट्र**

महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांना मोठ्या प्रमाणावर देश-विदेशातील पर्यटक भेट देत असतात. यापैकी काही महत्त्वाच्या पर्यटनस्थळांची माहिती. महाराष्ट्राचा पर्यटन दौरा आखण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरेल.



**३२ ग्रामीण संस्कृतीचा आस्वाद**

भटकंतीला जाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पर्यटनामध्ये धार्मिक पर्यटनाबरोबरच अलीकडे झपाट्याने विकसित होणाऱ्या कृषी पर्यटनाचा अग्रक्रम लागतो.



**३४ या, बघा, आनंदी व्हा...**

महाराष्ट्र राज्य १७ टक्के वनांनी नटलेला आहे. आपल्या राज्यात तब्बल ५७ अभयारण्य आणि ताडोबा-अंधारी, पेंच, मेळघाट, सह्याद्री, नवेगाव-नागझिरा, बोर असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत.



**३८ दुर्ग भ्रमंती**



जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांना स्थान मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न सुरू केले आहेत.

**४२ अशी घ्या काळजी...**



पर्यटनाचा आनंद घेताना पूर्वतयारी करणे अत्यंत महत्त्वाचे असते. नियोजन चुकले तर पर्यटनाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे पर्यटनाला जाताना कोणत्या बाबी आवश्यक आहेत, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**४४ स्मार्ट डिजिटल व्हिलेज**



देशातील पहिले स्मार्ट डिजिटल व्हिलेज होण्याचा मान आपल्या राज्यातील हरिसालला मिळाला आहे. तंत्रज्ञानाच्या वापरातून या गावात जणू डिजिटल युगाची क्रांती झाली आहे.

**४६ महा-वॉलेट**

येत्या दोन महिन्यात संपूर्ण कॅशलेस व्यवहारासाठी प्रयत्न करण्यात येत असून त्यासाठी रोडमॅप तयार करण्यात आला आहे. राज्यातील नागरिकांना आर्थिक व्यवहार मोबाइलच्या माध्यमातून करता यावा यासाठी 'महावॉलेट' सुरू केले जाईल. असे ई-वॉलेट सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

**५० आता करा, रोखीला टाटा...**

चलन रद्द करण्याचा निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेला पोषक ठरणार आहे. आजवर समांतर चालत असलेल्या काळ्या पैशाच्या अर्थव्यवस्थेला यामुळे तडा गेला आहे.

**५४ सुरक्षेचा मूलमंत्र**

विद्युत सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्या अनुषंगाने ११ ते १७ जानेवारी २०१७ या कालावधीत राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताह राबवला जात आहे.

**५६ शूरता आणि सुप्रशासनाचे प्रेरणास्थळ**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकाचे भूमिपूजन व जलपूजन आणि विविध विकास कामांचे भूमिपूजन नुकतेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले.

वर्ष ६८ वे | अंक ७ | जानेवारी २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | ब्रिजेश सिंह |
| संपादक मंडळ | अजय अंबेकर<br>देवेंद्र भुजबळ<br>शिवाजी मानकर |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रवीण टाके |
| उपसंपादक | गजानन पाटील<br>राजाराम देवकर |

## प्रशासन

| | |
|---|---|
| प्रशासन अधिकारी | मीनल जोगळेकर |
| वितरण | अश्विनी पुजारी |
| साहाय्य | भारती वाघ |

## मांडणी

| | |
|---|---|
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रण | प्री मीडिया<br>सर्व्हिसेस प्रा. लि.<br>महापे, नवी मुंबई. |

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

शुभवर्तमान

# थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र पुन्हा अव्वल

महाराष्ट्र शासनाच्या सातत्य व नियोजनपूर्ण प्रयत्नांमुळे आपले राज्य पुन्हा एकदा थेट परकीय गुंतवणुकीत आघाडीचे ठरले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यात राज्यात ६८ हजार ४०१ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. देशातील एकूण १ लाख ४४ हजार ६७४ कोटी रुपये इतक्या गुंतवणुकीपैकी ४७.२५ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे.

परकीय गुंतवणुकीत ४७.२५ टक्के गुंतवणूक आकर्षित करून आघाडीचे स्थान मिळवतानाच महाराष्ट्राने तामिळनाडू (२.८६ टक्के), कर्नाटक (४.९७ टक्के), गुजरात (१.७० टक्के) आणि आंध्रप्रदेश (४.९८ टक्के) या राज्यांना मागे टाकले . 'मेक इन महाराष्ट्र' तसेच अन्य मार्गांद्वारे राज्य सरकारने थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, गेल्या दोन वर्षात केलेल्या प्रयत्नांचे यश आता दिसत आहे. महाराष्ट्राबद्दल गुंतवणूकदारांमध्ये विश्वास वाढत असल्याचे हे द्योतक आहे.




वर्ष २०१४-१५ मध्ये राज्यात ३८ हजार ९३३ कोटींची गुंतवणूक झाली होती तर २०१५-१६ मध्ये राज्यात ६२ हजार ७३१ कोटींची गुंतवणूक झाली होती. २०१६-१७ या चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यात राज्याने २०१५-१६ मधील एकूण गुंतवणुकीचा टप्पा पार केला आहे, हे विशेष उल्लेखनीय. ही गुंतवणूक प्रामुख्याने सेवा क्षेत्र (१८ टक्के), नगरविकास, गृहनिर्माण, पायाभूत सुविधांची निर्मिती (८ टक्के), संगणक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर (७ टक्के) तर टेलिकम्युनिकेशन क्षेत्रात ७ टक्के अशा प्रमाणात झाली आहे. फेब्रुवारी २०१६ मध्ये झालेल्या मेक इन इंडिया सप्ताहानंतर राज्यातील गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले असून उद्योगातील सुलभीकरणासाठी (इज ऑफ डुइंग बिझनेस) केंद्र व राज्य शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांचे हे फलित आहे.



राज्यात उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी विशेषत: जमीन, पर्यावरण, वीज इत्यादी बाबतीत साधारण ४८ सुधारणा करण्यात आल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वस्त्रोद्योग, किरकोळ विक्री इत्यादी क्षेत्रात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले. गुंतवणूकदारांना सर्व परवाने एकाच ठिकाणी मिळण्याच्या दृष्टीने 'मैत्री' अंतर्गत एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. हे परवाने त्यांना वेळेत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सेवा हक्क कायद्यांतर्गत त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

# महाराष्ट्राची नाममुद्रा

महाराष्ट्र हा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेला प्रदेश आहे. येथील जनजीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राला समृद्ध असा सागरकिनारा आणि वनसंपत्ती लाभली आहे. यात वैविध्यपूर्ण जीवसृष्टी आहे. अतिशय समृद्ध जैवविविधता असलेले महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य आहे.

महाराष्ट्रात असंख्य गड, किल्ले, जलदुर्ग, वस्तुसंग्रहालये, लेण्या, विविध धर्मीयांची प्रार्थनास्थळे आहेत. मनोरंजनाची राजधानी समजल्या जाणाऱ्या मुंबईचे आकर्षण जगभरातील पर्यटकांना कायम राहिले आहे. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय चांगली असल्याने इथे सामाजिक शांतता, सहिष्णुता उत्तम प्रकारची आहे. त्यामुळेच आज महाराष्ट्र हे देशविदेशातील नागरिक, पर्यटक, अभ्यासक, व्यावसायिक, उद्योजक, विद्यार्थी आणि रुग्ण यांना आकर्षित करत आहे. या आकर्षणातून महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाला चालना आणि गती प्राप्त झाली आहे.

कोणत्याही प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्याची क्षमता पर्यटन व्यवसायात आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन 'व्हिजिट महाराष्ट्र २०१७' हा अभिनव उपक्रम राबवत आहे. या कालावधीत अधिकाधिक पर्यटकांनी महाराष्ट्रात यावे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पर्यटनाच्या जागतिक क्षितिजावर महाराष्ट्राची मुद्रा उमटवण्याचा निर्धार राज्य शासनाने केला आहे. याच अनुषंगाने आपल्या राज्यात असलेल्या पर्यटनाच्या अपार संधींचा आढावा आम्ही जानेवारीच्या अंकात विशेषकांच्या स्वरूपात घेतला आहे.

निश्चलीकरणानंतर नागरिकांनी मोठ्या संख्येने कॅशलेस व्यवहाराकडे वळावे, यासाठी राज्य आणि केंद्र शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्र सरकारने कॅशलेस धोरण जाहीर करून रोखरहित अर्थव्यवहारास गती मिळावी यासाठी ठोस पावले उचलली आहेत. केंद्र शासनाने कॅशलेस व्यवहारांवर अनेक प्रकारच्या योजना जाहीर केल्या आहेत. त्या सर्वांचा आम्ही या अंकात विस्तृतरीत्या आढावा घेतला असून धसई आणि चामोर्शी या कॅशलेस गावांची यशकथा समाविष्ट केली आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत सध्या 'लोकराज्य' (मराठी व उर्दू), 'महाराष्ट्र अहेड' (इंग्रजी) आणि 'आपलं मंत्रालय' ही नियतकालिके प्रकाशित केली जातात. या महिन्यापासून लोकराज्यची हिंदी आणि गुजराथी ही दोन नवी भावंडे वाचकांच्या सेवेत दाखल होत आहेत. हिंदी आणि गुजराथी भाषिक नागरिकांना शासनाच्या विविध योजना, धोरण, निर्णय यांची प्रभावीरीत्या माहिती होईल. स्वत:चे जीवन आणखी समृद्ध करण्यासाठी या दोन नियतकालिकांचा त्यांना उपयोग होईल.

आमचे सर्व वाचक, वर्गणीदार, ग्राहक, विक्रेते आणि लेखक यांना नववर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

अतिथी देवो भव:
२०१७
व्हिजिट महाराष्ट्र

ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)

# चला, महाराष्ट्र बघू या...





हिमाच्छादित शिखरे सोडली तर महाराष्ट्रात अमर्याद पर्यटन क्षमता आहे. अनेक प्राचीन वास्तू आणि निसर्गाचे लेणे महाराष्ट्राला लाभलेले आहे. जागतिक वारसा वास्तू म्हणून प्रसिद्ध असलेल्या अजिंठा-वेरूळ-एलिफंटा लेणी तसेच भुईकोट, गड आणि सागर किल्ले याच भूमीवर आहेत. ७२० किमी. लांबीचा विशाल समुद्रकिनारा लाभलेला आहे. ५ राष्ट्रीय उद्याने, अनेक अभयारण्ये, ४५ वनउद्याने आणि विविध धर्मांची तीर्थस्थाने इत्यादींमुळे महाराष्ट्र पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे. येथील अनेक उत्सव, कला, संस्कृती, विविध खाद्यपदार्थ पर्यटकांना आकर्षित करतात.



महाराष्ट्र राज्य हे निसर्ग समृद्ध राज्य असून, येथे पर्यटनाला वाव आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून पर्यटन वृद्धीसाठी



अनेक योजनांची अंमलबजावणी होत आहे. २०१७ हे वर्ष व्हिजिट महाराष्ट्र इयर म्हणून साजरे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात जगभरातील पर्यटक, गुंतवणूकदार, टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स प्रतिनिधींच्या सहभागामुळे पर्यटनविषयक उपक्रमांना चालना

मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील पर्यटनस्थळे वैविध्यपूर्ण असल्यामुळे पर्यटन विकासाला विकासाला मोठा वाव आहे. परकीय चलन मोठ्या प्रमाणावर मिळवून देणारा आणि रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असणारा पर्यटन हा वेगाने वाढणारा व्यवसाय आहे. राज्याने केंद्र शासनाच्या संस्था, पर्यटन संस्था व प्रवासी संस्था यांच्या प्रतिनिधींबरोबर विचार विनिमय करून पर्यटन विकास विषयक धोरण तयार केले आहे.



महाराष्ट्राला केवळ भारतातीलच नव्हे, तर दक्षिण आशियातील प्रमुख पर्यटन केंद्र तसेच मुंबई शहराला दक्षिण आशियाचे प्रादेशिक केंद्र बनवण्यासाठी शासनाने अनेक योजना हाती घेतल्या आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे सध्या ७७ पर्यटक निवास व्यवस्था आहेत. यातील काही पर्यटक निवासस्थाने खाजगी उद्योजकांना चालवण्यात देण्यात आलेली आहेत.

पर्यटक निवासस्थानाच्या आरक्षणासाठी खाजगी व्यक्ती/संस्था यांनाही 'अभिकर्ते' म्हणून नेमण्यात आले आहेत.




महामंडळाच्या संकेतस्थळावरून पर्यटक निवासाच्या आरक्षणाकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### पर्यटन धोरण



- तज्ज्ञ व स्थानिक लोकांच्या सहभागातून पर्यटन स्थळांचा नियोजनबद्ध विकास घडवून आणणे.
- पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने माहितीचा प्रसार करणे व पर्यटकांना सुयोग्य अनुभवाचा लाभ मिळवून देणे.
- विद्यमान पर्यटनविषक सुविधांमध्ये श्रेणीवाढ करणे.
- निवडक पर्यटनस्थळांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटनविषयक सुविधा उपलब्ध करून देणे.
- युवाक्षेत्रातील व इतर सर्व स्तरातील पर्यटकांना परवडेल अशा सोयी पर्यटनस्थळी उपलब्ध करून देणे.
- महत्त्वाचे व्यवसाय, औद्योगिक व नागरी केंद्रे यांच्याजवळ मनोरंजनाच्या सोयी उपलब्ध करून देणे.
- देशासाठी अधिकाधिक परकीय चलन मिळवणे.
- राज्याच्या अविकसित भागात रोजगार निर्मिती करणे.
- पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून एकात्मिक विकास साधण्यासाठी नैसर्गिक व सांस्कृतिक स्त्रोतास संरक्षण देणे.
- महाराष्ट्रातील सांस्कृतिक व पारंपरिक कला व कारागिरी (हस्तकला व लोककलांसह) यांना चालना देणे.

### विविध योजना

- महामंडळामार्फत पर्यटन धोरण अंतर्गत प्रोत्साहन योजना
- निवास व न्याहारी योजना
- अजंठा-वेरूळ लेणी संवर्धन व पर्यटन विकास प्रकल्प
- आरामदायी डेक्कन ओडिसी गाडी
- सांस्कृतिक महोत्सव
- महाभ्रमण योजना

### डेक्कन ओडिसी लक्झरी ट्रेन

भारतीय रेल्वे, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात डेक्कन ओडिसी लक्झरी ट्रेन २००४ पासून चालवण्यात येत आहे. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आनंदीदायी ओळख करून देणे तसेच महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचे, सांस्कृतिक कला - वैभवांचे व खाद्य संस्कृतींची ओळख जगाला व्हावी, याकरिता गाडीमध्ये महामंडळाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आंतरिक सुविधा आणि सेवा पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.




या गाडीमध्ये केबल टीव्ही, संगणक, इंटरनेट सुविधा, लॅबररी, चॅनल म्युझिक, इंटरकॉम, सेल फोन, वाय-फाय इत्यादी आंतरराष्ट्रीय सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. राहण्याच्या रूम्सच्या देखील उत्तम सोयीसुविधा पुरवण्यात आल्या आहे.

डेक्कन ओडिसी सहलींचा हंगाम हा प्रामुख्याने सप्टेंबर ते मे या कालावधीत असतो. या कालावधीत एक आठवड्याच्या सुमारे ३५ सहली आयोजित करण्यात येतात.



## नवीन 'अ' वर्ग पर्यटनस्थळ

**पर्यटन विभागाने नागपूर येथील दीक्षाभूमी आणि मुंबई-दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर (स्मारक) चैत्यभूमी स्थळाला 'अ' वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे.**

### विविध महोत्सव

महामंडळामार्फत राज्यातील वारसास्थळे तसेच पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी सांस्कृतिक महोत्सव आयेजित करण्यात येतात. आपल्या उच्च सांस्कृतिक परंपरा व अभिजात कलांचे दर्शन, महाराष्ट्रात येणारे देशी-विदेशी पर्यटक व कलाप्रेमींना घडावे तसेच या ठिकाणांचा पर्यटनदृष्ट्या विकास व प्रसार व्हावा हा यामागील उद्देश आहे. औरंगाबाद येथील वेरुळ-औरंगाबाद महोत्सव, नागपूर येथील 'कालिदास महोत्सव' व मुंबई जवळील 'एलिफंटा महोत्सव', तसेच दक्षिण मुंबईतील 'बाणगंगा महोत्सव', पुणे महोत्सव आदी महोत्सव प्रतिवर्षी आयोजित केले जातात.

### शनिवारवाडा ध्वनिप्रकाश कार्यक्रम

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात जानेवारी, २००१ पासून महाराष्ट्रातील पहिला कायमस्वरूपी ध्वनिप्रकाश कार्यक्रम शनिवारवाडा या ऐतिहासिक वास्तूत सुरू करण्यात आला आहे. त्यात पेशवेकालीन इतिहासावर आधारित मराठी व इंग्रजीमध्ये प्रत्येकी एक तासाचा कार्यक्रम सादर करण्यात येतो.



### सारंगखेडा चेतक महोत्सव

राजस्थान येथे पुष्कर या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते व या महोत्सवाचे उंट हे प्रमुख आकर्षण असून मोठ्यासंख्येने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटक या महोत्सवास उपस्थित राहतात. त्याच धर्तीवर अश्व हे प्रामुख्याने आकर्षण असलेल्या सारंगखेडा येथे चेतक महोत्सवाचे आयोजन स्थानिक जिल्हाधिकारी व महामंडळातर्फे करण्यात येते.

स्थानिक लोककला, हस्तकला, खाद्यसंसकृती, वारसा जपणाऱ्या चेतक महोत्सवात राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पर्यटक हजेरी लावतील. त्यामुळे एकूणच महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास होण्यास मदत होईल.

### अंजिठा - वेरुळ विकास प्रकल्प

अजंठा-वेरुळ लेण्यांना जागतिक वारसा स्थळे म्हणून युनेस्कोने मान्यता दिली आहे. या लेण्याचे संवर्धन व पर्यटनदृष्ट्या सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलण्यात येत आहे.

### पर्यटक निवासस्थाने

- बोधलकसा: पर्यटक निवास बोधलकसा हे, ता.तिरोडा, जि.वर्धा येथे आहे. महामंडळाने पर्यटकांच्या सोयीकरिता २७ कक्ष उपलब्ध करून दिले आहेत.
- वर्धा : वर्धा येथे महात्मा गांधी यांचा सेवाग्राम आश्रम आहे. हे आश्रम पर्यटकांचे आवडीचे पर्यटन स्थळ आहे. तेथे येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीकरिता १२ कक्ष उपलब्ध करून दिले आहेत
- मोझरी पॉइंट : पर्यटक निवास मोझरी पॉइंट हे ता. चिखलदरा, जि.अमरावती येथे आहे. या निवासामध्ये एक सभागृह आणि १५ कक्ष पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत.

### सिंधुदुर्ग कोस्टल सर्किट

महाराष्ट्रातील पर्यटन जिल्हा म्हणून घोषित असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याची केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने स्वदेश दर्शन योजनेंतर्गत सिंधुदुर्ग कोस्टल सर्किटची निवड केली असून त्याकरिता निधीही दिला आहे. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, देवगड, मिठबाव, तारकर्ली, तोंडीवली, निवती किल्ला, शिरोडा, सागरेश्वर व मोचेमाड अशा विविध ठिकाणी पर्यटकांकरिता पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### समुद्रविश्व प्रकल्प


महामंडळाने तोंडवली-वायंगणी, जि. सिंधुदुर्ग येथे पर्यटकांसाठी अत्याधूनिक समुद्रविश्व प्रकल्प उभारण्याच्या निर्णय घेतला आहे. समुद्रविश्व प्रकल्पामुळे देशी व विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने प्रकल्पाला भेट देतील व त्यामुळे राज्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

हाऊसबोट

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खाड्यांमध्ये पर्यटकांना भ्रमंती करता यावी यासाठी हाऊसबोट प्रकल्प राबवण्यात येत असून याअंतर्गत चार हाऊसबोट तारकर्ली येथे उपलब्ध आहेत. हाऊसबोटीसाठी पर्यटकांचा वाढता प्रतिसाद वाढला असल्याने महामंडळाने रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट व दाभोळ या खाडी क्षेत्रात हाऊसबोट प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला. खाडी क्षेत्रात प्रत्येकी दोन असे एकूण चार हाऊसबोट बांधणीचे काम पूर्ण झाले असून त्यापैकी दोन हाऊसबोटचा ताबा महामंडळाने घेतला आहे.

स्नॉर्कलिंग व स्कुबा डायव्हिंग केंद्र

महामंडळाने तारकर्ली, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. हे प्रशिक्षण केंद्र इमारतीमध्ये ११ निवासकक्ष, एक जलतरण तलाव, दोन क्लास रुम, एक अद्यावत उपहारगृह या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रशिक्षण केंद्रासाठी तीन हायस्पीड बोट व आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कूबा डायव्हिंग साहित्य पर्यटकांसाठी उपलब्ध केले आहेत. हे प्रशिक्षण केंद्र आंतरराष्ट्रीय पॅडी (प्रोफेशनल असोसिएशन ऑफ डायव्हिंग इन्स्ट्रक्टर्स) या संस्थेशी संलग्न असून प्रशिक्षित झालेल्या व्यक्तींना तसे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. प्रशिक्षण देण्यासाठी या क्षेत्रात अनुभवी इन्स्ट्रक्टर, डाइव्हमास्टर, बोटमन इ.ची नियुक्ती करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण केंद्र ऑक्टोबर, २०१५ पासून सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रास पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.



ऑम्फिबियन एअरक्राफ्ट

राज्यामध्ये जलविमान वाहतूक अंतर्गत ऑम्फिबियन एअरक्राफ्ट सेवा खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने सुरू करण्याचा महामंडळाने निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्यात सदरची सेवा जुहू चौपाटी ते गिरगाव चौपाटी अशी सुरू करण्यात येणार आहे.





लोणार : उल्कापातामुळे निर्माण झालेली जगातील जी मोजकी सरोवरे आहेत त्यातील तिसऱ्या क्रमांकाचे लोणार सरोवर बुलढाणा जिल्ह्यात आहे. सरोवराचा पर्यावरणाभिमुख विकास करण्यात येणार आहे. तेथे एक पर्यटन संकुल उभारण्यात आले आहे. यामध्ये दोन बेड असणारे आठ कक्ष आणि सोळा बेड असणारे दोन लोक निवास, उपहारगृह आणि सभागृह यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त अधिक सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. नागपूर, खिंडसी, खेकरानाला, बोर डॅम, सिल्लारी पेंच, ताडोबा, चिखलदरा, पवनी इत्यादी ठिकाणी पर्यटक अभ्यागत केंद्र, जंगल रिसॉर्ट, पर्यटन संकुल, निसर्ग परिचय केंद्रे, थंड हवेच्या ठिकाणी दर्शनीय स्थळांचा विकास, संरक्षण कठडे उभारण्यात येत आहेत.

हूनर से रोजगार

राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापन करण्यात आली आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने ५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार राज्यस्तरावर २०२२ पर्यंत ४.५ कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत महामंडळातील पर्यटक निवासात तसेच राज्यातील खाजगी संस्थांमधून 'हुनर से रोजगार' कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता हाऊस किपिंग व फूड प्रॉडक्शन, वाहनचालक व आदरातिथ्य प्रशिक्षण देऊन जास्तीत जास्त कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे. आत्तापर्यंत महामंडळामार्फत अनेकांना हाऊस किपिंग व फूड प्रॉडक्शन, बेकरी अॅण्ड पेस्ट्री आणि फूड बिव्हरेजमध्ये प्रशिक्षण देण्यात आले असून रोजगारही मिळाला आहे, तर काहींनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला आहे.

नवीन सेवा

क्रूझ सेवा : मुंबई शहरात देशी-विदेशी पर्यटकांसाठी खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने मुंबई-हार्बर क्रूझ सेवा सुरू करण्याकरिता आवश्यक असलेल्या परवानग्या घेण्यात येत आहेत. परवानगी प्राप्त होताच पर्यटकांना ही सेवा उपलब्ध करून देण्यात येईल.



फ्लोटेल (Floatting Restaurant) : महामंडळामार्फत मुंबई शहराच्या सागरी क्षेत्रात खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय दर्जाचे फ्लोटेल प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.



हा प्रकल्प नरिमन पॉइंट येथील सागरी क्षेत्रात राबवण्यात येणार आहे. तसेच महामंडळामार्फत बांन्द्रा सी-लिंक, मुंबई येथेही प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

हेली टुरिझम : राज्यात विविध पर्यटन ठिकाणी अत्यंत कमी वेळेत आरामदायी प्रवास करण्यासाठी हेलीटुरिझम ही संकल्पना पुढे आली. खाजगी संस्थेच्या सहकार्याने ही सेवा पर्यटकांसाठी सुरू करण्यात आली आहे. हेलिटुरिझम संकल्पनेद्वारे मुंबईतील जुहू चौपाटी-विपश्यना पॅगोडा-मॅनग्रोव्ह जंगल-लोकल रेल्वे-मेट्रो-इस्कॉन मंदिर-मुंबईच्या गगनचुंबी इमारती-



पवई तलाव-सी लिंक-लोखंडवाला-मढ बेट इ. ठिकाणांचे हवाई दर्शन पर्यटकांना १५ मिनिटांत घडवले जाईल. या संकल्पनेस पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

गंगापूर धरण, जि. नाशिक येथील बोटक्लब व जलक्रीडा केंद्र खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने चालवले जाणार आहे.

**इतर योजना**

- राज्याच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत विविध जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी देण्यात येतो. आता सर्व जिल्ह्यांचे जिल्हानिहाय पर्यटन बृहत आराखडे जिल्हाधिकारी व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या एकत्रित प्रयत्नाने तयार करण्यात येत आहे. या आराखड्यानुसार यापुढे जिल्हास्तरावरील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेद्वारे निधी देण्यात येईल.
- पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या व ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या विविध किल्ले आणि बुद्धकालीन लेणी गुंफा यांच्याबाबत फोर्ट सर्किट आणि बुधिस्ट सर्किट या दोन महत्त्वाच्या योजना पर्यटन विभागाकडून राबवण्यात येत आहेत.
- मुंबईतील पर्यटन विकासासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली मुंबईमध्ये मरीना, क्रूझ, मत्स्यालय, पर्यटन भवन, कला शिल्पग्राम असे प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.
- इको टुरिझम अंतर्गत केंद्र शासनाने विदर्भामध्ये चार मंडळे व निधी मंजूर केला आहे. वन विभाग आणि वन विकास महामंडळ यांचे साहाय्य घेऊन वन पर्यटनाचा विकास व्हावा यासाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे केंद्राकडून डेस्टिनेशन व सर्किटस यांच्यासाठी निधी प्राप्त होत आहे.
- राज्यातील पर्यटन क्षेत्रांचे देशात व विदेशात प्रचालन व प्रसिद्धी करण्याकरिता शासनाने निर्णय घेतला असून प्रतिवर्षी महामंडळाला निधी उपलब्ध करून देण्यात येतो. पर्यटकांचा ओघ वाढावा यासाठी जिल्हास्तरावर पर्यटन महोत्सव साजरे करण्यासाठी निधी दिला जातो. एलिफंटा, वेरुळ, बाणगंगा, कालिदास असे विविध फेस्टिव्हल साजरे केले जातात. परदेशातील विविध ट्रॅव्हल मार्टना उच्चस्तरीय शिष्टमंडळे भेट देत असतात व परदेशातील रोड शोना महामंडळाचे अधिकारी उपस्थित राहून प्रसिद्धीसाठी प्रयत्न करतात.
- पर्यटनाच्या क्षेत्राशी संबंधित पायाभूत सुविधा पुरवणाऱ्या इतर विभागांशी समन्वय साधून पर्यटन विकासाला चालना देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यामध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, राज्य पुरातत्त्व विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, वन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा प्रामुख्याने समावेश आहे.
- सुरक्षित व आतिथ्यशील पर्यटन संकल्पनेची सर्व स्तरावर जागरूकता व्हावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. महामंडळामार्फत कृषी पर्यटन, आयुर्वेदिक पर्यटन, वाईन टुरिझमला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**संदर्भ: महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ**



भूजलचर बस: पर्यटन क्षेत्रात विविध संकल्पना अमलात आणून प्रगत राष्ट्रांनी पर्यटनक्षेत्र प्रभावशाली केले आहे. आरामदायी सोयीसुविधा, योग्य पायाभूत सुविधा, पर्यटनस्थळी भेट देण्यासाठी चांगल्या प्रकारच्या दळणवळणाचा मार्ग इत्यादी बाबींमुळे पर्यटन क्षेत्राचा विकास होत आहे. पाश्चात्य देशात जलक्षेत्र स्थळ दर्शनासाठी पर्यटकांना भूजलचर बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या बस सेवेद्वारे जल पर्यटन स्थळे दाखवली जातात. जलक्षेत्रात अशा प्रकारची ही बस चालवण्यात येते. एक आरामदायी वातानुकूलित बस असून त्यामध्ये ४८ ते ५० आसने उपलब्ध केली जातात. ही भूजलचर बस गिरगांव चौपाटी येथील सागरी क्षेत्रात चालवण्यात येईल.

# मायानगरीची भ्रमंती



अलीकडे केलेल्या एका सर्वेक्षणात १०० मधून ८० भारतीयांना मुंबई शहर बघणे आवडेल असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मुंबई दाखवण्याची एक मोठी संधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास मिळाली आहे.

### मुंबई दर्शन सहल

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन (बेस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने वातानुकूलित बसमधून मुंबई दर्शन सहल ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आली आहे.

सध्या प्रायोगिक तत्त्वावर शनिवार व रविवार या दिवशी दोन वेगळ्या मार्गावरून या सहलीचे आयोजन करण्यात येते. पहिली बस छत्रपती शिवाजी टर्मिनस स्थानकापासून सुटेल व मुंबईतील प्रमुख ठिकाणांना भेटी देत तिथेच परत येईल, तर दुसरी बस दादर पूर्वे कडील एम.टी.डी.सी. केंद्र, प्रीतम हॉटेलजवळ जवळून सुटेल व सगळ्या ठिकाणांना भेटी देत पुन्हा तिथेच येईल.

### पर्यटन पॅकेज

भारतीय पर्यटकांसाठी या सहलीसाठी गोल्ड पॅकेज आणि सिल्वर पॅकेज असे दोन पॅकेज उपलब्ध आहेत. गोल्ड पॅकेजमध्ये प्रतिव्यक्ती रू.७३५/- तर ३ ते १२ वर्षांच्या मुलांसाठी रू.६५७/- एवढा दर आकारला जाणार आहे. जिजामाता उद्यान, भाऊ दाजी लाड संग्रहालय, सिद्धीविनायक मंदिर, नेहरू सायंन्स सेंटर, मणिभवन, तारापोरवाला मत्स्यालय, छत्रपती शिवाजी वास्तू संग्रहालय या ६ सहा ठिकाणांचे तिकीट गोल्ड पॅकेजमध्ये समाविष्ट आहे. या ठिकाणी पर्यटकांना आधीच तिकीट देण्यात येणार असल्याने रांगेत उभे राहावे लागणार नाही.

सिल्वर पॅकेज अंतर्गत प्रतिव्यक्ती रू.४११/- आणि ३ ते १२ वयोगटातील मुलांसाठी तेवढाच दर आकारण्यात येणार आहे. या दोन्ही सहलींसाठी सकाळी ९.०० वाजता छत्रपती शिवाजी टर्मिनस आणि दादर येथून बसेस सोडण्यात येणार आहेत. या बसचे दर किफायतशीर व वाजवी असल्याने देशी-विदेशी पर्यटकांना याचा लाभ होणार आहे.

राज्यात नागपूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक या ठिकाणीसुद्धा दर्शन बससेवा सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. देशी व विदेशी पर्यटकांच्या गरजा लक्षात घेऊन मुंबई दर्शन उपनगरासाठी या दुसऱ्या मार्गिकिद्वारे जुहु चौपाटी, दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्म सिटी), ईस्कॉन टेंपल, आरे डेअरी, आरे पिकनिक पॉईंट, छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनस-२, मुंबई विद्यापीठ, संजय गांधी नॅशनल पार्क, जागतिक विपश्यना पागोडा, कान्हेरी गुंफा इत्यादी स्थळे पाहता येतील याचे नियोजन करण्यात येत आहे.

मुंबई दर्शन या बसचे तिकीट आरक्षित करण्यासाठी www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर किंवा अधिकृत बुकिंग एजन्सी किंवा टोल फ्री क्र.१८००-२२११३० येथे संपर्क साधू शकता.

**- सुनिता कुपेरकर**
सहायक संचालक, मुंबई

# अमर्याद आणि मनमोहक

महाराष्ट्र...! हिमशिखरे सोडली, तर भारतातील विविधता या राज्यात सामावलेली आहेत. युनेस्कोने जाहीर केलेली ५ ऐतिहासिक वारसास्थळे राज्यात आहेत. ऐतिहासिक गडकिल्ल्यांपासून ते ऐतिहासिक पर्यटनस्थळांची राजधानी औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ, एलिफंटासारख्या लेण्या, कळसूबाईचे शिखर, महाबळेश्वर, तोरणमाळसारखी थंड हवेची ठिकाणे, देशातीलच नव्हे, तर जगभरातील विविध क्षेत्रातील नागरिक, पर्यटकांना खुणावणारे व्याघ्र प्रकल्प, विस्तीर्ण आणि नयनरम्य समुद्रकिनारे, मुंबईसारखे जागतिक दर्जाचे महानगर, फुलांनी बहरणारे कास पठार आणि लोणार सारखे सरोवर आपल्या राज्यात आहे.

जगातील ४० देशांची अर्थव्यवस्था पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. त्या तुलनेत महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाला मोठी संधी असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आगामी काळात पर्यटन व्यवसायाच्या वृद्धीतून रोजगार निर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत.

पर्यटन क्षेत्राला विविध आयाम आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या पर्यटनाकडे नागरिकांचा कल असतो. त्यामुळे नाशिकला धार्मिक, पुणे व मुंबई इव्हेंट प्रोग्रॅम, नागपूरला व्याघ्र प्रकल्पाची तर सिंधुदुर्गला समुद्रकिनाऱ्यांची राजधानी म्हणता येईल.

औरंगाबादचे इतिहासात मोठे व महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच औरंगाबादसारख्या शहराला पर्यटनाची राजधानी म्हणून ओळखले जाते. या पर्यटन राजधानीच्या विकासासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पर्यटन विकास महामंडळ व जपान सरकारच्या सहकार्याने (जायका) आंतरराष्ट्रीय पातळीवरचा विमानतळ विकसित केला आहे. हॉटेल व्यवसायही विकसित झाला आहे. जायकाच्या माध्यमातून अजिंठा, वेरुळसह औरंगाबादचे ऐतिहासिक महत्त्व जगासमोर आणावयाचे आहे.



जयकुमार रावल
पर्यटन मंत्री

शेती, उद्योगानंतर सर्वाधिक रोजगार देऊ शकणारा पर्यटन व्यवसाय महाराष्ट्रात विस्तारण्याची मोठी संधी आज आपल्या हातात आहे. यासाठी 'अतिथी देवो भव:' आणि महाराष्ट्राच्या मनामनामध्ये पर्यटन संस्कृती रुजवून ती विकसित करण्यावर पर्यटन विभागाचा सर्वाधिक भर राहील, असे सांगताहेत राज्याचे पर्यटन तथा रोजगार हमी योजना मंत्री जयकुमार रावल.

दिल्लीत उतरणारा पर्यटक अजिंठा किंवा वेरुळ येथे यावा म्हणून औरंगाबाद शहरासाठी रेल्वेसह हवाई सेवेची कनेक्टिव्हिटी देण्याचा प्रयत्न आहे. औरंगाबादला हेरिटेज सिटीचा दर्जा मिळवून देण्यासाठी भारत सरकारच्या माध्यमातून युनेस्कोकडे पाठपुरावा सुरू आहे. तसेच विविध पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यात येत आहेत, जेणेकरून पर्यटक याकडे अधिकाधिक आकर्षित होतील.

### मुंबई दर्शन सेवा

मुंबई ही महाराष्ट्राच्या राजधानीबरोबरच जगातील एक महत्त्वाचे शहर आहे. मात्र, मुंबईतील अनेकांना मुंबईतील पर्यटनाची कोणतीच माहिती नसते, त्यामुळे मुंबईकरांसाठी मुंबईतील ऐतिहासिक व पर्यटन स्थळांची माहिती व्हावी म्हणून; मुंबई दर्शन योजना सुरू केली आहे. या योजनेत बससेवेच्या माध्यमातून कमीत कमी खर्चात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मुंबई शहरातील किमान १० ऐतिहासिक ठिकाणांचे दर्शन पर्यटकांना घडवण्यात येत आहे.

### ८०० कोटींचा महसूल मिळणार

भारत दर्शनासाठी जगभरातून येणारे पर्यटक दिल्लीनंतर सर्वाधिक संख्येने मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरतात. मात्र, ते बंगळूर, जयपूर, केरळ, गोव्याकडे रवाना होतात. हेच पर्यटक एक दिवस जरी मुंबईत थांबले, तरी महाराष्ट्राचा वर्षभरात ८०० कोटी रुपयांचा महसूल वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर परदेशी पर्यटकाला प्रथम भेटणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरपासून ते वेटरपर्यंतच्या सेवकाची वागणूक कशी असेल. यावर पर्यटकांचे थांबणे अवलंबून असेल. त्यामुळे टॅक्सी ड्रायव्हरपासून ते वेटरपर्यंतच्या साखळीतील सेवकांनी पर्यटकांशी कसे बोलावे, कसे वागावे, याबाबत मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात येत आहे.




**व्हिजिट महाराष्ट्र : २०१७**

महाराष्ट्रातील पर्यटकांची संख्या वाढून रोजगार वाढावा, पर्यटन स्थळांना भेटी द्याव्यात म्हणून व्हिजिट महाराष्ट्र : २०१७ अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्राची पर्यायाने पर्यटनस्थळांची मांडणी करून त्यांचे मार्केटिंग करण्यात येईल. जेणेकरून, मुंबईत उतरणारा पर्यटक महाराष्ट्रातच थांबावा, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्यासाठी त्याला रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गाची कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात येईल.

भारतातील सर्वांत प्रेक्षणीय किल्ले महाराष्ट्रात आहेत. त्यांचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करू शकलो नाहीत. त्यात पुरातत्त्व विभागाच्या काही अडचणी असू शकतील. आगामी काळात अरबी समुद्रात पावणेचार हजार कोटी रुपये खर्चून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. ते देशातीलच नव्हे, तर जगभरातील पर्यटनाचे फार मोठे आकर्षण ठरणार आहे.

**हेरिटेज धोरण**

किल्ल्यांच्या पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र पर्यटनाचे हेरिटेज धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी समिती गठित केली आहे. या समितीत महाराष्ट्रातील किल्ल्यांचे राजदूत (ब्रँड ॲम्बेसेडर) छत्रपती संभाजी राजे, उदयपूरचे युवराज लक्षराज सिंग यांच्यासह तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.

**अद्‌भुत खजिना**

कोकणातील समुद्रकिनारे म्हणजे महाराष्ट्राला मिळालेली अमूल्य देणगी आहे. समुद्रकिनारा आणि त्यालगत किल्ले असे जगात फारसे पाहावयास मिळत नाही. मात्र, कोकणात हे अद्‌भुत चित्र पाहावयास मिळते. पर्यटकांसाठी हा खजिना आहे. पर्यटकांना समुद्र आणि समुद्रातील जिवांविषयी माहिती व्हावी म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यात २५० एकर क्षेत्रात महत्त्वाकांक्षी, 'सी वर्ल्ड' प्रकल्प साकारण्यात येणार आहे. त्यात समुद्रातील सूक्ष्म जीवांपासून ते महाकाय शार्क माशांविषयी माहिती देणारे ॲक्वेरियम साकारले जाईल.

**व्याघ्र प्रकल्पांकडे लक्ष वेधणार**

भारतातील सर्वाधिक सात व्याघ्र प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. नागपूरपासून ५० किलोमीटरच या परिघात व्याघ्र प्रकल्प आहेत.

गोंदिया येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ आहे. तेथेही प्रकल्प आहे. तेथे आता विकासाला सुरुवात झाली आहे. वाघांच्या दर्शनासाठी जगभरातून पर्यटक येतात. तसेच जंगलात जाणारे वेगळे पर्यटक आहेत. त्यांच्यासाठी घनदाट जंगल असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या भागात जंगलांची कत्तल झाली आहे, अशा भागात वृक्षारोपण करून वनांचे आच्छादन तयार करण्याचा प्रयत्न वन विभागाने इको टुरिझम बोर्डच्या माध्यमातून सुरू केले आहेत.





**खानदेश पर्यटन**

आदिवासी आणि मागास भागातही पर्यटनाचा विकास झाला पाहिजे. त्यातून रोजगाराची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होते. यापूर्वी दुर्दैवाने तसा प्रयत्न झाला नाही. मात्र, शेती, उद्योगापेक्षा पर्यटनात रोजगाराची अधिक संधी उपलब्ध होऊ शकते. धुळ्यातही पर्यटनाच्या विकासाला मोठी संधी आहे. मुंबई- आग्रा आणि कोलकोता- अहमदाबाद महामार्गावर धुळे शहर आहे. ही पर्यटनासाठी जमेची बाजू आहे. किल्ले लळिंग, सोनगीर, थाळनेर, भामेर, खानदेशातील राऊळांच्या गढ्या हा सर्व इतिहास देशासमोर, पर्यटकांसमोर पर्यटन विभागाच्या माध्यमातून आणण्यात येईल.

तापी नदीवरील बॅरेजेस आणि अक्कलपाडा धरणात उपलब्ध जलसाठा पाहता ॲडव्हेन्चर टुरिझमला प्रोत्साहित करण्यात येईल. सारंगखेडा (जि. नंदुरबार) येथील श्रीदत्त यात्रेनिमित्त आयोजित होणारा चेतक महोत्सव, तीर्थक्षेत्र प्रकाशे, महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ, आदिवासी बांधवांचा होळीचा सण जगासमोर आणण्याचे प्रयत्न विविध पातळ्यांवर सुरू आहेत. आगामी काळात पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय धुळे येथे कार्यान्वित करण्यात येईल. उत्तर भारतातून येण्यासाठी खानदेश हा एन्ट्री पॉइंट आहे. सुरत, इंदूर, औरंगाबाद, नाशिक या महानगरांपासून २०० किलोमीटरवर धुळे शहर आहे. रस्ते, रेल्वे, हवाई मार्गाने खानदेश जोडला गेला आहे. खानदेशातील पर्यटनस्थळे वैविध्यपूर्ण आहेत. त्यांचे भौगोलिक स्थान वेगळे आहे. याशिवाय या भागातील नागरिकांचे राहणीमान, भाषा, खाद्यपदार्थ देश- विदेशातील पर्यटकांसमोर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे कोकण पर्यटनाच्या धर्तीवर खानदेश पर्यटनाचा ब्रँड विकसित करण्यात येईल.

**सारंगखेडा अश्वसंग्रहालय**

सारंगखेडा (ता. शहादे, जि. नंदुरबार) येथे दरवर्षी मार्गशीर्ष पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. देशभरातून घोडे विक्रेते येथे दाखल होतात. किंबहुना ही यात्रा देशात आता घोड्यांच्या खरेदी- विक्रीसाठीच प्रसिद्ध झाली आहे. येथे चेतक फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. त्यामुळे सारंगखेडा येथे जागतिक दर्जाचे अश्वसंग्रहालय स्थापन करण्याचा मानस आहे. त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

**धार्मिक, कृषी पर्यटनाचे व्यवस्थापन**

महाराष्ट्राला ऐतिहासिक ठिकाणांप्रमाणे तीर्थक्षेत्रांचा समृद्ध वारसा लाभला आहे. अलीकडे धार्मिक पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पंढरपूर, शिर्डी, दर १२ वर्षांनी नाशिक येथे होणारा कुंभमेळा, अष्टविनायक, त्र्यंबकेश्वर, वेरुळ, परळीवैजनाथ आणि भीमाशंकर येथील ज्योतिर्लिंग, शेगावसह विविध ठिकाणी देशविदेशातील पर्यटकांची संख्या वाढत आहे. त्यांना पायाभूत सोयीसुविधा एकाच जागी उपलब्ध व्हाव्यात म्हणून नियोजन केले जात आहे.

ॲग्रो टुरिझमला प्रोत्साहन मिळावे म्हणून पर्यटन धोरण २०१६ मध्ये त्याचा समावेश करण्यात आला आहे. एवढेच नव्हे, तर नाशिक येथे वाईन टुरिझमला प्रोत्साहन दिले जात आहे. पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांना सवलत दिली जाणार आहे.

**पालघरला साकारणार ट्रायबल व्हिलेज**

ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, जळगाव, अमरावती, नागपूर, गडचिरोली या आदिवासी पट्ट्यात पर्यटन चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकणार आहे. आदिवासींचे जीवन, त्यांची संस्कृती, त्यांच्यातील लोककला, प्रथा, परंपरा, खाद्यपदार्थ, यांची माहिती जगासमोर यावी म्हणून पालघर येथे दक्षिण आफ्रिकेच्या धर्तीवर ट्रायबल व्हिलेज विकसित करण्याची संकल्पना आहे. आदिवासी संस्कृती जगापुढे यावी म्हणून पर्यटन विभागाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील. पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपयुक्त बाबींवर चर्चा करून लवकरच सर्वंकष पर्यटन धोरण शासन तयार करत आहे.

**शब्दांकन : रणजित राजपूत**
जिल्हा माहिती अधिकारी, धुळे

# पर्यटनातून रोजगार



ज्या ठिकाणी पर्यटक येत असतात तेथे अनेकांना रोजगार उपलब्ध होत असल्याने पर्यटन आता एक रोजगारक्षम क्षेत्र झाले आहे. त्यामुळे या क्षेत्राला चालना देतानाच बेरोजगार युवकांना अधिकाधिक रोजगार कसा देता येईल, याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. त्यादृष्टीनेच राज्याचा पर्यटन आराखडा तयार करण्यात आला आहे.

**मदन येरावार**, पर्यटन राज्यमंत्री

रोजगार निर्मितीबरोबरच स्थानिक विकास हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून राज्याचा पर्यटन विभाग काम करत आहे. स्थानिक लोकांच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्रांचा विकास घडून आणण्याला प्रोत्साहन दिले जात आहे. राज्यातील समृद्ध कला-परंपरांना चालना देणे, पर्यटनाच्या माध्यमातून अविकसित भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटकांना चांगल्या सुविधा निर्माण करून देणे या बाबींचा पर्यटन धोरणात समावेश करण्यात आला आहे. राज्यातील सांस्कृतिक व नैसर्गिक बाबींचे संरक्षण करण्यासाठी पर्यटनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

### पर्यटन सुविधा

राज्यातील पर्यटनस्थळांना विदेशी नागरिक भेट देतात. त्यात लेण्या, व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये, किल्ले आदींचा समावेश आहे. या ठिकाणी आलेल्यांना पर्यटनाचा पुरेपूर आनंद घेता यावा, असे अपेक्षित असते. त्या दृष्टीने काही सुविधा निर्माण कराव्या लागतात. त्या सुविधा पुरवून पर्यटकांना आनंदी करण्याचे काम राज्य पर्यटन महामंडळाच्या वतीने केले जाते. अभयारण्य असतील तर तेथे पर्यटकांच्या सफरीसाठी वाहने, तेथे असलेल्या धरणे-तलावात जलसफर, मुंबई, पुणेसारख्या शहरात शहर दर्शन बसेस, पर्यटकांना निवास, भोजनाची चांगली व्यवस्था, पर्यटन स्थळांच्या ठिकाणी रस्ते, स्वच्छ पाण्याची व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

### विशेष प्रयत्न

राज्यातील पर्यटन स्थळांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्यासाठी विशेष प्रसिद्धी मोहीम राबवण्यात येत आहे. त्यासाठी निधीची वेगळी तरतूदही केली आहे. याबरोबरच प्रोत्साहन धोरण राबवण्यात येते. निवास व न्याहारी योजना, अजिंठा-वेरूळ लेणी संवर्धन व पर्यटन विकास प्रकल्प, पर्यटकांसाठी आरामदायी डेक्कन ओडीसी रेल्वे गाडी, ठिकठिकाणी सांस्कृतिक



महोत्सव, पर्यटकांसाठी महाभ्रमण योजना इ. योजना पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी राबवण्यात येत आहेत.

### विदर्भातील पर्यटन

विदर्भात मोठ्या प्रमाणावर घनदाट जंगल आहे. त्यामुळे वाघासह विविध प्रकारचे दुर्मीळ प्राणी, पक्षी येथे आढळतात. वाघांची सर्वाधिक संख्या विदर्भात आहे. अभयारण्याची संख्याही खूप आहे. याशिवाय विविध नैसर्गिक पर्यटनस्थळे आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार हे उल्कापातामुळे निर्माण झालेले जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर आहे. या ठिकाणी पर्यटन विकासाची कामे सुरू आहेत. याशिवाय नागपूर, खिंडसी, खेकरानाला, बोर डॅम, बोर व्याघ्र प्रकल्प, सिल्लारी पेंच, ताडोबा, चिखलदरा, पवनी येथे पर्यटक अभ्यास केंद्र, जंगल रिसॉर्ट, पर्यटन संकुल, निसर्ग परिचय केंद्र, थंड हवेच्या ठिकाणी दर्शनिय स्थळांचा विकास, उपहारगृह, जलक्रीडा सुविधा आदी कामे करण्यात येत आहे. महामंडळाच्यावतीने नव्याने भंडारा जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यात बोधलकसा, वर्धा येथे पर्यटक निवास, चिखलदरा येथे मोझरी पॉइंटवर पर्यटक निवास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार


पर्यटकांना निवास, भोजन, भ्रमण, सफारी, जलक्रीडा आदी सुविधा पुरवल्या जातात. यासोबतच गाईड, पर्यटक वाहन यासाठीही मनुष्यबळाची आवश्यकता भासत असते. मोठ्या प्रमाणावर पर्यटक खरेदीही करतात. खानपानाचा आनंद घेतात. येथे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ वापरले जाते. या सर्व गोष्टींच्या माध्यमातून रोजगार आणि स्वयंरोजगार उपलब्ध होतो आणि यावरच राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले आहे.

**शब्दांकन : मंगेश वरकड**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ



अरबी समुद्रात होणाऱ्या भव्य शिवस्मारकाचे संकल्प चित्र.

पर्यटन क्षेत्रात अपार संधी असणारे महाराष्ट्र हे देशातील प्रमुख राज्य आहे. भारतातील हे एक पर्यटक-मित्र राज्य आहे. राज्य शासनाच्या पर्यटन वृद्धी योजनांना केंद्रातील सरकार संपूर्ण साहाय्य व प्रोत्साहनही देत आहे. राज्य सरकारने २०१७ हे 'व्हिजिट महाराष्ट्र' वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्यानिमित्ताने केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन विकास मंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. महेश शर्मा यांची विशेष मुलाखत.



डॉ. महेश शर्मा

केंद्रीय पर्यटन मंत्री

# महाराष्ट्र अनलिमिटेड...

**पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्राला किती व कशा संधी आहेत असे आपणास वाटते?**

डॉ. शर्मा - भारतातील एक विकसित राज्य असलेल्या महाराष्ट्राला पर्यटन क्षेत्रात अपार संधी आहे. विशेषतः विदेशी पर्यटक सर्वप्रथम व प्राधान्याने देशातील ज्या दोन महानगरांना प्राधान्य देतात, त्यात दिल्लीबरोबरच मुंबईदेखील आहे. एकूण पर्यटकांपैकी तब्बल ४० टक्के पर्यटक प्रथम मुंबईत जातात व नंतर ते इतर भागांना भेटी देतात. मुंबई ही आर्थिक राजधानी असली तरी ते जगातील एक उत्कृष्ट पर्यटन केंद्रही आहे. गेट वे ऑफ इंडिया, नेहरू तारांगण, बॉलीवूड या पारंपरिक पर्यटन स्थळांव्यतिरिक्त आगामी काळात साकारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक स्मारक व अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक यांची लवकरच यात भर पडणार आहे. मुंबईसह नागपूर व पुण्याला मंजूर झालेले मेट्रो रेल्वे प्रकल्प हेही पर्यटकांसाठी सुविधाजनक ठरतील. याशिवाय वेरूळ, अजिंठा, एलिफंटा यासारखी लेणी, ७२० किलोमीटर लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. ऐतिहासिक गडकिल्ले, ताडोबासारखी अभयारण्ये व संजय गांधी उद्यानासारखी ५ राष्ट्रीय उद्याने या राज्यात आहेत. पर्यटकांसाठी ही एक पर्वणीच ठरते. राज्य सरकारने या पर्यटन संधींचा लाभ घेण्यासाठी सुयोग्य प्रकारे नियोजन केल्याचे माझे निरीक्षण आहे. विदेशी पर्यटकांचे जास्तीत जास्त प्रमाणात आगमन व त्यामुळे देशाच्या तिजोरीत येणारे विदेशी चलन या दोन्ही बाबातीत राज्याला मोठा वाव आहे. महाराष्ट्र पर्यटनाच्या दृष्टीने समृद्ध होणे हे भारत सरकारलाही हवे आहे.

**केंद्राकडून पर्यटन योजनांना किती मदत मिळणार?**

डॉ. शर्मा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री जयकुमार रावल हे या मुद्द्यावर जेव्हा जेव्हा मला दिल्लीत भेटले तेव्हा मी त्यांना सांगितले



की, राज्याने योजना आखाव्यात, त्यांना केंद्राचे संपूर्ण साहाय्य मिळेल याची खात्री मी देतो. सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असलेल्या महाराष्ट्रात संपूर्ण भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. पंढरपूरची वारी हा एकच विषय घेतला तरी त्यात जी समग्रता व विविधता आढळते ती देशातील फार कमी ठिकाणी आढळते.

**राज्याचे पर्यावरण प्रोत्साहन कसे आहे?**

डॉ. शर्मा - केंद्राच्या स्वदेश दर्शन योजनेच्या अनेक भागात महाराष्ट्रातील पर्यटन योजनांना महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. विदर्भातील लोणार सरोवर हे उल्कापाताने निर्माण झालेले जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर आहे. त्या ठिकाणी पर्यटनसंकुल उभारणे, महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमामुळे पावन झालेल्या वर्ध्यात पर्यटन संकुल उभारणे, चिखलदरा येथील मोझरी पॉइंट येथे सुविधा वाढविणे, प्राचीन गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी राज्य सरकारने विशेष योजना प्रस्तावित केली आहे तिलाही केंद्रातर्फे मदत केली जाईल. रायगड व राजगडावर साऊंड अँड लाईट शो व शिवरायांवरील लघुपट दाखवण्याचा उपक्रम आगामी काही महिन्यांत सुरू होणार आहे. जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी, जायकाच्या सहकार्याने जागतिक वारसा म्हणून घोषित झालेल्या अजिंठा वेरूळ विकास प्रकल्प योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात केंद्रातर्फे संपूर्ण साहाय्य केले जाईल. या प्राचीन लेण्यांचे संवर्धन तसेच अजिंठा-वेरूळ येथील प्रस्तावित क्रूजवे, फूट ब्रिज, पर्यटकांसाठी पाऊलवाटा करणे, साऊंड ॲण्ड लाईट शो, अजिंठा लेण्यांवर फायबर ऑप्टिक प्रकाशयोजना करणे याबरोबरच औरंगाबाद विमानतळाच्या विकासाचे काम प्राधान्यक्रमावर असणार आहे. याशिवाय पितळखोरा लेणी, बीबी का मकबरा, दौलताबाद व पाटनदेवी किल्ले यांच्या निरीक्षण व देखभालीची कामे याच योजनेत समाविष्ट आहेत. पर्यटन व पुरातत्व विभाग ज्यांअंतर्गत आहे ते संस्कृती मंत्रालयही माझ्याकडेच असल्याने या कामांत सुसूत्रता आणणे शक्य होणार आहे.

**समुद्रकिनाऱ्याच्या पर्यटन विकासासाठी कसे साहाय्य करणार?**

डॉ. शर्मा- केंद्राने स्वदेस दर्शन योजनेत सिंधुदुर्ग कोस्टल सर्किट योजनेची निवड केली आहे. यात तोंडवली-वायंगणी येथे समुद्र विश्व प्रकल्प उभारण्याचे राज्य सरकारने निश्चित केले आहे. यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने सुमारे ८३ कोटी रुपयांचा विस्तारित प्रकल्प अहवाल मंजूर केला आहे. पहिल्या हप्त्यापैकी १३ कोटी रुपयाचा निधी राज्याला देण्यात आला आहे. उर्वरित निधी टप्प्याटप्प्याने मिळण्याची व्यवस्था तयार आहे. या योजनेत सागरेश्वर, तारकर्ली, विजयदुर्ग, तोंडवली, मिठावाब, शिरोडा, मोचेमाड समुद्रकिनाऱ्यांवर आवश्यक सुविधा दिल्या जातील. पर्यटन विकास प्रकल्पांच्या प्रत्यक्ष पूर्ततेसाठी किमान ३ ते ४ वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे योजनांमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात समन्वय राहणे व मंत्री पातळीबरोबरच दोन्हींच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या पातळीवरही तो सातत्याने राहणे हे महत्त्वाचे आहे. शिवकालीन किल्ले, बुद्धिस्ट सर्किट यासारख्या प्रकल्पांच्या पूर्ततेत अधिकारी पातळीवरील समन्वय हाही तेवढाच महत्त्वाचा ठरणार आहे.

**- मंगेश वैशंपायन**

ज्येष्ठ पत्रकार, नवी दिल्ली



**इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाचे संकल्प चित्र**


महाराष्ट्राचा ताजमहाल – बीबी का मकबरा, औरंगाबाद

# माझा महाराष्ट्र, मस्त महाराष्ट्र

महाराष्ट्रात अनेक श्रेष्ठ दर्जाची पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळांना मोठ्या प्रमाणावर देश-विदेशातील पर्यटक भेट देत असतात. यापैकी काही महत्त्वाच्या पर्यटनस्थळांची माहिती या लेखात करून देण्यात आली आहे. महाराष्ट्राचा पर्यटन दौरा आखण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरेल.

## औरंगाबाद

### वेरुळ लेणी

वेरुळ येथे प्राचीन काळात कोरलेली १२ बौद्ध, १७ हिंदू आणि ५ जैन अशी एकूण ३४ लेणी आहेत. ही लेणी साधारणत: इ.स.च्या पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरण्यात आली असून प्राचीन भारतातली बौद्ध, हिंदू आणि जैन लेणी या ठिकाणी एकत्र पहावयास मिळतात. वेरूळच्या लेण्यांची हिंदू लेणी, बौद्ध लेणी व जैन लेणी अशी विभागणी केली जाते. १९५१ साली भारत सरकारने वेरूळ लेणी हे राष्ट्रीय स्मारक असल्याचे घोषित केले आणि त्यानंतर ती भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे सोपवण्यात आली. भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले घृष्णेश्वर मंदिर हे वेरुळ लेण्यांपासून जवळच असून हे एक प्राचीन शंकर मंदिर आहे.

### कसे पोहोचाल ?

औरंगाबाद येथे रेल्वेने अथवा बसने पोहोचता येते. शहरापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वेरूळ येथे जाण्यासाठी महामंडळाच्या आणि खासगी बसेस उपलब्ध असतात.

### अजिंठा लेणी

जगविख्यात बौद्ध धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली अजिंठा लेणी ही जगामध्ये भारताला आंतरराष्ट्रीय पर्यटनाची ठळक ओळख करून देणारी महत्त्वपूर्ण लेणी शिल्प. वाघूर नदीच्या परिसराशेजारी असलेल्या अजिंठा लेणीसमूहामध्ये एकूण २१ लेणी आहेत. ही

लेणी नदी पात्रापासून १५-30 मीटर (४०-१00 फूट) उंचीवर विस्तीर्ण अशा डोंगररांगामध्ये कोरलेल्या आहेत.

अजिंठा लेण्यात तथागत गौतम बुद्ध यांच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणारी शिल्पकलेचा अव्दितीय अविष्कार पाहायला मिळतो. अशीही अजिंठा लेणी देशी पर्यटकांसोबतच प्रामुख्याने विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक पसंतीचे पर्यटन स्थळ ठरलेले आहे. चित्रशिल्पकलेचा नितांतसुंदर अनुभव देणाऱ्या या लेण्यांमधून त्या काळी वापरण्यात आलेल्या रंगछटा पर्यटकांना पाहावयास मिळतात.

### कसे पोहोचाल?

औरंगाबाद येथे रेल्वेने अथवा बसने पोहोचता येते. अजिंठा लेणी औरंगाबाद जिल्हयापासून १00 ते ११0 कि.मी. अंतरावर आहे. अजिंठा येथे जाण्यासाठी महामंडळाच्या आणि खासगी बसेस उपलब्ध असतात.

## जालना

### श्री क्षेत्र राजूर

जालना जिल्ह्यातील राजुर (गणपती) हे अत्यंत जागृत गणपतीचे देवस्थान म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात मोरगाव, चिंचवड व राजूर ही श्रीगणेशाची तीन पूर्णपीठे आहेत. राजूर या गावाची नोंद अनेक ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये आहे.

### कसे पोहोचाल?

जिल्हा मुख्यालयापासून साधारण 30 किलोमीटर अंतरावर आहे.

### तीर्थक्षेत्र जांबसमर्थ

समर्थ रामदास स्वामी यांचे जन्मगाव जांबसमर्थ. हे गाव जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात आहे. दरवर्षी जांबसमर्थ येथे रामनवमीला भव्य यात्रा भरते.

### कसे पोहोचाल?

जांब समर्थ हे ठिकाण जालना शहरापासून ८० किमी एवढ्या अंतरावर आहे. जालना येथून बसची सुविधा आहे. जवळचे रेल्वेस्थानक जालना तर विमानतळ औरंगाबाद हे आहे.

## बीड

### वैजनाथ (ज्योतिर्लिंग) मंदिर

'जवा आगळं काशी' म्हणजे काशीपेक्षाही जवभर श्रेष्ठ अशी ख्याती असलेले ठिकाण म्हणजे परळी वैजनाथ. परळी येथील वैजनाथाचे (ज्योतिर्लिंग) मंदिर भारतातील स्वयंभू बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असून ते परळी शहरात आहे.



### कसे पोहोचाल?

नांदेड - पुणे रेल्वेमार्गावर परळी हे ठिकाण आहे. येथे बसने व रेल्वेने जाता येईल. जवळचे रेल्वेस्टेशन परळी आहे. परभणी, बीड, उस्मानाबाद, लातूर येथूनही परळीसाठी बसने जाता येईल.

### नायगाव अभयारण्य

पाटोदा तालुक्यातील नायगाव येथे मयूर अभयारण्य आहे. या अभयारण्यामध्ये मोरांचे थवे पाहावयास मिळतात. मोरांबरोबरच तरस, लांडगे, खोकड, रानमांजर, निलगायी, हरीण, काळवीट इ.प्राणीही नजरेस पडतात. या अभयारण्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला लागून असलेल्या गावकऱ्यांची आणि मोरांची झालेली मैत्री.

उन्हाळ्यात मोरांची तहान भागवण्याचे आणि त्यांची भूक भागवण्याचे काम गावकरी मोठ्या उत्साहाने करतात.

### कसे पोहोचाल?

नायगाव अभयारण्याचे मुख्यालय बीड येथे असून बीड पासून या अभयारण्याचे क्षेत्र बीड-पाटोदा-अहमदनगर या मार्गावर २० कि.मी च्या अंतरावर आहे. या रस्त्यावर एस.टी बस सेवा तसेच खासगी वाहनांनी येथे पोहोचता येईल.

## परभणी

### हजरत सय्यद शाह तुराबुल हक दर्गा

हजरत सय्यद शाह तुराबुल हक (रहे) यांचा अनेक वर्षाची परंपरा असणारा उरुस ३१ जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होतो. असंख्य भाविक सय्यद शाह तुराबुल हक यांच्या दर्शनासाठी येतात. त्यांना श्रद्धेने तुरतपीर बाबा म्हणूनही ओळखतात. सय्यद शाह तुराबुल हक (रहे) हे सुफी पंथाचे मुस्लीम साधू समर्थ रामदास स्वामी यांचे शिष्य मानले जातात. त्यांनी समर्थ रामदास स्वामींच्या दासबोध या ग्रंथाचे उर्दूत भाषांतर केले आहे. मनाच्या श्लोकांना उर्दूत 'मनसमझावन' असे नाव देण्यात आले आहे.

### कसे पोहोचाल?

परभणी शहरापासून हे ठिकाण तीन किमी अंतरावर आहे. येथून बस तसेच खासगी वाहनांची सुविधा उपलब्ध आहे.

जवळचे रेल्वेस्थानक परभणी.

विमानतळ - औरंगाबाद.

### चारठाणा-यादवकालीन शिल्पकला

जिंतूरपासून १८ किलोमीटर अंतरावर असलेले चारठाणा अथवा चारुक्षेत्र हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे. चारठाणा या संपूर्ण दगडी बांधणीच्या यादवकालीन शिल्पकलेने नटलेल्या गावास हेमाडपंथी स्थापत्यकलेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. येथील झुलता स्तंभ पर्यटकांना आकर्षित करतो. हा स्तंभ गावाचे वैभव आहे.

**कसे पोहोचाल?**

परभणी शहरापासून साधारणत: ६२ किमी अंतरावर हे ठिकाण आहे. परभणी येथून चारठाणसाठी एसटीची व्यवस्था आहे. जवळचे रेल्वेस्थानक सेलू. विमानतळ - औरंगाबाद.

## लातूर

### खरोसा लेणी

औसाच्या आग्नेयेस २० कि.मी. वर लातूर- बिदर महामार्गालगत असलेल्या खरोसा गावच्या पूर्वेस ०.४ कि. मी. अंतरावर कुरुंद किंवा जांभा दगडापासून बनलेल्या एका लहान टेकडीत हिंदू लेणी कोरलेली असून ती दक्षिणोत्तर विखुरलेली आहेत. लयनस्थापत्य व शैलीवरून ती बदामीच्या चालुक्यांच्या काळातील म्हणजे इ. ६-७ व्या शतकातील असाव्यात असे विद्वानांचे मत आहे.

**कसे पोहोचाल?**

लातूर- बिदर महामार्गावर औसा गावापासून २० कि.मी. अंतरावर खरोसा गाव आहे.


### उदगीरचा भुईकोट किल्ला

उदगीर येथे असलेल्या भुईकोट किल्ल्यामुळे हे शहर प्रसिद्ध आहे. जिल्हा मुख्यालयापासून ६५ कि.मी. अंतरावर असलेला हा किल्ला इ.स. १४९३ च्या सुमारास बहमनी काळात बांधला गेला असा एक विचारप्रवाह आहे. किल्ल्याच्या बाह्य तटांची बांधणी ही बिदर किंवा गोवळकोंड्याच्या किल्ल्याच्या तटासारखी असून त्यात हिंदू मंदिरांचे दगड बसवलेले आढळतात.

**कसे पोहोचाल?**

मुंबई, पुण्याहून उदगीरला जाण्यासाठी थेट बस सेवा आहे. उदगीर गावातच किल्ला आहे. तिथपर्यंत चालत जाता येते किंवा वाहनाने थेट किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत जाता येते. मुंबई, पुण्याहून लातूर एक्सप्रेसने लातूरला पोहोचल्यानंतर लातूरहून खासगी वाहनाने किंवा बसने उदगीर गाठता येते.


उदगीर किल्ला


नळदुर्ग किल्ला


कंधार किल्ला

## उस्मानाबाद

### श्री तुळजाभवानी

महाराष्ट्राची शक्तिदायिनी अशी जिची ख्याती ती आदिशक्ती तुळजाभवानी! शिवाजी महाराजांचे प्रेरणास्थान! अशा या तुळजाभवानीचे ठिकाण असलेले तुळजापूर म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रासाठी पूजनीय. तुळजापूर हे गाव उस्मानाबाद जिल्ह्यात आहे. तुळजाभवानीचे मंदिर बालाघाट डोंगराच्या एका पठारावर बांधण्यात आले आहे.

**कसे पोहोचाल?**

तुळजापूर हे गाव सोलापूर -औरंगाबाद रस्त्यावर असून सोलापूरहून ४२ कि.मी. अंतरावर आहे तर उस्मानाबादहून २२ कि.मी. अंतरावर आहे.

### नळदुर्ग किल्ला - ऐतिहासिक पार्श्वभूमी

तुळजापूर तालुक्यामध्ये सोलापूर-हैदाबाद या महामार्गावर नळदुर्ग गावाजवळच नळदुर्गचा वैशिष्टपूर्ण किल्ला आहे. वेगवेगळ्या आकाराचे आणि प्रकारचे असे ११४ बुरूज किल्ल्याला आहेत. किल्ल्यामधील उपळ्या बुरूज, जलमहाल, रणमंडळ तसेच तटबंदीमधील नवबुरूज आपले वेगळेपण राखून आहे.

**कसे पोहोचाल?**

नळदुर्ग किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळाच्या बसेस उपलब्ध असतात.

## नांदेड

### कंधारचा किल्ला

महाराष्ट्रातील भुईकोट किल्ल्यामध्ये कंधारचा किल्ला सर्वात मोठा आहे. किल्ल्याचा विस्तार सुमारे २४ एकरचा आहे. संपूर्ण किल्ल्याभोवती १८ फुट खोल १०० फूट रुंदीचा खंदक आहे. एक अप्रतिम भुईकोट किल्ला, आपल्या भक्कम तटबंदी आणि बुरुजासह इतिहास जागवत उभा आहे.

**कसे पोहोचाल?**

नांदेड ते कंधार ३८ कि.मी. असून एसटी

बसेस उपलब्ध आहेत. कंधारचा हा भुईकोट किल्ला कंधार शहरापासून ४ कि.मी.अंतरावर आहे.

### श्रीक्षेत्र माहूरगड

महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान म्हणजे श्रीक्षेत्र माहूरगड. महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पीठांपैकी माहूरचे श्री रेणुकादेवीचे स्थान पूर्ण पीठ मानले जाते. समुद्र सपाटीपासून २६०० फूट उंचीवर असलेल्या दोन शिखरांच्या टोकावर श्री दत्तात्रय आणि रेणुकादेवीचे स्थान आहे. गडाच्या परिसरात माता अनूसया आणि परशुरामाचे मंदिर आहे.

**कसे पोहोचाल ?**

नांदेडपासून १४० कि. मी. अंतरावर माहूरगड आहे. एसटी महामंडळाच्या बसेसही उपलब्ध आहेत.

### नांदेडमधील प्रमुख गुरुद्वारे

नांदेड ही श्री गुरुगोविंदसिंघ यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असल्याने शीख धर्माच्या दृष्टीने या भूमीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिखांच्या पाच पवित्र तख्तांपैकी नांदेड एक आहे.

**कसे पोहोचाल ?**

नांदेड हे मध्य रेल्वेवरील प्रमुख स्टेशन असल्याने देशातील कोणत्याही भागातून नांदेडला रेल्वेने पोहोचता येते. एसटी बसेस, खासगी वाहने उपलब्ध होतात.

## अहमदनगर

### शिर्डीचे साईबाबा

'सबका मालिक एक' आणि 'श्रद्धा व सबुरी' म्हटलं की, डोळ्यांसमोर साईबाबांची मूर्ती उभी राहते. अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे साईबाबांचे वास्तव्य होतं. सर्वधर्मसमभावाचे प्रतीक ठरलेली साईबाबांची शिर्डी जगभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. शिर्डी येथे श्रीराम नवमी उत्सव, श्रीगुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सव साजरे केले जातात. समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान, लेंडीबाग, संग्रहालय (म्युझियम) ही ठिकाणेही प्रेक्षणीय आहेत.

**कसे पोहोचाल ?**

शिर्डी येथे जाण्यासाठी राज्याच्या सर्व भागातून एसटी बसेस उपलब्ध आहेत.

### शनीचे शिंगणापूर

देव आहे पण देऊळ नाही, घर आहे पण दारं नाहीत, असं वैशिष्ट्यपूर्ण गाव म्हणजे शनीचे शिंगणापूर.

अहमदनगर जिल्ह्यातील एक प्रमुख आणि जागृत क्षेत्र म्हणून शनिशिंगणापूर हे राज्यातच नव्हे तर देशभरात प्रसिद्ध आहे. अहमदनगरपासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर नेवासे तालुक्यातील शनीचे

### नांदूर मध्यमेश्वर अभयारण्य

नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यातील नांदूर मध्यमेश्वर अभयारण्य 'महाराष्ट्राचे भरतपूर' म्हणून ओळखले जाते. हिवाळ्यात देश-विदेशातील विविध प्रकारचे पक्षी येथे येत असल्याने ऑक्टोबर ते फेब्रुवारी या कालावधीत पक्षी निरीक्षकांसाठी आणि पर्यटकांसाठी मोठी पर्वणी असते.

**कसे पोहोचाल ? :** नाशिकपासून २२ किलोमीटर अंतरावर अभयारण्याकडे जाणारा रस्ता आहे. २ किलोमीटर अंतरावर सायखेडा आणि तेथून १५ किलोमीटरवर नांदूर मध्यमेश्वर अभयारण्य आहे.



शिंगणापूर हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे.

### श्रीक्षेत्र शिंगणापूरला कसे जावे?

पुणे-औरंगाबाद महामार्गावर घोडेगाव पासून ६ किलोमीटर अंतरावर असलेले शिंगणापूर नगरपासून ४० तर औरंगाबादपासून ७५ किलोमीटर आहे. जवळचे रेल्वे स्टेशन राहुरी हे आहे. तसेच बेलापूर -औरंगाबाद- अहमदनगर रेल्वे स्थानकावरही उतरता येते.

## नाशिक

### त्र्यंबकेश्वर

सह्याद्रीच्या डोंगररांगाचे सौंदर्य स्वत:भोवती लपेटून असलेली त्र्यंबकेश्वराची पावनभूमी अनेक भाविकांचे श्रद्धास्थान आहे.



नाशिकच्या पश्चिमेला 30 किलोमीटर अंतरावर सह्याद्री रांगेतील ब्रह्मगिरी डोंगराच्या पायथ्याशी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर विसावलेले आहे. देशातील बारा ज्योर्तिलिंगापैकी त्र्यंबकेश्वर एक आहे. गोदावरीचे उगमस्थान आणि संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ यांची समाधी त्र्यंबकेश्वर येथे आहे.

दर बारा वर्षांनी येणारे सिंहस्थ कुंभपर्व अनुभवण्यासाठी देशभरातील भाविक कुशावर्तात पवित्र स्नान करण्यासाठी येतात. त्र्यंबकेश्वरलगतच अंजनेरी मंदिर व पर्वत आहे. हे स्थळ हनुमान जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

### कसे पोहोचाल?

नाशिक येथे पोहोचण्यासाठी रेल्वे तसेच एस.टी बसेस मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्र्यंबकेश्वर नाशिकपासून २८ कि.मी आहे.

### श्री क्षेत्र सप्तशृंगगड

राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठापैकी श्री सप्तशृंगी हे आद्य स्वयंभू शक्तिपीठ आहे. एकूण १८ हातात विविध अस्त्र धारण केलेली भगवती ही महालक्ष्मी, महासरस्वती आणि महाकालीचे त्रिगुणात्मक स्वरूप आहे. देवीची मूर्ती ११ फूट उंच असून पूर्वमुखी व डाव्या बाजूस जराशी झुकलेली मान स्वरूपातील अतिसुंदर मूर्ती आहे. गडाचा परिसर अतिशय सुंदर आहे.


### कसे पोहोचाल?

नाशिक येथून दिंडोरीमार्गे ६५ किमी अंतरावर नांदुरी येथे येऊन गुजरात राज्यातून सापुतारा-कनाशी-अभोणामार्गे (सापुतारा- नांदुरी ३६ किमी)

मुंबई-आग्रा महामार्गावरील पिंपळगाव येथून (धुळे-नांदुरी १३० किमी)

एस.टी.बसेस थेट गडापर्यंत जातात.

## जळगाव



### पाल

सातपुडा पर्वताच्या एका पठारावर रावेर तालुक्यात पाल हे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण वसलेले आहे.हे निसर्गरम्य पर्यटनस्थळ रावेरच्या २२.४ किमी पश्चिमेस आहे. पाल येथील जुन्या किल्ल्याचे बुरूज, तट व इतर अवशेष या स्थळाची प्राचीनता दर्शवतात. आभीर अधिपतींचे राज्य असताना येथे त्यांचे स्थानिक मुख्यालय होते. पुढे सत्तेत आलेल्या फारुकीचे देखील येथे ठाणे असावे. गावाजवळील टेकडीवर पाल ऋषींचे स्मारक आहे.

### कसे पोहोचाल?

जळगाव ते रावेर ६५ कि.मी. रावेर ते पाल २६ कि.मी.अंतर असून एसटी बसेस उपलब्ध आहेत.

### गांधी तीर्थ, जळगाव

गांधीवादी विचारवंत व उद्योजक भंवरलालजी जैन यांनी जैन हिल्स परिसरात 'गांधी तीर्थ' साकारले आहे. निसर्गरम्य



परिसरात महात्मा गांधी यांचे जीवनचरित्र, साहित्य, घडामोडी, त्यांची अहिंसा मार्गाची चळवळ, देश-विदेशातील त्यांच्या चळवळींची आठवण करून देणारे हे तीर्थ म्हणजे एक विद्यापीठच ठरले आहे. महात्मा गांधींच्या जीवनावर आधारित एक विशाल संग्रहालय म्हणून गांधीतीर्थाकडे पाहता येईल. जैन हिल्स परिसरातील निसर्गरम्य अशा आमराई असलेल्या भागात चार एकर क्षेत्रात सुमारे ६५ हजार चौरस फूट परिसरात गांधी तीर्थ साकारले आहे. या विशाल भवनात ग्रंथालय, वाचनालय, संग्रहालय, अभिलेखागार, सभागृह आहेत.

### कसे पोहोचाल?

जळगाव येथे रेल्वेने अथवा एस.टी.बसने पोहोचता येते. जळगाव शहरापासून चार

किमी अंतरावर शिरसोली रोडवर (जळगाव- पाचोरा) हे ठिकाण आहे.

## धुळे



### किल्ले लळिंग

पूर्व- पश्चिम असलेल्या गाळणा टेकड्यांवर लळिंग किल्ला आहे. त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ५९३ मीटर आहे. १३ व्या शतकात फारुकी राजवटीत हा किल्ला अत्यंत महत्त्वाचा होता. त्यानंतर मोगल, निजाम, मराठे आणि इंग्रजांनी किल्ल्यावर राज्य केले. दुर्गस्थापत्यात मोगल शैलीचा वापर केलेला दिसून येतो. किल्ल्यावर पाण्याची टाकी, धान्यकोठार आहेत. पायथ्यापासून जवळच असलेला लहानसा घुमट पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो.

**कसे पोहोचाल?**

धुळे- नाशिक मार्गावर, धुळे शहरापासून दक्षिणेला ९ किलोमीटरवर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी लळिंग गाव आहे. गावातून किल्ल्याकडे जाणारी पायवाट जाते. लळिंग गावापासून किल्ल्यावर जाण्यासाठी साधारणतः एक तासाचा कालावधी लागतो.

### समर्थ वाग्देवता मंदिर

धुळे शहरातील तत्कालीन प्रसिद्ध वकील शंकरराव ऊर्फ नानासाहेब देव यांनी श्री समर्थ वाग्देवता मंदिराची स्थापना केली आहे. देव यांनी १८९३ मध्ये सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना केली. सभेच्या माध्यमातून १९३५ मध्ये श्री समर्थ वाग्देवता मंदिराची स्थापना झाली. समर्थ भक्तांची पंढरी म्हणून हे मंदिर ओळखले जाते. येथे विविध भारतीय भाषेतील १०० ते ६०० वर्षांपूर्वीचे दस्तऐवज संग्रहित आहेत. समर्थांनी लिहिलेले वाल्मिकी रामायण हे या संग्रहातील मोलाचा ठेवा म्हणावा लागेल. नंदुरबार जिल्ह्यातील टेंभुर्णे पुरण (ता. शहादे) येथे सापडलेली सतराव्या शतकातील आणि जयदेवाने साकारलेल्या गीतगोविंद या दोनशे पानांच्या मूळ ग्रंथाची प्रत येथे पाहावयास मिळते.

**कसे पोहोचाल?**

धुळे शहरात असून एसटी बसेस उपलब्ध आहेत.

## नंदुरबार



### तोरणमाळ

महाबळेश्वरनंतरचे राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ या जिल्ह्यात आहे. सात खेड्यांनी बनलेला हा परिसर नंदुरबारपासून सुमारे ९० कि.मी. अंतरावर आहे. अक्राणी तालुक्यातील डोंगराळ भागात हे ठिकाण असून समुद्रसपाटीपासून ११४३ मी. उंचीवर वसलेले आहे. प्राचीन काळी मांडू घराण्याच्या राजधानीचे हे ठिकाण होते, तसेच हे नाथ संप्रदायाचे पवित्र स्थळ असून येथे गोरक्षनाथांचे मंदिर व मच्छिंद्रनाथांची गुंफा आहे.

**कसे पोहोचाल?**

नंदूरबारपासून सुमारे ९० कि.मी. अंतरावर असून एसटी बसेस उपलब्ध आहेत.

### गरम पाण्याचे झरे, उनपदेव

शहादा तालुक्यात उनपदेव येथे गरम पाण्याचे झरे आहेत. कडक थंडीच्या काळातही हे झरे आटत नाहीत. श्रीरामचंद्रांनी मारलेल्या बाणामुळे हे झरे निर्माण झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. येथील फत्तेपूर किल्ला व अक्का राणीचा किल्ला प्रसिद्ध आहे.

**कसे पोहोचाल?**

नंदूरबारपासून ४० कि.मी.अंतरावर असून शहादापासून २५ कि.मी.अंतरावर आहे. येथे जाण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध आहेत.

## ठाणे

### येऊर

मुंबई-ठाण्यासारख्या मोठ्या शहरालगत असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा काही भाग ठाण्यात मोडतो. विविध प्रकारच्या वनस्पतींनी हे जंगल समृद्ध असून येथे बिबटे, हरीण, काळवी, मोर, ससे, कोल्हे, रानडुक्कर, सांबर, मगर आदी सर्व प्रकारचे प्राणी आढळून येतात. संजय गांधी उद्यानाच्या ११० कि.मी. जंगलापैकी ४० किलोमीटरचा परिसर येऊरमध्ये मोडतो. येथे विवेकानंद आश्रम, आयुर्वेद पंचकर्म केंद्र आहे. एका दिवसाच्या जंगल सफारीसाठी येऊर एक उत्तम ठिकाण आहे.

**कसे पोहोचाल?**

ठाणे शहरातील उपवन येथून येऊरकडे जाणारा रस्ता आहे. ठाणे रेल्वे स्थानकालगत



येऊरकडे जाणारी बस ठरावीक अंतराने सुटते. पाटोणपाड्यापार्यंत बसने येऊन पुढे जंगलात चालत जावे लागते.

**अंबरनाथचे शिवमंदिर**

शिलाहार राजा शिवभक्त असल्याने त्यांनी १२ शिवमंदिरे बांधल्याचा उल्लेख सापडतो. त्यातील अनेक मंदिरे आता भग्न अवस्थेत असली तरी ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील शिलाहारकालीन शिवमंदिर तत्कालीन स्थापत्यकलेची साक्ष देत उभे आहे. मंदिरातील शिलालेखातील उल्लेखनुसार इ.स. १०५० मध्ये या मंदिराची उभारणी पूर्ण झाली. गेल्या वर्षी या मंदिराने ९५३ व्या वर्षात पदार्पण केले. या मंदिरावरील अप्रतिम कलाकुसर डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे.

**कसे पोहोचाल?**


मध्य रेल्वेवरील अंबरनाथ रेल्वे स्थानकापासून पूर्व विभागात मंदिराकडे जाण्यासाठी रिक्षा उपलब्ध असतात.

**माळशेज घाट**

कल्याण नगर रस्त्यावर माळशेज घाट आहे. आतापर्यंत पावसाळी पर्यटनस्थळ म्हणून प्रचलित असले तरी लवकरच



महाबळेश्वर आणि माथेरानप्रमाणेच एक बारमाही थंड हवेचे ठिकाण म्हणून ते विकसित होत आहे. एम.टी.डी.सी. आणि वन विभागाने घाट परिसरात विकास कामे हाती घेतली आहेत. त्यामुळे पर्यटकांना सोयी उपलब्ध झाल्या आहेत.



चवदार तळे

महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह इतिहासात प्रसिद्ध आहे. तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केला. या लढ्याची आठवण तसेच 'समतेचे प्रतीक' म्हणून पर्यटक या तळ्याला भेट देतात. या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळाही उभारण्यात आला आहे.

**कसे पोहोचाल?** चवदार तळे महाड शहरातच आहे. महाडपर्यंत जाण्याकरिता एसटी बसेस उपलब्ध आहेत.

**कसे पोहोचाल?**

कल्याणहून माळशेजमार्गे पुणे अथवा नगर जिल्ह्यात जाणाऱ्या एसटी बस नियमित उपलब्ध आहेत. कल्याणहून अडीच तासात माळशेजला येता येते.

**वसई किल्ला**

पोर्तुगिजांच्या दृष्टीने गोव्याला जितके महत्त्व आहे तितकेच वसई किल्ल्यालाही आहे. वसई किल्ला तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला आहे. अनेक इमारती, तटबंदी, बुरूज पेक्षणीय आहेत.

**कसे पोहोचाल?**

पश्चिम रेल्वेवर वसई स्टेशन असून स्टेशनलगतच किल्ल्यावर जाण्यासाठी एसटी महामंडळाच्या बसेस तसेच रिक्षांची सोय आहे.

**केळवा समुद्र**

पालघर जिल्ह्यातील केळवे हा समुद्र किनारा पर्यटकांच्या मनाला भुरळ पाडतो. मुंबईच्या जवळ असूनही शांत व स्वच्छ असा हा समुद्रकिनारा आहे. या परिसरात मिठागरे, केळीच्या बागा नजरेस पडतात.

**कसे पोहोचाल?**

केळवे हे मुंबई डहाणूरोड या उपनगरी रेल्वे मार्गावरील केळवे रोड या स्थानकापासून ८ किलोमीटर अंतरावर आहे.

## रायगड

**किल्ले रायगड**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील अत्यंत महत्त्वाचा साक्षीदार असा हा रायगड किल्ला महाड तालुक्यात आहे. रायगडावर रोजी शिवछत्रपतींचा राज्यभिषेक झाला आणि ते खऱ्या अर्थाने छत्रपती झाले. हा किल्ला म्हणजे हिंदवी स्वराज्याची राजधानी होता. आता त्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा दिला आहे. होळीचा माळ, भवानी मंदिर, चित्त

दरवाजा, खुबलढा बुरुज, महादरवाजा, मेणादरवाजा, राणीवसा, पालखी दरवाजा, राजभवन, राजसभा, गंगासागर तलाव, नगारखाना, जगदिश्वर मंदिर, बारा टाकी, वाघदरवाजा, टकमक टोक, रामेश्वर मंदिर व शिवछत्रपती समाधी इत्यादी ठिकाणे तेथे आहेत. वाघ्या कुत्र्याचे स्मारक महाराजांचा होळी माळावरील सिंहासनाधीश्वर पुतळा दारूची कोठारे अशीही अनेक स्थळे बघण्यासारखी आहेत.

**कसे पोहोचाल?**

रायगडला जाण्यासाठी एसटी महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. गडावर जाण्यासाठी रोप वेची व्यवस्था आहे.

### माथेरान

पश्चिम घाटातले मुंबईजवळचे एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणजे माथेरान. वाहनांना प्रवेश निषिद्ध असल्याने हा परिसर



लुईसा पॉइंट

प्रदूषणमुक्त आहे. नेरळहून मिनिट्रेनने माथेरानकडे जाता येते.

माथेरानला जाताना 'टॉय ट्रेनने' होणारा दोन तासाचा प्रवास स्मरणीय असतो. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या या स्थानाला भेट देताना विविध पक्षी, माकडे आणि हिरव्यागार डोंगररांगा सभोवती असल्याने हा प्रवास संपूच नये असे वाटते. सोबत पॅनोरमा, गार्बट, अलेक्झांडर, वनट्री हील, सिमसन आणि शार्लोट तलाव असे विविध पॉईंट पर्यटकांना आकर्षित करतात.

**कसे पोहोचाल?**

मुंबई किंवा पुण्याहून माथेरानला जाताना कर्जतपर्यंत रेल्वे अथवा लोकलने जावे. तेथून नेरळला लोकलने जावे. नेरळपर्यंत एसटी बसेसचीदेखील सोय आहे. नेरळहून 'टॉय ट्रेन' अथवा खाजगी टॅक्सीने जाता येते. खाजगी वाहन मात्र केवळ 'दस्तुरी पॉईंट' पर्यंत नेता येते. त्यानंतर घोड्यावर बसून अथवा पायी भटकंती करावी लागते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील वडिलोपार्जित घराचे स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे. डॉ. आंबेडकर यांचे हे मूळगाव आहे. स्मारक परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून हा परिसर अत्यंत सुंदर आहे.

**कसे पोहोचाल?**

मुंबई ते मंडणगड एसटी बसेस उपलब्ध असून मंडणगडपासून आंबडवे हे गाव १८ किलोमीटरवर आहे.

### श्रीक्षेत्र गणपतीपुळे

सागरकिनाऱ्यावरील रम्य परिसरात श्रीक्षेत्र गणपतीपुळे आहे. परिसरातील उद्यान आणि अथांग समुद्रकिनारा यामुळे हे पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. मंदिराभोवती १ किलोमीटरचा प्रदक्षिणा मार्ग असून तो अत्यंत रमणीय आहे.



**कसे पोहोचाल?**

मुंबई ते रत्नागिरी एसटी बसेस उपलब्ध असून रत्नागिरीपासून २५ कि.मी.अंतरावर हे मंदिर आहे.

## पुणे

### शनिवारवाडा

ही पुणे शहरातील ऐतिहासिक वास्तू आहे. १८व्या शतकात हा वाडा मराठा साम्राज्याचे पंतप्रधान, अर्थात पेशवे यांचे निवासस्थान व कार्यालय होते. भारत सरकारने शनिवारवाड्याला दिनांक १७ जून, इ.स. १९१९ रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून



घोषित केले आहे. वाड्याच्या तटबंदीला पाच दरवाजे असून तटाला ९ बुरूज आहेत. शनिवारवाडा पाहत असताना जागोजागी इतिहासाची साक्ष देणाऱ्या गोष्टी पाहावयास मिळतात. अलीकडे शनिवार वाड्यावर लाईट आणि साऊंड शो आठवड्यातील ठरावीक दिवशी दाखवण्यात येतो.

**कसे पोहोचाल?**

शनिवारवाडा पुणे शहरात असून एसटी बसेस तसेच रिक्षाने सहज पोहोचता येते.

### किल्ले शिवनेरी

हा प्राचीन किल्ला जुन्नर गावाजवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी गडावर झाला होता. या किल्ल्याला चारही

बाजूंनी कठीण चढाव आहे. किल्ल्यावर शिवाई देवीचे छोटे मंदिर व जिजाबाई व बालशिवाजी यांच्या प्रतिमा आहेत. या किल्ल्याचा आकार शंकराच्या पिंडीसारखा आहे. शिवकुंज हे शिवनेरी किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचे स्मारक आहे. शिवकुंजासमोरच कमानी मशीद आहे आणि समोरच खाली पाण्याचे एक टाके आहे.

**कसे पोहोचाल?**

पुण्यापासून अंदाजे १०५ किलोमीटरवर आहे. पुणे ते जुन्नर एसटी बसेसने जाता येते.

**आगाखान पॅलेस**

पुणे शहरातील येरवडा येथे ही ऐतिहासिक वास्तू आहे. सुल्तान मुहम्मद शाह आगाखान द्वितीय यांनी १८९२ मध्ये ही वास्तू बांधली. या वास्तूमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांना सन १९४० मध्ये बंदी म्हणून ठेवण्यात आले होते. कस्तुरबा गांधींचे निधन या वास्तूमध्ये झाले होते. त्यांची समाधी येथे आहे. आता हे भवन एक जगप्रसिद्ध संग्राहलय म्हणून ओळखले जाते.

**कसे पोहोचाल?**

आगाखान पॅलेस पुणे शहरात असून एसटी बसेस तसेच रिक्षाने सहज पोहोचता येते.

**लोणावळा- खंडाळा**

नयनरम्य निसर्गाची मुक्त उधळण लाभलेला हा परिसर मनमोहित करतो. विशेषत: पावसाळ्यात या भागाला पर्यटक मोठ्या प्रमाणावर भेट देतात. हिरव्यागार निसर्गाने नटलेला परिसर आणि डोंगरकड्यावरून वाहणारे धबधबे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करतात. कार्ला - भाजी लेणी, वळवण धरण, राजमाची किल्ला,लोहगड, लॉयन पॉइंट, ड्युक्स नोज, शुटींग पॉइंट, तिकोना किल्ला, टायगर्स लीप पॉइंट त्याचप्रमाणे भूशी धरण आणि पवना लेक, भारतीय नौदलाचे आयएनएस शिवाजी प्रशिक्षण केंद्र इ. ठिकाणांना भेट देता येते.

**कसे पोहोचाल?**

मुंबई -पुणे रेल्वेमार्गावर लोणावळा हे एक प्रमुख स्थानक आहे. मुंबई -लोणावळा बसचे अंतर १०४ तर पुणे लोणावळा हे अंतर ६६ कि.मी.आहे.

## सातारा

**किन्हईचे हेमाडपंथी मंदिर**

कोरेगावच्या उत्तरेला वसना नदीच्या तीरावर वसलेले गाव म्हणजे किन्हई ! गावाच्या पूर्वेकडील टेकडीवर म्हणजेच साखरगडावर यमाई देवीचे मंदिर आहे. या

**कास पठार**

कास पठार हे कातळ खडकाचे कमी प्रमाणात माती व अन्नद्रव्य असलेले पुष्पपठार आहे. कास पठार व परिसरात दुर्मीळ व अतिदुर्मीळ वनस्पती आहेत. रेड डाटा बुकमध्ये जवळपास ४० फुले असणाऱ्या प्रजाती कास पठारावर आढळतात. फुलांसाठी असलेले नैसर्गिक वारसास्थळ म्हणून कास पठार हे वर्ल्ड हेरिटेज समितीकडून नामांकन मिळवलेले एकमेव ठिकाण आहे. ऑगस्ट महिन्याचा शेवट व सप्टेंबर महिन्याची सुरुवात या कालावधीत विविध रंगी फुलांचे गालिचे येथे पाहावयास मिळतात.

कास पठार हे फुलांसाठी एकमेव व नैसर्गिक वारसास्थळ म्हणून नामांकन आणि हेरिटेज साईटचा टॅग प्राप्त झालेले ठिकाण आहे. हेरिटेज साईटचा टॅग दिल्यावर युनेस्को नियम लादत नाही. संबंधित देशाने तेथील कायद्यांची अंमलबजावणी करून साईटचे संरक्षण व संवर्धन करावे एवढा एकच निकष असतो.

**कसे पोहोचाल?**

कास पठार हे साताऱ्यापासून २३ कि.मी. अंतरावर आहे. कास पठारावर एसटी बसेसने जाता येते.



मंदिराला २८ फेब्रुवारी २०१५ रोजी युनेस्कोतर्फे सांस्कृतिक वारसा संवर्धन २०१४ सालातील एशिया पॅसेफिक पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. औंधच्या पंतप्रतिनिधींनी २५० वर्षापूर्वीचे मंदिराचे हेमाडपंथी शैलीतील बांधकाम केले. ते आजही नव्या वास्तुशास्त्राला प्रेरित करणारे आहे.

**कसे पोहोचाल?**

साताऱ्यापासून २५ किलोमीटर आणि कोरेगावच्या उत्तरेला ११ किलोमीटरवर किन्हई हे गाव आहे.

## कोल्हापूर

### करवीर निवासिनी कोल्हापूरची अंबाबाई

कोल्हापूरची अंबाबाई हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक. इ. स. ६३४ च्या सुमारास हे मंदिर बांधण्यात आले. चालुक्य घराण्यातील राजा कर्णदेव याने मूर्तीची प्रतिष्ठापना केली. येथे नवरात्र उत्साहात होतो. हेमांडपंथी प्राचीन बांधकाम असलेले हे मंदिर म्हणजे स्थापत्य शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. अठराव्या शतकात त्यावरील शिखरे बांधण्यात आली. मंदिराच्या बाजूस तटबंदीच्या आत अनेक देवालये असून सूर्याच्या दक्षिणायन व उत्तरायणाच्या प्रारंभीचे तीन दिवस महालक्ष्मीची पावले, शरीर आणि मूर्तीवर सूर्याचे किरण पडतात. मंदिर बंदिस्त असून दिशातंत्राच्या रचनेचा केलेला हा चमत्कार पाहण्यासाठी भक्तांची गर्दी लोटते.

**कसे पोहोचाल?**

कोल्हापूरपर्यंत रेल्वे आणि एस. टी. सुविधा उपलब्ध आहे.

### पन्हाळगड

पन्हाळ्याचा माथा थंडगार वृक्षाने बहरलेला असून पावसाळा वगळता तेथील हवामान आल्हाददायक असते. पावसाळ्यात वर्षाविहारासाठी पर्यटक तेथे जातात. सह्याद्री पर्वताच्या कुशीत माथ्यावर असणाऱ्या



गडांपैकी हा एक महत्त्वाचा दुर्ग आहे. कोल्हापूरची गादी स्थापन करणाऱ्या ताराराणींनी आपली राजधानी काही वर्षे येथेच ठेवली होती. सध्या किल्ल्यावर हॉलिडे होम्स असल्याने पर्यटकांची उत्तम सोय झाली आहे.

**कसे पोहोचाल?**

कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकापासून २३ कि.मी अंतर असून याठिकाणी जाण्यासाठी बसेस, रिक्षाची सुविधा उपलब्ध आहेत.

### शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय

कोल्हापूरच्या वैभवात भर टाकणारी वास्तू म्हणजे न्यू पॅलेस. या सुंदर व देखण्या वास्तुत भव्य वस्तुसंग्रहालय उभारण्यात आले आहे. ऐतिहासिक चित्रे, आरमार, शस्त्रास्त्र आणि शिकार अशी बारा दालने येथे आहेत. वास्तुबाहेरील तलाव, तेथे मुक्त संचार करणारी हरणे, मोर यामुळे ही वास्तू करवीर नगरीचे वैभव बनली आहे. मराठ्यांच्या इतिहासाशी निगडित मौल्यवान वस्तू येथे पाहावयास मिळतात. शहाजी छत्रपती म्युझियम या नावाने हे वस्तुसंग्रहालय प्रसिद्ध आहे.

**कसे पोहोचाल?**

कोल्हापूर मध्यवर्ती बसस्थानकापासून न्यू पॅलेस हे २.५ कि.मी. अंतर असून शाहू जन्मस्थळ ४ कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी जाण्यासाठी बसेस, रिक्षाची सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

### दाजीपूर अभयारण्य

गवा (रानरेडा) अभयारण्य म्हणून दाजीपूर अभयारण्य प्रसिद्ध आहे. हा परिसर संरक्षित असून येथे अंजनी, आंबा, जांभूळ, हिरडा इत्यादी जातीची घनदाट वृक्षराजी आहे. या अभयारण्यात गव्याबरोबरच रानमांजर, बिबट्या, अस्वल, जंगली कुत्रा, भेकर आदी प्राणी आढळतात. पर्यटन महामंडळाने पर्यटकांसाठी येथे निवासाची सोय केली आहे.

**कसे पोहोचाल?**

दाजीपूर अभयारण्य हे कोल्हापूरपासून ८२ कि. मी अंतरावर अंतरावर व राधानगरी पासून २६ कि.मी अंतरावर आहे. या ठिकाणी जाण्यासाठी कोल्हापूर, राधानगरी येथून एस.टी बसेस व खासगी वाहनांचा सुविधा मोठ्याप्रमाणात उपलब्ध आहे.

## सांगली

### चांदोली अभयारण्य

चांदोली राष्ट्रीय उद्यान.. सुमारे ३१७ चौ. कि.मी. क्षेत्रात आणि चार जिह्यांत पसरलेलं नितांतसुंदर आणि रमणीय ठिकाण. वारणा नदीवरील चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात हे उद्यान वसले आहे. पट्टेवाल, आणि बिबळे वाघ, अस्वल, गवे, रानडुक्कर, सांबर, सायाळ, भेकर, रानकुत्री इ.प्राणी, कोकीळ,



मैना, सातभाई, खंड्या, सुतार यासारखे पक्षी तर अजगर, नाग, यासारखे सरपटणारे प्राणी येथे मोठ्या प्रमाणात आढळतात.

**कसे पोहोचाल?**

हे अभयारण्य सांगली, कोल्हापूर रेल्वेस्टेशनपासून ८० किमी. तर पुणे बेंगलोर महामार्गावर कराड ४५ किमी व इस्लामपूरपासून ५५ कि.मी अंतरावर आहे.

**श्रीगणपती मंदिर**

सांगली शहरातील गणपती मंदिर हे सांगलीचे इतिहासदत्त आकर्षण आहे. सांगली संस्थानचे पहिले अधिपती कै. आप्पासाहेब पटवर्धन यांनी हे मंदिर १८४३ साली बांधले. कृष्णा नदीच्या काठी हे देऊळ बांधलेले असून पुरापासून ते सुरक्षित राहावे म्हणून या मंदिराची कल्पकतेने उभारणी करण्यात आली आहे.

सर्व मंदिराचा आकार तीस/चाळीस फूट खोल चुनेगच्चीने भरण्यात आला आहे. कितीही पाणी वाढले तरी ते देवालयात येणार नाही अशी रचना करण्यात आली आहे.

**कसे पोहोचाल?**


सांगली रेल्वे स्टेशनपासून सुमारे अडीच कि.मी. अंतरावर हे श्रीगणपती मंदिर आहे.

**मिरज येथील मिरासाहेब दर्गा**

मिरज शहराच्या लौकिकात व सौंदर्यात भर टाकणाऱ्या ज्या अनेक वास्तू आहेत त्यामध्ये ख्वाजा शमशोद्दिन मिरासाहेबांचा दर्गा हे मिरजेचे खास आकर्षण आहे. हजारो हिंदू-मुस्लिम भक्तांचे हे श्रद्धास्थान आहे. हुतात्मा अवलिया हजरत पीर ख्वाजा शमशोद्दिन हे तुर्कस्थानातील काशगर या गावचे. स्वरसम्राट मरहूम अब्दुल करीम खाँ यांची कबर याच दर्ग्याच्या आवारात असून त्यांचे शिष्य त्यांची पुण्यतिथी येथे संगीत सेवेने साजरी करतात. त्या वेळी दर्ग्यामध्ये सतत तीन-चार दिवस देशातील विख्यात संगीत कलाकार हजेरी लावतात. या भागातील संगीत शौकिनांना ही एक पर्वणीच असते.

**कसे पोहोचाल?**

मिरज रेल्वे स्टेशनपासून सुमारे १ कि.मी. अंतरावर हा दर्गा आहे.



## सिंधुदुर्ग

**सावंतवाडी**

सावंतवाडी हे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दक्षिणेचे शेवटचे शहर. सावंतवाडीच्या पूर्वीच्या सुंदरवाडी या नावातून गावाचे सौदर्य स्पष्ट होते. चारी बाजूला रम्य वनश्रीचे डोंगर आणि मध्ये मोतीतलाव अशी सुंदर रचना सावंतवाडीला लाभली आहे. नरेंद्र डोंगर नावाचा छोटेखानी पर्वत सावंतवाडीची आणि तिच्या सौदर्यांचीच पाठराखण करत उभा आहे. या ठिकाणी सदैव थंडगार असलेले वनउद्यान आहे. चितार आळीतील कारागिरांनी तीनशे वर्षांपासून आजपर्यंत आपली हस्तकारागिरी जोपासली आहे. इथली हस्तकला जगप्रसिद्ध आहे. सावंतवाडीची लाकडी खेळणी प्रसिद्ध आहेत.

**कसे पोहोचाल?**

कोकण रेल्वेने सावंतवाडीपर्यंत जाता येते. सावंतवाडी शहरात जाण्यासाठी एसटी महामंडळाच्या बसेस व रिक्षाची सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

**सिंधुदुर्ग किल्ला**

ज्या जलदुर्गावरून या जिल्ह्याला सिंधुदुर्ग हे नाव देण्यात आले तो सिंधुदुर्ग हे जिल्ह्यातील सर्वात मोठे पर्यटन स्थळ ठरले आहे. हजारो लोक या जलदुर्गाच्या दर्शनासाठी येतात व प्रचंड आकाराच्या खडकांच्या साहाय्याने समुद्रात उभारण्यात आलेल्या या जलदुर्ग निर्मितीबद्दलच्या शिवाजी महाराजांच्या कल्पकतेने भारावून जातात. इतिहासातील नोंदीप्रमाणे १६६४ साली शिवाजी महाराजांनी मालवण समुद्रातील कुरटे नावाने प्रसिद्ध असलेले बेट निवडून त्या बेटावर ४४ एकर क्षेत्रावर या भव्य किल्ल्याची उभारणी केली. दगड आणि प्रचंड खडकांनी वेढलेल्या या बेटावर हा किल्ला बांधण्यासाठी ५०० पाथरवट, २०० लोहार, ३ हजार मजूर आणि शेकडो

कुशल कारागीर सतत तीन वर्षे काम करत असल्याची नोंद या किल्ल्यातील शिलालेखावर आढळते.

**कसे पोहोचाल?**

सिंधुदुर्ग किल्ला कोकण रेल्वेवरील सिंधुदुर्गनगरी रेल्वेस्टेशनपासून ३० कि.मी व कुडाळपासून ३५ कि.मी अंतरावर आहे. किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी एसटी बसेस व रिक्षाची सुविधा उपलब्ध आहे.

**आंबोली**

आंबोली ही सावंतवाडी संस्थानिकांची उन्हाळ्यातील राजधानी व निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण. सभोवताली दाट जंगले, डोंगर, दऱ्याखोऱ्या आहेत. नयनरम्य देखावा व दऱ्यातील सृष्टीसौंदर्य पाहण्यासाठी महादेवगड, कावळेसाद, शिरगावकर, परीक्षित, नट, सावित्री, सनसेट, पूर्वेचा वस असे असंख्य पॉईंट. हिरण्येकेशी नदीचा उगम येथूनच होतो. या ठिकाणचा नांगरतास धबधबा, वनविभागाचे वनउद्यान आणि आंबोलीचा धबधबा पावसाळ्यात पर्यटकांचे खास आकर्षण आहे. आंबोलीपासून जवळच चौकूळ हे निसर्गरम्य गाव लागते. आंबोली-चौकूळच्या जंगलात गवे, हरीण, भेकर, बिबट्या, ससे, रानमांजरे हे वन्यप्राणी याशिवाय असंख्य प्रकारच्या वनौषधी आहेत.

**कसे पोहोचाल?**

कोकण रेल्वेवरील सावंतवाडी रेल्वेस्टेशनपासून २५ कि.मी.अंतरावर आहे. आंबोली घाटापर्यंत एसटी बसेसची सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

## सोलापूर

**पंढरपूर**

अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत पंढरपूरचा विठुराया. पंढरपूरला महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हटले जाते. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला दिंड्या नाचवत लाखो वारकरी पंढरपूरला येतात. पंढरपूर वारकरी संप्रदायाचे केंद्र असून कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि इतर राज्यातील भाविक येथे दर्शनास येतात.

**कसे पोहोचाल?**

पंढरपुरात भविकांना येण्यासाठी एस. टी आणि मिरज, कुर्डूवाडी येथून रेल्वे सुविधा उपलब्ध आहे.

**अक्कलकोट**

अक्कलकोट हे देशभरातील स्वामी समर्थ भक्तांचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. अक्कलकोट शहराच्या बाहेर बनामध्ये एका वटवृक्षाखाली श्री स्वामी समर्थ बसत असत. याच वटवृक्षाखाली असणारी महाराजांची समाधी भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. अक्कलकोटचे संस्थानिक श्रीमंत फत्तेसिंहराजे भोसले (तिसरे) यांनी निर्माण केलेले शस्त्रसंग्रहालय प्रसिद्ध आहे. शहरात असलेले दोन राजवाडे आणि नव्या राजवाड्यामध्ये असलेले हत्यारांचे संग्रहालय पर्यटकांचे आकर्षण आहे.

**कसे पोहोचाल?**

सोलापूरपासून ४० किलोमीटरवर अक्कलकोट हे तीर्थक्षेत्र आहे. अक्कलकोटला जाण्याकरिता सोलापूर रेल्वे स्थानकावरून रेल्वे आणि बससेवा उपलब्ध आहेत.

## अकोला

**नरनाळा किल्ला**

सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये प्रचंड विस्ताराचा नरनाळा किल्ला आहे. संपूर्ण किल्ला परिसर नैसर्गिक कड्यांचा भाग वगळता मजबूत दगडबांधणीने बंदिस्त आहे. या किल्ल्याला असंख्य बुरूज असून २२ दरवाजे आहेत. किल्ल्यावर प्रवेश करण्यासाठी ४ मुख्य दरवाजे असून त्याची नावे दिल्ली दरवाजा, अकोट दरवाजा, शिरपूर दरवाजा व शहानूर दरवाजा अशी आहे. नरनाळा किल्ला परिसरात १३.३५ चौ.कि.मी. अभयारण्य आहे.

**कसे पोहोचाल?**

रेल्वेने अकोला येथे जाता येते. अकोल्यापासून एसटी महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. अकोटपासून किल्ला उत्तरेकडे ३५ कि.मी. लांब असून किल्ल्याकडे जाणारा रस्ता पोपटखेड मार्गे शहानूर या गावावरून जातो.

## बुलढाणा

**लोणार सरोवर**

३० ते ५० हजार वर्षापूर्वी झालेल्या अश्निपातामुळे सुमारे पाऊणे २ किलोमीटर व्यासाचे आणि १० ते ११ कि. मी. परिघाचे एक प्रचंड विवर तयार झाले ते म्हणजे लोणार सरोवर. खाऱ्या पाण्याचा या विस्तीर्ण व नैसर्गिक सरोवराने बुलडाणा जिल्ह्यास आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून दिली आहे. लोणारचा उल्काघाती खळगा हा जगातील ज्ञात विवरामध्ये तिसऱ्या क्रमांकाचा असून बेसॉल्ट खडकात निर्माण झालेले जगातील एकमेव विवर आहे.



**कसे पोहोचाल?**

जालना रेल्वे स्टेशनपासून ६० किलोमीटरवर हे सरोवर आहे. तसेच राज्याच्या विविध भागांतून एस.टी

महामंडळाची थेट बससेवा येथे पोहोचण्यासाठी उपलब्ध आहे.

### शेगाव

श्रीसंत गजानन महाराज यांचे मंदीर असलेल्या या गावाला विदर्भाची पंढरी म्हणून ओळखले जाते. संत गजानन महाराज प्रगटदिन आणि रामनवमीला येथे मोठी यात्रा भरते. श्रीसंत गजानन महाराज संस्थानव्दारा उभारण्यात आलेल्या ३०० एकर क्षेत्रातील आनंदसागर प्रकल्प (आध्यात्मिक केंद्र व मनोहरी उद्यान) भाविकांचे आणि पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

**कसे पोहोचाल?**

शेगांव मध्य रेल्वेच्या मुंबई-नागपूर लोहमार्गावरील महत्त्वाचे स्थानक आहे. राज्याच्या विविध भागांतून एस.टी. महामंडळाची थेट बससेवा येथे पोहोचण्यासाठी उपलब्ध आहे.

## गडचिरोली

### सोमनूर

गडचिरोली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे अंतिम टोक असणाऱ्या इंद्रावती आणि गोदावरी नदीच्या संगमावरचे हे ठिकाण म्हणजे सोमनूर. ते निसर्गाच्या भव्यतेचे दर्शन घडवते. ज्वालामुखीजन्य खडकाचे विविधरंगी नमुने आणि खनिजांनी भरलेल्या दगडात चमकणारे रंग येथे पाहावयास मिळतात.

नदीच्या प्रवाहाने कोरलेले कातळ आणि केवळ नदीच्या प्रवाहाचा आवाज यांच्या जोडीला नदीच्या किनाऱ्यालगत डोलणारी मिरच्यांची शेती आपला आनंद द्विगुणित करते.

**कसे पोहोचाल?**


सोमनूरला चंद्रपूर किंवा गडचिरोली मार्गे येता येते. सिरोंचापासून ६०

## नागपूर

# साहसाचा आनंद

केवळ व्याघ्रदर्शनाने समाधानी न होणाऱ्या पर्यटकांसाठी नागपूरपासून अवघ्या ४०-५० किलोमीटरवर असलेली चेरी फॉर्म आणि त्याच ठिकाणी वसलेले ॲडव्हेंचर व्हिलेज म्हणजे निसर्गसाहस अनुभवण्याचा उत्तम पर्याय आहे. सीएसी ऑलराउंडरचे जनक अमोल खंते यांनी पर्यटकांसाठी ते उपलब्ध करून दिले आहे. नागपूरपासून अवघ्या दीड तासाच्या अंतरावर असलेल्या रामटेक येथे हे ॲडव्हेंचर व्हिलेज उभारण्यात आले आहे.

पॅराग्लायडिंग, पॅरामोटरिंग, पॅरासिलिंग याबरोबरच एटीव्ही मोटरबाईक, छोटासा ट्रॅक्टर आणि एवढेच नव्हे तर सायकलिंगचा आनंद येथे पाणी आणि पहाडाच्या मध्यात अनुभवता येतो. सुरक्षेचा संपूर्ण ताफाच सीएसी ऑलराउंडर या संस्थेजवळ उपलब्ध असल्यामुळेच पर्यटक पहिल्यांदा या कलाकृती करत असले तरीही त्याचा मनमुराद आनंद लुटतात. विशेष म्हणजे पावसाळ्यामध्ये रोवणी करताना उडवला जाणारा चिखल, त्यानंतर निघणारे धानाचे तुरे, त्यावर आलेला पिवळा मोहर आणि हे सर्व हजारो किलोमीटर दूर अंतरावरून पॅराग्लायडिंगच्या माध्यमातून अनुभवताना निसर्गाचे एक वेगळे रूप पाहायला मिळते. साहसासोबत ग्रामीण संस्कृतीची ओळख होते. त्याच वेळी दोन झाडांना बांधलेल्या दोरीचा



एटीव्ही मोटरबाईक चालवण्याचा थरार



पॅरासेलिंग



पॅराग्लायडिंग

केलेला सेतू आणि त्या सेतूवरून समोर सरकत जाणे हाही थरारच असतो.

पर्यटक या ठिकाणी आल्याबरोबरच त्याला चहा, नाश्ता, यानंतर साहसी कलाकृती आणि या कलाकृती करून, दमूनभागून आल्यावर गावातील, रुचकर जेवण. रात्री शेकोटी पेटवून कॅम्प फायर, अशा अनेक गोष्टी पर्यटकांना सीएसी ऑलराउंडरच्या एका छताखाली अनुभवता येतात. पर्यटकांना सर्व माहिती देण्यापासून तर त्यांच्याकडून साहसी कलाकृती करून घेण्यापर्यंत आणि पर्यटकांच्या आदरतिथ्यात संचालक अमोल खंते आणि त्यांची चमू सदैव तत्पर असते.

### हवाई साहसी कलाकृती

पॅरासेलिंग, पॅरामोटरिंग, पॅराग्लायडिंग सोबतचा हॉट एअर बलूनचा थरार पर्यटकांना घ्यायला मिळतो. या साहसी बेटावरील कर्पूरबावरी हे ठिकाण म्हणजे जणू स्थलांतरित पक्ष्यांचे स्वर्ग. पॅराग्लाईड फ्लॉयकॅचर हा दुर्मीळ पक्षी येथेच पाहायला मिळतो. कर्पूरबावरीचे एकावर एक दगड रचून उभारलेले हजारो वर्षापूर्वीचे जुने मंदिर, या मंदिराच्या चौकटीत साचलेले पाणी आणि त्या पाण्यावरचे आपलीच नव्हे तर झाडे, पानाफुलांची सावली अनुभवता येते. चेरींनी भरभरलेल्या झाडांच्या मध्ये टाकलेल्या तंबूत एकाचवेळी तब्बल ३०० साहसी पर्यटक राहू शकतात. रात्रीच्या वेळी या तंबूच्या खिडक्यातून पहाडावर उभा असलेला चंद्र अनुभवण्यात वेगळाच आनंद मिळतो.

**- अनिल गडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

किलोमीटर अंतरावर हे ठिकाण असून एस.टी. बसेस उपलब्ध आहेत.

### आनंदवन

जागतिक स्तरावर ज्याची दखल घेतली गेली आहे असे वरोरा येथील आनंदवन. थोर समाजसेवक डॉ.बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आनंदवनाची स्थापन केली. येथे कुष्ठरोगमुक्त झालेल्या रुग्णांकडून विविध प्रकारच्या वस्तूंची निर्मिती आणि विक्री केली जाते. कुष्ठरोगी तसेच अंध, अपंग व मूकबधीर यांच्यासाठी येथे वेगळे विश्व निर्माण करण्यात आले आहे.

**कसे पोहोचाल?**

नागपूरपासून हे ठिकाण १२५ कि.मी. अंतरावर आणि चंद्रपूरपासून ५५ कि.मीवर आहे. एस.टी.बस आणि रेल्वेने जाता येते.

## नागपूर

### ड्रॅगन पॅलेस टेंपल


कन्हान कामठी येथे ड्रॅगन पॅलेस या बौद्ध मंदिराची स्थापना १९९९ मध्ये करण्यात आली. येथे चंदनाची अत्यंत रेखीव अशी बुद्धाची पुर्णाकृती मूर्ती आहे. ड्रॅगन पॅलेस मंदिर हे 'लोटस टेंपल' नावाने ओळखले जाते.

**कसे पोहोचाल?**

कामठी येथे जाण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध आहेत.

### दीक्षाभूमी

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'दीक्षाभूमी' येथे आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. एकाच दिवशी आणि तेही शांततामय मार्गांनी घडून आलेले जगाच्या इतिहासातील हे सर्वात मोठे धर्मांतर होय. हे बौद्धधर्मीयांचे आदराचे स्थान असून येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक व बौद्ध स्तूप उभारण्यात आले आहे. दीक्षाभूमी या पवित्र स्थानाचे दर्शन



घेण्यासाठी देशातील तसेच परदेशातील मुख्यत्वे जपान आणि थायलंड येथील अनुयायी दरवर्षी भेट देतात.

**कसे पोहोचाल?**

दीक्षाभूमी नागपूर शहरात असून एसटी बसेस उपलब्ध आहेत.

## यवतमाळ

### टिपेश्वर अभयारण्य

पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर अंतर्गत संरक्षित क्षेत्रामध्ये टिपेश्वर अभयारण्याचा समावेश आहे. वाघांसोबतच अस्वल, चांदी अस्वल, निलगाय, रोही, सांबर, चितळ, इत्यादी प्रकारचे प्राणी व निलकंठ, हरीयल, पोपट, गरूड, घार, गिधाड, ससाना, घुबड, तीतर, बटेर, देवचिमनी इ. पक्षीसुद्धा आहेत. मोठ-मोठ्या वृक्षांसह मोठ्या प्रमाणावर औषधी वनस्पती मुबलक प्रमाणात आहेत.

**कसे पोहोचाल?**

यवतमाळ ते पांढरकवडा ४५ कि.मी. अंतर आहे. पांढरकवडा ते टिपेश्वर अभयारण्य ७५ ते ८० कि.मी.अंतरावर आहे. एसटी बसेस उपलब्ध आहेत.

## वाशिम

### श्री नृसिंह सरस्वती जन्मस्थान, कारंजा

श्री दत्तात्र्याचे अवतार म्हणजेच श्री नृसिंह सरस्वती यांचे जन्मस्थान म्हणून वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) ची ओळख आहे. येथे राज्यातून तसेच राज्याबाहेरून अनेक भाविक दर्शनासाठी येतात.

**कसे पोहोचाल?**

वाशिम रेल्वे स्थानकापासून कारंजा ६० कि. मी. अंतरावर आहे. कारंजा हे नागपूर-औरंगाबाद महामार्गालगत असलेले तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी असलेल्या बसस्थानकावर महामार्गावरून जाणाऱ्या बसेस बहुतांशी थांबतात.

### श्री बालाजी मंदिर

वाशिमचा प्राचीन जहागीरदार तसेच बालासाहेब अशी ओळख असलेल्या बालाजीचे मंदिर प्रसिद्ध आहे. हे मंदिर पेशवेकालीन असून मंदिरात चतुर्भुज जनार्धन मूर्ती तथा बालाजी मूर्ती आहे. मंदिराच्या बाजुलाच मोठा तलाव असून देव तलाव, बालाजी तलाव या नावाने हा तलाव ओळखला जातो. वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना असलेले हे मंदिर धार्मिक व पर्यटन क्षेत्र म्हणून सुपरिचित आहे.

**कसे पोहोचाल?**

मंदिर हे वाशिम येथेच असल्याने नागपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, हिंगोली येथून एस. टी. बसची सुविधा उपलब्ध आहे.

लेखन सहकार्य सतीश लळीत, राधाकृष्ण मुळी, मोहन राठोड, डॉ. गणेश मुळे, यशवंत भंडारे, डॉ. किरण मोघे, सर्व जिमाअ. आणि सुनंदा भोर

# ग्रामीण संस्कृतीचा आस्वाद



पर्यटन म्हणजे मनोरंजन, पर्यटन म्हणजे साहस, पर्यटन म्हणजे व्यवसाय किंवा कामानिमित्त केलेला प्रवास होय. धकाधकीच्या जीवनात कामाच्या व्यापातून एक ते दोन दिवस मोकळीक मिळाली की, निवांतस्थळी निसर्गाच्या साह्निध्यात राहण्याची इच्छा माणसाच्या मनात असते. त्यामुळे भटकंतीला जाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटनामध्ये धार्मिक पर्यटनाबरोबरच अलीकडे सांस्कृतिक पर्यटन, खाद्यपर्यटन, पर्यावरण पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, आणि झपाट्याने विकसित होणारे 'कृषी पर्यटन' यांचा समावेश होतो.

केल्याने देशाटन, पंडीत मैत्री; सभेत संचार। शास्त्र ग्रंथ विलोकन, मनुजा येतसे चातुर्य फार' असे कवींनी लिहून ठेवले आहे. मनुष्याला चतुरपण येण्यासाठी ग्रंथवाचन, पंडीतांची मैत्री, सभेत संचार आणि त्याचबरोबर देशाटन महत्त्वाचे आहे. पर्यटन, भटकंती करणे ही मनुष्याची स्वाभाविक आवड आहे. पर्यटनाला हजारो वर्षांची परंपरा आहे. मनुष्याच्या उत्क्रांती बरोबरच त्याची भटकंती होत राहिली आहे, कामाच्या निमित्ताने मनुष्याचा प्रवास होतो. परंतु पर्यटन ही संज्ञा प्रवास (टूर) या शब्दाशी संबंधित आहे. लॅटीन भाषेतील TORNOS या शब्दापासून आलेला टूअर हा शब्द म्हणजे प्रवास. त्याचा मुळ अर्थ वर्तुळ आहे. पुढे याच शब्दापासून वर्तुळाकार प्रवास किंवा पॅकेज टुर्स हा शब्द रूढ झाला. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार २१ व्या शतकातील सर्वात झपाट्याने वाढणाऱ्या व्यवसायामध्ये आतिथ्य, पर्यटन हे व्यवसाय आहेत. सुट्टी मिळाली की, आपल्या कुटुंबासह, मित्रपरिवारासह फिरायला निघणे, गर्दीने वेढलेल्या स्थळाऐवजी निसर्गाच्या सान्निध्यात निवांत शांततेचे क्षण अनुभवायला जातात.

**अतिथी देवो भवः**

'अतिथी देवो भव:' ही आपली भारतीय संस्कृती आहे. या संस्कृतीचा अनुबंध कृषिप्रधान भारताशी आहे. भारतीय संस्कृती ही मुख्यतः ग्रामीण भागाशी निगडित असल्याने प्रत्येकालाच आपल्या ग्रामीण संस्कृतीची ओढ असते. शहरातील धकाधकीच्या जीवनात कंटाळलेल्या प्रत्येक

व्यक्तीला आनंद घेण्यासाठी निवांतपणे निसर्ग सान्निध्यात जावेसे वाटते म्हणून 'कृषी पर्यटन' हा अलीकडे झपाट्याने विकसित



झालेल्या पर्यटनाचा प्रकार आहे.

'गाव आणि गावपण' हरवत चाललंय असे आपण म्हणतोय परंतु आजही खेड्याची ओढ असलेले शहरी भागातले लोक आपल्या ग्रामीण संस्कृतीशी नाते टिकवून ठेवण्यासाठी आणि नवीन पिढीला या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी खेड्यात जातात.

### महाराष्ट्राचे अग्रेसरत्व

कृषी पर्यटनाचा उगम साधारणत: ७० वर्षापूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये झाला. ऑस्ट्रेलिया, इटली, जपान, कॅनडा व युरोपीय देशामध्ये कृषी पर्यटन हे अधिक मोठ्या प्रमाणात होते. देशात कृषिपर्यटनाची चळवळ सुरू करणारे महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्रात प्रथम बारामती येथे स्व. आप्पासाहेब पवार यांनी शेतीत नवनवीन प्रयोग केले. शेतीतील प्रयोग पाहण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची नि:शुल्क राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली जात असे. कालांतराने शुल्क आकारून कृषी अभ्यास दौरे आयोजित केले जाऊ लागले. अशा तऱ्हेने महाराष्ट्रात कृषी पर्यटनाचे बीज रोवले गेले. महाराष्ट्रामध्ये कृषी पर्यटन महासंघ तयार करण्यासाठी बारामतीचे पांडुरंग तावरे यांनी पुढाकार घेतला त्यांच्या प्रयत्नामुळेच महाराष्ट्रामध्ये तीनशेपेक्षा जास्त कृषिपर्यटन केंद्रे चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. नेरळ येथे चंद्रशेखर भडसावळे यांनी 'सगुणाबाग' कृषिपर्यटन केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्याला कृषिपर्यटन हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे हे सिद्ध केले. कृषी पर्यटनामध्ये शेतकरी आपला शेती व्यवसाय सांभाळून आलेल्या पर्यटकांना शेतीतील पिकवली जाणारी पिके, पाटाचे पाणी, बैलगाडीत बसून फेरी, झुणका - भाकर, हुरडा यातून महाराष्ट्रीयन ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देतात. शेतकरी आपल्या शेतात निवासासाठी काही खोल्यांचे बांधकाम करून राहण्याची व्यवस्था करतात. सर्व पर्यटकांना एकत्रित बसता यावे यासाठी ग्रामीण पद्धतीचा सभामंडप, बहरलेली शेती, पिके, म्हैस, गाय, शेळी यांचे दूध पारंपरिक पद्धतीने काढणे, चुलीवरचा स्वयंपाक आपुलकीने खाऊ घालणे आणि त्याबरोबर महाराष्ट्रीयन लोककलांची ओळख अनेक शेतकरी करून देत आहेत.

### कृषी पर्यटनाचे फायदे

कृषी पर्यटनाचे अनेक फायदे आहेत, शेतातील स्वत:च्या जागेतच कृषी पर्यटन केंद्र सुरु करता येत असल्यामुळे स्वतंत्र जागेची किंवा अतिरिक्त मोठ्या भांडवलाची गरज पडत नाही. शेतकऱ्यांसह गावातील युवकांना गावपातळीवर रोजगार उपलब्ध होतो. आज अनेक शेतकरी सेंद्रीय पद्धतीने शेती करीत असून त्यांनी शेतीत पिकवलेला हा ताजा माल शहरातल्या पर्यटकांना सहजतेने मिळतो. गावातील महिला बचत गटांनी तयार केलेला माल, वस्तू यांची विक्री करता येते.



### आदरातिथ्य

फिरण्यासाठी घराबाहेर पडलेला पर्यटक चांगल्या आदरातिथ्याची अपेक्षा करतो. त्यामुळे आदरातिथ्य याकडे कृषी पर्यटन चालवण्याऱ्या उद्योजकाने भांडवल म्हणून बघितले पाहिजे, त्याचबरोबर स्वच्छता, निटनेटकेपणा हाही व्यवसायाच्या भांडवलाचाच भाग आहे. ज्या ठिकाणी या सर्व गोष्टी मिळतात त्याठिकाणी ग्राहक-पर्यटक यांची पसंती अधिक असते. शहरातील आलेल्या पर्यटकांना शेती व्यवसाय व ग्रामीण जीवन पद्धतीविषयी जाणून घेण्याची उत्सुकता असते. शेतीविषयक कामामध्ये त्यांचा सहभाग करून घेतला तर त्यांना अत्यंत आनंद मिळतो.

महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ (मार्ट) या संस्थेच्या वतीनेही १६ मे, हा दिवस जागतिक कृषीपर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राज्यातील कृषी पर्यटनामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकऱ्यांना, उद्योजकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

राज्याच्या पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील पर्यटन वाढीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. 'महाभ्रमण' 'निवास-न्याहारी' असे उपक्रम अत्यंत पर्यटकप्रिय झाले आहेत. त्यात कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी महामंडळाने मोठा वाटा उचलला आहे. नियोजनपूर्वक व्यवस्थितपणे ग्रामीण कलासंस्कृतीचा वापर करून, कृषी पर्यटन यशस्वी होऊ शकते हे महाराष्ट्रात अनेक शेतकरी-युवकांनी सिद्ध केले आहे.

**- शिवाजी मानकर**
संचालक (माध्यम समन्वयक),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई



# या, बघा, आनंदी व्हा...

महाराष्ट्र देशातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे राज्य असून हा प्रदेश १७ टक्के वनांनी नटलेला आहे. आपल्या राज्यात तब्बल ५७ अभयारण्ये आणि ताडोबा-अंधारी, पेंच, मेळघाट, सह्याद्री, नवेगाव-नागझिरा, बोर असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. येथे सदाहरित, निम सदहारीत, उष्ण कटिबंधीय पानगळीची, शुष्क पानगळीची, खारफुटीची अशी अनेक प्रकारची वने आहेत. विदर्भात प्रचंड डरकाळी फोडणारे देखणे रुबाबदार वाघ, मराठवाड्यात लांब ढांगा टाकत उड्या मारणारे चिंकारा, काळवीट, धिप्पाड माळढोक पक्षी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण किनारपट्टीवर विविध प्रकारचे सरीसृप, औषधी वनस्पती, अनोखे सागरी जीव सापडतात.

**बोर व्याघ्र प्रकल्प**

सातपुडा मैकल पर्वतरांगांमध्ये नागपूरची दक्षिण सीमा आणि वर्धा जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर बोर व्याघ्र प्रकल्प आहे. या प्रकल्पात वाघ, १६० प्रजातीचे पक्षी, २६ प्रकारचे सरीसृप आणि अनेक वन्यजीव आहेत. बोर धरणाजवळ उंच डोंगरात वसलेले बुद्धविहार विलोभनीय आहे. येथून जवळच वर्धा इथे महात्मा गांधी यांच्या सहवासाने पावन झालेले सेवाग्राम, आचार्य विनोबा भावेंचे पवनार आश्रम आहे. गीताई मंदिर, विश्वशांती स्तूप, मगन संग्रहालय अशी भेट देण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. इथल्या गोरस भांडारातील शुद्ध तुपातल्या गोरसपाक या मिठाईची चव नक्की घ्या.

**जायचे कसे?**

हवाईमार्ग – डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर ८० किमी आहे. रेल्वेमार्ग – वर्धा रेल्वेस्थानक ३५ किमी आहे. रस्ता– जवळचे हिंगणी बसस्थानक ५ किमी.

**मेळघाट व्याघ्र प्रकल्प**

सातपुडा -मेकल पर्वतरांगांचा अविभाज्य भाग असलेला मेळघाट व्याघ्र प्रकल्प देशातील प्रचंड मोठ्या क्षेत्रफळाचा आहे. हा व्याघ्र प्रकल्प गुगामल राष्ट्रीय उद्यान, मेळघाट , वान, अंबाबरवा आणि नरनाळा या अभयारण्यापासून निर्माण झाला आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्हयाच्या सीमेत हा प्रकल्प असला तरी याचा सर्वाधिक भाग अमरावती जिल्ह्यात आहे. पूर्वेला जाफ्राबाद, मध्ये नरनाळा आणी पश्चिमेला तेल्यागड हे किल्ले आहेत. नरनाळा किल्ला देखणा आहे. याचे क्षेत्रफळ ३१२ किमी व भिंत ३६ किमी लांब आहे. या प्रकल्पातही वाघ आहेत. या भागात ९० प्रकारच्या वृक्ष प्रजाती, ६६ प्रकारची झुडपे, ३१६ प्रकारच्या वनस्पती, ५६ प्रकारच्या वेली आणि गवताचे ९९ प्रकार आहेत. या जंगलात कोरकू आदिवासींच्या संपन्न संस्कृतीचे निरीक्षण तुम्हाला करता येईल.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर २४० किमी आहे. रेल्वे मार्ग - बडनेरा जंक्शन ११० किमी आहे. रस्ता - परतवाडा मार्गे धारणी आणि बुऱ्हाणपूरवरून बसेस मिळतील.

**नवेगाव-नागझिरा व्याघ प्रकल्प**

घनदाट वनांचा नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प गोंदिया आणी भंडारा जिल्ह्यात वसला आहे. कधीकाळी येथे हत्ती होते. हत्तीला संस्कृत भाषेत नाग म्हणतात. त्यावरूनच याला नागझिरा नाव आहे. पूर्वी इथे बाराशिंगे, रानम्हशी, शेकरू असल्याचे निसर्गअभ्यासक सांगतात. आताही नागझि-यात वाघ, बिबट, रानकुत्रे, रानगवे आणि असंख्य वन्यजीव आहेत. कोलू पाटलाने बांधलेला प्रचंड विस्ताराचा नवेगाव बांध तलाव, त्यातून दिसणारे मालडोंगरी, गम्फी, कोलेसुर पहाड, नवेगाव राष्ट्रीय उद्यानातील बोदराई अशी अनेक ठिकाणे बघण्यासारखी आहेत. नवेगाव बांध तलावावर स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात येतात. संपूर्ण लाकडाने निर्मित संजयकुटीत मुक्काम करण्याची मज्जाही काही औरच. भंडाऱ्यापासून २० किमी अंतरावर कोका अभयारण्यसुद्धा भेट देण्यास उत्तम आहे. या भागात वृक्ष वनस्पतीच्या ३६४ प्रजाती तर, सरीसृप ३६ प्रजापतीचे आहेत. शिवाय पक्षी १६६ प्रजाती आणि फुलपाखरे ४९ प्रजातीची आढळतात. येथून जवळच इटीयाडोहचा विस्तीर्ण जलाशय आहे. जवळची तिबेटीयन वस्तीही भेट देण्यासारखी आहे. या वस्तीत तिबेटीयन शैलीचे सुंदर बुद्धविहार आहे. शिवाय ट्रेकिंग, हायकिंगचा आनंद घेण्यासाठी उंच प्रतापगड आहे. इथे वटवाघळच्या अनेक प्रजाती आहेत.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग - नागपूर विमानतळ १२०किमी आहे. रेल्वेमार्ग - भंडारा रेल्वेस्टेशन ५०किमी, गोंदिया ५०किमी, सौन्दड २०किमी, तर तिरोडा रेल्वे स्टेशन २०किमी आहे. रस्ता - साकोलीपासून २२ किमी (राष्टीय महामार्ग क्र.६ मुंबई- कोलकाता ) तर गोंदिया जिल्हा मुख्यालयापासून ६० किमी अंतरावर बसस्थानक आहे. नागपूर १२०किमी आहे.



**पेंच व्याघ प्रकल्प**

उत्तर ते दक्षिण वाहणाऱ्या पेंच नदीवरून या प्रकल्पाला हे नाव पडले आहे.

या व्याघ्र प्रकल्पात वाघासोबतच १६४ प्रजातीचे पक्षी आहेत. यातील मलबार पाईड हॉर्नबिल हा सुंदर धनेश पक्षी आणि व्हाईट रम्प्ड, लोंग बिल्ड, व्हाईट स्क्हेजर, किंग व्हल्चर या चार गिधाडांच्या प्रजाती बघायला मिळतात. आंबाखोरी धबधबा हिवाळ्यात बघण्यास उत्तम आहे. इथे रानगवे आणि इतर वन्यजीवही भरपूर आहेत.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग- जवळचे विमानतळ नागपूर ७० किमी. रेल्वे मार्ग- जवळचे रेल्वे स्टेशन नागपूर ७० किमी. रस्ता - बस नागपूरवरून उपलब्ध.

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्प**

पश्चिम घाटातील महत्त्वपूर्ण जैवविविधता असलेला हा व्याघ्र प्रकल्प चांदोली राष्टीय उद्यान आणि कोयना अभयारण्य मिळून तयार झाला आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प परिसरातून वारणा, कोयना नद्या वाहतात कोयना आणि चांदोली धरण याच नद्यांवर बांधले आहेत . येथे तब्बल १५०० प्रजापतीच्या वनस्पती आहेत. त्यात 300 वनौषधी प्रजाती आहेत. कारवी, निर्गुडी, अडुळसा, शिकेकाई, रानचमेली, सर्पगन्धा, धायटी, ज्याची आंतरराष्ट्रीय तस्करीच्या बाजारात मोठी मागणी आहे अशी नरक्या ही वनस्पती येथे आहे. येथे वाघासह ३६ प्रजातीचे प्राणी आहेत. राज्यप्राणी शेकरूसुद्धा आढळते. हे निमसदाहरित आणि मिश्र पानगळीचे जंगल आहे. येथे पक्षी प्रजाती २३० आहेत. त्यातही निलगिरी वूड पिजन हा दुर्मीळ पक्षी आणि नदीसुरयची वीण होते. १२५ प्रजातीची विविधरंगी फुलपाखरे आहेत. भारतातील

सर्वात मोठे सदर्न बर्ड विंग आणि सर्वात लहान ग्रास ज्वेल ही फुलपाखरे इथे आढळतात. इथे शिवसागर जलाशय, वासोटा किल्ला, नागेश्वर मंदिर, ओझर्डे धबधबा, कास पठार, चाळकेवाडी पठार, झोळबी पठार बघण्यासारखे आहे.

जायचे कसे ?

कोयनानगर- कोल्हापूर १३०किमी, कराड- ५६किमी, सातारा ९० किमी, पाटण २०कि मी, चिपळूण ४५ किमी, चांदोली- मुंबई ३८० किमी, पुणे २१० किमी, सांगली ९८ किमी, कोल्हापूर ८० किमी, रेल्वे स्टेशन - सांगली ९८ किमी, मिरज जंक्शन ११०किमी, कोल्हापूर ८० किमी, कराड ६० किमी, विमानतळ- पुणे २१० किमी, कधी जावे-नोव्हेबर ते मार्च.

### ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्प

ताडोबा राष्ट्रीय उद्यान (११६.५५ चौ. किमी), अंधारी अभयारण्य (५०८.८५ चौ. किमी ) मिळून (६२५.४० चौ.किमी) चे हे व्याघ्र प्रकल्प आहे. ताडोबा राष्ट्रीय उद्यानाला तारू या आदिवासींच्या देवावरून हे नाव मिळाले. तर, अंधारी अभयारण्याला घनदाट अंधाऱ्या जंगलातून वाहणाऱ्या अंधारी नदीवरून. येथे वृक्षांच्या १४१ प्रजाती आहेत. इथले सर्वात मोठ आकर्षण अर्थातच वाघ आहे. शिवाय २८० हून अधिक पक्षी प्रजाती आहेत. ७० प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजाती आहेत. या प्रकल्पाच्या सीमेवर रामदेगी आहे. पावसाळ्यात इथे सुंदर धबधबे, निर्झर वाहत असतात. पराक्रमी गोंडराणी हिराईने बांधलेले चंद्रपूरची कुलदेवता माता महाकालीचे मंदिर आहे. अचलेश्वर मंदिर, राणी हिराईने बांधलेली तिचा पती राजा बिरशहा याची भव्य समाधी मोगलकालीन शैलीची आठवण करून देते. भद्रावती तालुक्यात बौद्ध काळातील विजासन लेणी, जैनधर्माचे पार्श्वनाथ मंदिर, जिवती तालुक्यातील माणिकगड किल्ला हे सारे बघण्यासारखे आहे.




जायचे कसे?

हवाई मार्ग - नागपूर विमानतळ १५५ किमी. रेल्वे मार्ग -चंद्रपूर रेल्वे स्टेशन ४५ किमी. रस्ता चंद्रपूर बसस्थानक ४५ किमी.

कधी बघावे?- तसे वर्षभर. पण, फेब्रुवारी ते मे वन्यजीव दर्शनाची संधी अधिक असते.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

मुंबईसारख्या महानगरातील हिरवाई म्हणजे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान. इथे बिबट आढळतात. इथल जंगल मुंबईला पाणी पुरवते म्हणून मौल्यवान आहे. इथे २७ प्रजातीचे पक्षी आणि ३५ प्रकारचे सस्तन प्राणी असून ७८ प्रजातीचे सरीसृप आहेत. तसेच १७० प्रजातीची फुलपाखरे आहेत.

जायचे कसे?

हवाई मार्ग- मुंबई विमानतळ १५ किमी. रेल्वे - मुंबई ते बोरेवली ३० किमी., रस्ता - मुंबई -अहमदाबाद महामार्गवर बोरीवली बस स्थानक

### भामरागड अभयारण्य

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड अभयारण्य १०४.३८ चौ.किमी क्षेत्रफळ आहे. पर्णकोटा, पामूलगौतम नद्या इथून वाहतात. दक्षिण उष्णकटिबंधीय शुष्क पानगळीचे जंगल असून सागवान मुख्य प्रजाती आहे. तसे इथे ६९ प्रकारचे वृक्ष, १५ प्रकारची झुडपे, ७३ वनस्पती, ४७ प्रकारचे गवत, ४१ लतावर्गीय वनस्पती आहेत. एकेकाळी हे ऐतिहासिक शिकार क्षेत्र होते. याच जिल्ह्यात चपराळा अभयारण्य आहे. १३४.७८ चौ.किमी हे अभयारण्य २५ फेब्रुवारी १९८६ मध्ये जाहीर करण्यात आले. वर्धा-वेनगंगा नदीचा संगम चपराळा या गावाजवळ होतो. इथून ती प्राणहिता नावाने पुढे वाहत जाते. तेलंगणा राज्याजवळ हे अभयारण्य आहे. ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्प आणी छत्तीसगड राज्यातील इंद्रावती व्याघ्रप्रकल्प यातील वन्यजीवाचा कोरिडोअर म्हणून हे अभयारण्य ओळखले जाते. इथून पुढे सिरोंचा तालुक्यात प्राणहिता अभयारण्य आहे. मंचेरीयलपासून ३५ किमी दक्षिण पठारावरील वैशिष्टपूर्ण प्रागेतिहासिक भोगोलिक रचनेमुळे येथे पक्षी, प्राण्यांची विविधता आहे. डायनोसोर आणि प्रागेतिहासिक काळातील वृक्षांचे अवशेष (फासिल्स) सापडले आहेत. १३६ चौ. किमीचे हे अभयारण्य आहे. येथे नीलगाय, अस्वल, वाघ, बिबट, रानमांजर, ताडमांजर,हुदाळे (इंडियन ऑटर्स) दिसतात. या शिवाय अहेरी - भामरागड मार्गावर ग्लोरी ऑफ आलापल्ली हे अजब ठिकाण आहे. या भागातील गगनचुंबी महाकाय वृक्ष बघून कुणालाही आश्चर्याचा धक्का बसेल. इथल्या सागवान, कळंब, हल्दूच्या वृक्षाला मिठी मारण्यासाठी पाच - सहा जणांचे रिंगण करावे लागते. इथून जवळ कमलापूर हत्ती क्यांप आहे. आष्टीजवळ कोनसरी हे शेकरू या खारीचे वीणीचे ठिकाण आहे. कोलामार्का हे रानम्हशीचे संरक्षित क्षेत्र सिरोंचा तालुक्यात आहे. मध्यभारतीय शुद्ध प्रजातीच्या ५० रानम्हशीपैकी १५ ते २० इथे आहेत. जेर्डनचा कोर्सर हा दुर्मीळ पक्षी इथे आहे. डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचा हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्पही याच जिल्ह्यात आहे. कालेश्वर, सोमनूर, व्यंकटापूर ही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

जायचे कसे?

हवाई मार्ग- नागपूर विमानतळ, रेल्वे मार्ग - बल्लारपूर रेल्वे स्टेशन आष्टी येथून ६० किमी आहे. रस्ता - बल्लारपूर, गडचिरोली, चंद्रपूर येथून बस उपलब्ध.

### देऊळगाव - रहेकुरी अभयारण्य

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील काळविटांसाठी ओळखले जाणारे १९८० मध्ये फक्त १५ काळविटांपासून सुरू झालेले हे अभयारण्य आता ४०० काळवीट

सांभाळते. याचे क्षेत्रफळ २१७.30 हेक्टर आहे.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग – पुणे विमानतळ १६५ किमी, रेल्वे अहमदनगर ५५ किमी, रस्ता – अहमदनगर ५५ किमी

**ज्ञानगंगा अभयारण्य**

बुलढाणापासून ८ किमि अंतरावर २०५ चौ.किमीच्या या अभयारण्यात दोन तलाव आहेत. याच्या जवळून ज्ञानगंगा नदी वाहते. हे अभयारण्य बघण्याचा हंगाम फेब्रुवारी ते मे आहे. इथे १५0 प्रजातीचे पक्षी आहेत.



**जायचे कसे?**

हवाई मार्ग – ओरंगाबाद विमानतळ किवा चीखलठाणा विमानतळ, रेल्वे – खामगाव रेल्वे स्टेशन २० किमी, रस्ता – बुलढाणा बस स्थानक ८ किमी खामगाव २० किमी.

**नान्नज माळढोक अभयारण्य**

भारतीय उपखंडातील अतिदुर्मीळ माळढोक (ग्रेट इंडियन बसटार्ड) या पक्ष्यासाठी हे खास अभयारण्य आहे. हे पक्षी गुजरात, महाराष्ट्रातील नान्नज आणि चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात आढळतात. कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्य प्रदेशात आढळतात. १९७९ माळढोक संरक्षणासाठी हे अभयारण्य घोषित करण्यात आले.

उत्तर सोलापूर, माढा, मोहोळे, कर्माळा हे सोलापूर जिल्ह्याचे तालुके आणि औरंगाबाद जिल्ह्यातील कर्जत, श्रीगोंडा, नेवासा या तालुक्यातील तब्बल ८४९६.४४ चौ.किमी क्षेत्रफळाचे हे अभयारण्य आहे. या अभयारण्याचे मुख्यालय सोलापूर जिल्ह्यातील नान्नज आणी अहमदनगर जिल्ह्यातील रेहेकुरी येथे आहे.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग – जवळचे विमानतळ पुणे, रेल्वे मार्ग – सोलापूर २५ किमी., रस्ता– सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गापासून 10 किमी.

**जायकवाडी पक्षी अभयारण्य**

औरंगाबाद आणी अहमदनगर जिल्ह्यात हे अभयारण्य वसले आहे. याला पक्षी मित्रांचा स्वर्ग म्हटले तरी वावगे ठरणार नाही. इथे २०० प्रजातीचे पक्षी असून यात ७० स्थलांतरित पक्ष्यांचा समावेश आहे. 3७ प्रजातीचे वृक्ष, वनस्पती आहेत. काळवीट लांडगे, कोल्हे, रानससा असे प्राणी आहेत.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग – औरंगाबाद ५० किमी, रस्ता – औरंगाबाद ५० किमी, अहमदनगर ७५ किमी.

**भीमाशंकर अभयारण्य**

पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यात 130.७८ चौ.किमी क्षेत्रफळाचे हे अभयारण्य १९८५ मध्ये जाहीर करण्यात आले. पश्चिम घाटाच्या माथ्यावर दुर्मीळ प्राणी पक्षी सांभाळून असणारे हे अभयारण्य पर्यटकांचे आवडते आहे. राज्य प्राणी शेकरूचे हे माहेरघर मानले जाते. पश्चिम घाटाच्या उत्तर भागातील अस्पर्श जंगल मन मोहून घेते. कृष्णेच्या भीमा आणि घोड या उपनद्यांचा उगम येथून होतो.

**जायचे कसे?**

हवाई मार्ग – पुणे 10२ किमी. रेल्वे– पुणे 130 किमी. रस्ता – मंचर ६२ किमी. (पुणे–नाशिक महामार्ग). हंगाम नोव्हेंबर ते मार्च उत्तम आहे.


**– मिलिंद उमरे**

(लेखक जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.)

संपर्क: ९४२३४२२३४८

# दुर्गभ्रमंती

जागतिक वारसास्थळांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांना स्थान मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. रायगड, राजगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग या किल्ल्यांची प्राथमिक स्तरावर पुरातत्व विभागाकडून निवड केली गेली. या किल्ल्यांचे पर्यटन वेगळीच अनुभूती पर्यटकांना देत असते.



जागतिक वारसास्थळांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांना स्थान मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न सुरू केले आहेत.

शासनातर्फे काही महिन्यांपूर्वी पुरातत्व विभागाच्या माध्यमातून एक सर्वेक्षण केले गेले. या सर्वेक्षणातून रायगड, राजगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग या किल्ल्यांची प्राथमिक स्तरावर पुरातत्व विभागाकडून निवड केली गेली. या किल्ल्यांना जागतिक वारसास्थळ हा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे देखील काम सुरू झाले आहे. हे सर्व किल्ले कोठे आहेत आणि त्यांचे महत्त्व काय आहे हे वाचकांनी जाणून जाणून घेणे गरजेचे आहे.

### किल्ले राजगड

राजगड हा किल्ला पुणे शहरापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या गुंजवणे या गावाजवळ आहे. गडावर प्रवेश करण्याचे दोन मुख्य मार्ग आहेत. पहिला मुख्य मार्ग हा पाली गावातून जातो, तर दुसरा गुंजाने गावातून. इतरही छोटे असे चार दरवाजे गडाच्या



तटबंदी मध्ये बांधलेले आहेत. अळू दरवाजा, भुतोंडे दरवाजा, चोर दरवाजा अशी त्यांची नावे आहेत. राजगडाची भौगोलिक रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून त्याचा योग्य वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्ग बांधणीसाठी केला. महाराजांनी या मुरुंब देवाच्या डोंगरावर सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती अशा तीन माच्या आणि एक बालेकिल्ला वसवला. उत्तरेकडील पद्मावती माचीवर मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली.

महाराजांचा राहता वाडा, सदर, तलाव, मंदिरे, इ. वास्तू पद्मावती माचीवरील सपाटीच्या भागात बांधल्या गेल्या. तर अत्यंत निमुळत्या डोंगरधारेवर बांधलेली सुवेळा आणि संजीवनी माची हे दुर्गबांधणीतील एक आश्चर्यच म्हणावे लागेल. राजगड ही छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली राजधानी होती. महाराज तब्बल २४ वर्षे या किल्ल्याच्या सहवासात होते. आग्र्याहून सुटका, सिंहगडची लढाई यासारख्या अनेक चांगल्या वाईट घटना राजगडाने पाहिल्या आहेत.

### किल्ले रायगड

पुरंदरचा तह झाल्यानंतर महाराजांनी राजधानी रायगड या किल्ल्यावर हलवली. याचे मुख्य कारण म्हणजे राजगड हा पठारी भागाला जवळ असलेला किल्ला असल्याने शत्रू सहजच इथपर्यंत पोहोचू शकतो. रायगड हा किल्ला सह्याद्रीच्या मुख्य रांगेच्या जवळ असून डोंगराळ भागामुळे तेथे पोहोचणे सहज शक्य नाही. त्यामुळे रायगड किल्ला ही जागा स्वराज्याच्या दृष्टीने अत्यंत सुरक्षित अशी होती. रायगड हा एक

### किल्ले सिंधुदुर्ग

जागतिक वारसास्थळांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी दोन जलदुर्गांची निवड पुरातत्त्व विभागातर्फे करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण या गावाजवळील किनाऱ्यासमोर कुरटे या बेटावर शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग या जलदुर्गाची निर्मिती केली. किल्ल्याची तटबंदी २.२७ कि.मी. लांब असून त्यामध्ये दोन दरवाजे बांधलेले आहेत. या जलदुर्गावरील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण जागा म्हणजे राजाराम महाराजांनी बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे अनेक पुतळे आहेत, अनेक रस्त्यांना त्यांचे नाव दिलेले आहे पण उभ्या महाराष्ट्रात महाराजांचे हे एकमेव मंदिर किल्ल्यामध्ये दिसते. किल्ल्यात साखरबाव आणि दुधबाव नावाच्या विहिरी आहेत.

अद्वितीय बांधकामाचा नमूना असलेला किल्ला आहे. किल्ल्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आणि वेगळेपण म्हणजे समुद्रसपाटीपासून ८५० मी. आणि पायथ्यापासून ७९० मी. उंचीवर असलेले राजधानीचे ठिकाण. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली मराठी साम्राज्याची ही राजधानी अत्यंत दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण अशा ठिकाणी वसवली होती. जास्त पावसाच्या प्रदेशात इतक्या उंचीवर राजवाडा, सदर, नगारखाना, मंदिरे, तलाव, इ. वास्तू बांधायच्या आणि त्याची योग्य प्रकारे देखभाल करून त्या टिकवायच्या हे त्या काळी एक मोठे आव्हानच होते. रायगड किल्ल्याची नगररचना हा एक मोठा अभ्यासाचा विषय असून अनेक अभ्यासकांनी यावर पुस्तके लिहिली आहेत. या नगररचनेमध्ये राजवाडा, सदर, सरकारी कचेऱ्या, राण्यांचे महाल, दरबार, गडावरील अधिकाऱ्यांची घरे तसेच नोकरदारांची घरे यांची नीट व्यवस्था केलेली दिसते. गडावर ठिकठिकाणी पाणी अडवून तलाव बांधले आहेत. तसेच खडकात पाण्याची टाकी खोदलेली आहेत. या तलावांचे आणि टाक्यांचे पाणी आज तब्बल 300 वर्षांनंतर देखील पिण्यासाठी आपण वापरत आहोत. अशा प्रकारचे जलव्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण भारतातील मोजक्याच किल्ल्यांवर दिसून येते. रायगड या राजधानीच्या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि १६८० साली त्यांचा मृत्यू झाला. अशा अनेक महत्वाच्या ऐतिहासिक घटनांचा रायगड किल्ला साक्षीदार आहे.

### किल्ले पद्मदुर्ग



पद्मदुर्ग हा रायगड जिल्ह्यातील मुरुड या गावाजवळील समुद्रात कासा या बेटावर बांधलेला किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या अखेरीस या किल्ल्याचे काम जवळपास पूर्ण झाले होते. मुरुड बंदरावरून छोट्या बोटीतून या किल्ल्यापर्यंत पोचता येते. या जलदुर्गाला दोन दरवाजे आहेत. गडावर आजही जवळपास ४८ तोफा पाहायला मिळतात. मुरुड बंदरावरून पर्यटक सहज किल्ल्यावर जाऊ शकतात. बालेकिल्ला आणि पडकोट असे पद्मदुर्ग किल्ल्याचे दोन भाग आहेत. सध्या गडावर पाणी नसल्याने पर्यटकांचे हाल होऊ शकतात. त्यामुळे या जलदुर्गावर जाताना भरपूर पाणी सोबत ठेवावे.

महाराष्ट्रातील या दुर्गवैभवाची नोंद जागतिक स्तरावर घेतली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक गोष्टींची पूर्तता पुरातत्त्व विभागाकडून केली जाईलच. पण तेथे जाणाऱ्या पर्यटकांनीदेखील अशा स्थळांवर स्वच्छता ठेवली पाहिजे आणि शिस्त पाळली पाहिजे.

**– डॉ. सचिन जोशी**

(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)

संपर्क : ०९८२२१०९३६२





**सिंधुदुर्ग किल्ला आणि या किल्ल्यामध्ये असणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे एकमेव मंदिर.**

# फिरता फिरता आरोग्य रक्षण

वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या देशातून परदेशी जाणे, इतका सोपा अर्थ. पण या उपचारांना तिथल्या आनंददायी वास्तव्याचा पैलू जोडला गेल्याने हा आता फक्त उपचाराचा भाग उरला नाही. वैद्यकीय पर्यटनाला आपल्या देशात आयुर्वेद व योगशास्त्राची भरभक्कम साथ पूर्वीपासूनच आहे. सुमारे ४ हजार वर्षांची परंपरा लाभलेल्या, आयुर्वेद व योगाची प्रचिती आल्याने; त्याचा लाभ घेण्यासाठी आपल्या देशात गरजूंनी येण्याची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे.

पुण्याच्या मोहिनीची अमेरिकावासी बहीण मानसी, ४ वर्षांनी १५ दिवसांसाठी भारतात येणार म्हणून ती आनंदात होती. पण मानसीचा इथल्या वास्तव्याचा कार्यक्रम ऐकला आणि मोहिनी खट्टू झाली. कारण त्यात कुटुंबीयांसाठी वेळ अगदीच थोडा होता. मानसीला भारतात आल्या-आल्या दातांची रूट कॅनॉल ट्रीटमेंट करायची होती, तिच्या मुलांना अजिंठा-वेरुळ-लोणार सरोवर बघायचे होते, अमेरिकेला परतण्यापूर्वी पुन्हा एकदा दातांच्या डॉक्टरांचे फॉलोअप आणि मग अमेरिकेला प्रयाण, असा तो भरगच्च धावपळीचा कार्यक्रम. मोहिनीने त्यावर मस्त उपाय शोधला. मानसीच्या अजिंठा-वेरुळ-लोणार सफरीच्या कार्यक्रमात तीसुद्धा तिच्या कुटुंबासह सहभागी झाली आणि त्यामुळे सर्वांना कौटुंबिक सहलीचा एकत्रितपणे आनंद तर मिळालाच, शिवाय मानसीची दातांची ट्रीटमेंटही व्यवस्थित पार पडली. हे सर्व शक्य झाले, महाराष्ट्रातील उत्तम वैद्यकीय तसेच पर्यटन सुविधांमुळे !

### पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र

मुंबई आणि महाराष्ट्र हे देशी-विदेशी पर्यटकांसाठी कायमच आकर्षणाचे केंद्र राहिले आहेत. महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण निसर्गसौंदर्य, सुविधायुक्त व विकसित पर्यटनस्थळे, विमान, रेल्वे, रस्ते इ. दळणवळण सुविधा, आतिथ्यशीलता इ. मुळे देश-विदेशातील पर्यटकांचा ओघ महाराष्ट्राकडे सतत राहिला आहे. अलीकडच्या काळात, वैद्यकीय पर्यटन हे क्षेत्र महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याने, केवळ अनिवासी भारतीयच नव्हे तर इतर देशांचे नागरिकही राज्याकडे आकर्षित होत आहेत.



### कायम पसंती

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून साजरा करण्याची युनोला केलेली विनंती मान्य झाल्याने गेल्या २ वर्षांपासून योगदिनही सर्वत्र मोठया प्रमाणावर साजरा होत आहे. अशा योग आणि आयुर्वेदाची भूमी म्हणून भारताला कायम पसंती राहिली आहे. महाराष्ट्रातील इगतपुरीचे विपश्यना केंद्र, लोणावळयाचे कैवल्यधाम, पुण्यातील अय्यंगार योग या ठिकाणी परदेशी पर्यटकांची नेहमी गर्दी दिसून येते.

देशाच्या सकल उत्पनाचा विचार केल्यास वैद्यकीय पर्यटनाचा ०.१ टक्क्यांहून कमी असलेला वाटा येत्या काही वर्षांत २ टक्क्यांपर्यंत नेण्याची आपली क्षमता आहे. वैद्यकीय पर्यटनाचा पुढील काही दिवसातच व्यवसाय ३ दशलक्ष अमेरिकी डॉलरवरून ८ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सवर जाण्याची आशा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना आणि बळकटी देणारा तसेच मोठया प्रमाणात परकीय चलन देशात आणणारा हा व्यवसाय होऊ शकतो.

### नैसर्गिक फायदा

मुंबई देशाची आर्थिक राजधानी तसेच अत्याधुनिक सुविधांनीयुक्त शहर म्हणून जागतिक नकाशावर सुस्थापित असल्याचा नैसर्गिक फायदा मुंबई आणि महाराष्ट्राला मिळत आला आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधांनीयुक्त सुसज्ज रुग्णालये, कुशल आणि उच्चशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांची उपलब्धता, सामान्य माणसालाही असलेले इंग्रजी भाषेचे जुजबी ज्ञान, उत्तम दळणवळण सुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पाश्चात्य देशांच्या तुलनेत उपचारांसाठी येणारा निम्म्यापेक्षा कमी खर्च, या सर्व बाबींमुळे मुंबई आणि महाराष्ट्रात वैद्यकीय पर्यटनास उत्तम संधी आहेत. मुंबईबरोबरच पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इ.


ठिकाणीही उच्च दर्जाची वैद्यकीय सुविधा माफक दरात मिळते, हा विश्वास परदेशी रुग्णांच्या मनात निर्माण करण्यात तेथील वैद्यकीय क्षेत्र यशस्वी ठरले आहे. त्वचारोपण, दंत उपचार, सांध्याचे उपचार, वंध्यत्व उपचार, हृदयरोग इ. वरील उपचारांसाठी दरवर्षी लाखो परदेशी नागरिक महाराष्ट्रात येत असतात. पाकिस्तान, बांगलादेश, मध्य-पूर्व आशिया, इराण, इराक, आखाती देश, जॉर्डन, तुर्की इ. देशांतील नागरिकांबरोबरच अमेरिका-इंग्लड या पौर्वात्य देशांच्या नागरिकांचा त्यात समावेश असतो. एक्स-रे , सिटी स्कॅन , टुडी इको, डॉप्लर, अवयव प्रत्यारोपण इ. सर्व अत्याधुनिक सुविधा येथील रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहेत. कुशल वैद्यकीय तज्ज्ञ व शल्यचिकित्सक, प्रशिक्षित परिचारिका व मदतनीस, स्वच्छ रुग्णालये यामुळे इथे वैद्यकीय पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या वरचेवर वाढते आहे. इथे उपचारांसाठी येणाऱ्या परदेशी नागरिकांना या मातीतील संस्कृती, सण-वार, उत्सव इ. चेही आकर्षण असतेच. मुंबईत गणेशोत्सव, दहीहंडी इ. उत्सवांना जोडून वैद्यकीय पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मुंबईच्या आसपास असणारी घारापुरीची लेणी, लोणावळा, महाबळेश्वर, माथेरान ही थंड हवेची ठिकाणे, अलिबाग, तारकर्ली, वेंगुर्ल्यापर्यंत पसरलेला अफाट समुद्र इ. पर्यटनाची असंख्य स्थळे उपलब्ध आहेत. तसेच जागतिक वारसा म्हणून निवड झालेली अजिंठा-वेरुळ, लोणार ही पर्यटनस्थळेही पर्यटकांना आकर्षित करत असतात.

वेलनेस आणि अल्टरनेट उपचार पद्धतींपैकी योग, विपश्यना, आयुर्वेद, होमियोपॅथी, युनानी, सिद्धोपचार, निसर्गोपचार आदी उपचारांची सुमारे ५०० अद्ययावत केंद्रेही महाराष्ट्रात असल्याने उपचारांसाठी देशी-विदेशी पर्यटकांची सहज पसंती महाराष्ट्राला राहिली आहे. शरीर, मन आणि चित्त यांच्या संयोगातून खात्रीशीर उपचार देणाऱ्या या पद्धती प्राचीन आणि पारंपरिक असल्या तरीही हे उपचार देणारी केंद्रे मात्र अत्याधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण अशीच आहेत.

त्यामुळे वैद्यकीय उपचारांना जोडून या पर्यटन स्थळांची वारीही पर्यटक करत असतात. वैद्यकीय पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य शासनानेही धोरणात्मक पाऊले उचलायला सुरुवात केली असून वैज्ञकीय पर्यटनाला आणखी चालना देण्यासाठी त्याच्याशी संबंधित सर्व घटकांमध्ये सुसूत्रता आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यात रुग्णालये, हॉटेल्स्, विमा कंपन्या, पर्यटन कंपन्या आदी घटकांचा समावेश होतो. रुग्णालयांना जागतिक दर्जाचे मानांकन (जेसीआय) प्राप्त करून घेण्यास उद्युक्त करणे, रुग्णालयांमध्ये समान शुल्क, प्रभावी वीमा पॉलिसी, भारतीय वैद्यकीय कायदे व मार्गदर्शक तत्त्वांची माहिती वैद्यकीय पर्यटकांना करून देणे, याबाबत सर्व रुग्णालय व्यवस्थापनांनी संघटित प्रयत्न केल्यास परदेशी वैद्यकीय पर्यटकांची आणखी सोय होणार आहे.

'परवडणारी आणि समग्र अशी वैद्यकीय सेवा जगाला देण्यात भारत नेतृत्व करू शकतो,' असा आशावाद अलीकडेच झालेल्या जागतिक आरोग्य महोत्सवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता. भारतातील वैद्यकीय पर्यटनात दरवर्षी अंदाजे १५ ते २० टक्के वाढ अपेक्षित असल्याचा अंदाज उद्योग क्षेत्रातल्या फिकी, सीआयआय व असोचॅम यासारख्या नामवंत संस्थांनी व्यक्त केला आहे, असे झाल्यास परदेशी पर्यटक येथून परत जाताना उत्तम आरोग्यासह पर्यटनाचा आनंदही सोबत नेतील एवढे नक्की..

**– मीनल जोगळेकर**
वरिष्ठ सहायक संचालक



अलीकडेच जाहीर झालेल्या राज्याच्या पर्यटन धोरणात महाराष्ट्र वैद्यकीय पर्यटन परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याची बाब नमूद करण्यात आली आहे. वैद्यकीय पर्यटनासाठी महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकाचे राज्य व्हावे, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून पावले उचलण्यात येत आहेत.
अमेरिकेच्या जॉइंट कमिशन इंटरनॅशनल (जेसीआय)ने गुणवत्तेसाठी प्रमाणित केलेल्या भारतातील २८ रुग्णालयांपैकी ७ म्हणजे एक चतुर्थांश रुग्णालये महाराष्ट्रातील आहेत.

# अशी घ्या काळजी...

पर्यटनाचा आनंद घेताना पूर्वतयारी करणे अत्यंत महत्त्वाचे असते. नियोजन चुकले तर पर्यटनाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे पर्यटनाला जाताना कोणत्या बाबी आवश्यक आहेत, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

पर्यटनासाठी योग्य ठिकाण व वेळ निवडण्याचे मोठे आव्हान पर्यटकांपुढे असते. आपण ज्या भागात राहतो, तेथील पर्यटनस्थळ किंवा मित्रांनी सुचविल्यानुसार बहुतांश पर्यटक पर्यटनाला जातात. पर्यटनाला जाताना कोणत्या वस्तूसोबत न्याव्यात हे त्या ठिकाणावर अवलंबून असते.

गोव्यासह समुद्र किनारा असलेल्या ठिकाणी किंवा दक्षिणेमध्ये हिरवा निसर्ग पाहण्याकरिता जाताना परस्परविरोधी वस्तू सोबत घेऊन जाव्या लागतात. पर्यटनासाठी जाताना अत्याधुनिक कॅमेरा, हलकी व कमी वजनाची पाठीवर घेऊन फिरता येईल अशी बॅग, स्पोर्ट शूज, टी-शर्ट, जीन्ससह मोकळेढाकळे कपडे घेऊन जाण्यापासून तर ऐनवेळी आरोग्याला बाधा झाली तर आवश्यक औषधींपासून सर्वच बाबींचे सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक असते.

देशातीलच नाही तर जगभरात सर्वाधिक पर्यटक हे निसर्ग पर्यटन करणारे असतात. यासोबतच गोवा, मुंबईतील बीचसह समुद्रकिनारी पर्यटन करणाऱ्यांची संख्याही कमी नाही. या ठिकाणी पर्यटनाला जाताना विशेष काळजी घेणे आवश्यक असते.

बहूतांश किल्ले डोंगरावरच बांधलेले आहेत. तसेच पर्यटकांना हे गिरिदुर्ग अधिक खुणावतात. त्यामुळे गिरिदुर्गावर जाताना शुद्ध पाणी सोबत असणे सर्वात महत्त्वाचे आहे. किल्ल्यांवर विहिरी, तळे, नद्या असतात. मात्र, तेथील पाणी सेवन करणे चुकीचे आहे. यासोबतच स्पोर्ट्स शू, कपडे व पाठीवर घेता येईल, अशी बॅग असणे आवश्यक आहे. यामुळे डोंगरावर चढणे सहज शक्य होते.

**निसर्ग पर्यटन करताना**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशाच्या भौगोलिक स्थितीमध्ये विविधता असल्यामुळे वेगवेगळ्या प्रदेशात निसर्गाचे वैविध्य निदर्शनास पडते. सुंदर व मनमोहक निसर्ग, दऱ्या-खोऱ्या, जमिनीवर कोसळणारे धबधबे डोळ्यांना आनंद देतात. निसर्ग पर्यटन उन्हाळा किंवा हिवाळ्यात केले जाते. निसर्ग पर्यटनाला जाताना सोबत कोणत्या वस्तू घेऊन जाव्यात हे त्या ठिकाणावर व ऋतुवर अवलंबून असते. निसर्ग पर्यटनाला जाताना सोबत कॅमेरा, ज्या ठिकाणी जायचे आहे तेथील नकाशा तसेच ठिकाणाबद्दल पूर्ण माहिती असणे, ज्या ठिकाणी आपण पर्यटनाला जातो, त्याच्या आजूबाजूला आणखी एखादे सुंदर पर्यटनस्थळे असू शकतात. ते फारशी प्रसिद्ध नसतात. त्याचीही माहिती घेणे आवश्यक आहे.

**विदेशात पर्यटनाला जाताना**

देशात विदेशात पर्यटनाला जाताना करावी लागणारी तयारी पूर्णपणे वेगळी असते. विदेशात पर्यटनाला जाताना त्या देशातील कायदे व नियमांची पूर्ण माहिती घ्यावी. एकदा न्यूझीलंडमध्ये क्रिकेटपटू हरभजन सिंगला पायातील मोजांचा वास आल्यामुळे

पर्यटनाचा आनंद घेताना पूर्वतयारी करणे अत्यंत महत्त्वाचे असते. नियोजन चुकले तर पर्यटनाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे पर्यटनाला जाताना कोणत्या बाबी आवश्यक आहेत, याकडे लक्ष देणे गरजेचे ठरते.



दीड लाख रूपये दंड झाला होता. त्यामुळे बारीकसारीक बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. बहुधा टूर्स आणि ट्रॅव्हल्सच्या वतीने आयोजित ट्रीपला गेलेले अधिक सोयीस्कर असते.

विदेशात पर्यटनाला जाताना आवश्यक वस्तूंची वेगळी व अनावश्यक वस्तूंची वेगळी बॅग करावी. विमानाने प्रवास करताना सोबत असलेल्या बॅगमध्ये कुठल्याची प्रकारच्या लोखंडी किंवा टोकदार वस्तू, काचेच्या बाटल्या नकोत. तसेच ज्या देशात आपण पर्यटनाला जात आहोत तेथील वातावरणानुसार कपडे सोबत घेऊन जायला हवेत.

की नाही? याचे नियोजन करणे आवश्यक असते.

### ऋतू व ठिकाणानुसार साहित्याची निवड

आपण पर्यटनाला कोणत्या ऋतुमध्ये जात आहोत तसेच कोणत्या ठिकाणी व किती दिवसांसाठी जात आहोत, यानुसार कपडे व सोबत घेऊन जाणाऱ्या साहित्याची निवड करणे आवश्यक असते. ज्या ठिकाणी जात आहोत तेथील तापमान व वातावरणाची माहिती आधीच घेऊन ठेवायला हवी. थंडी असेल तर उबदार कपडे सोबत घ्यायला हवेत. यासोबतच स्वेटरसह अन्य कपडे आवश्यक

### जंगल सफारीला जाताना

अभयारण्यात जाऊन वन्यप्राणी पाहणे किंवा एखाद्या जंगलात फिरायला जाताना विशेष काळजी घेणे आवश्यक असते. या ठिकाणी जाताना तेथील नियमांची माहिती समजून घेणे आवश्यक असते. याकरिता मित्रांपैकी कुणी या ठिकाणी पूर्वी पर्यटनासाठी गेले असतील तर त्यांच्याकडून किंवा इंटरनेटवरील संबंधित अभयारण्याच्या संकेतस्थळावरून माहिती जाणून घ्यायला हवी. बहुतांश अभयारण्ये ही आठवड्यातून एक दिवस बंद असतात. त्यामुळे त्याची माहिती घ्यायला हवी. तसेच कोणत्या वाहनांचा वापर करावा, कोणत्या वस्तू सोबत घेऊन जाव्यात व कोणत्या घेऊन जाऊ नये, याचे विविध राज्यातील अभयारण्यात वेगळे नियम असतात. ताडोबा किंवा कान्हा अभयारण्यात फिरायला जाताना अभयारण्याच्या वाहनानेच प्रवास करणे अनिवार्य आहे. येथे फिरताना वाहनाच्या खाली उतरणे किंवा जंगलात पायी फिरण्यावर बंदी आहे. त्यामुळे अशा ठिकाणी पर्यटनाला जाताना प्रशासनाच्या अटी व शर्ती मान्य करून तेथील नियमानुसारच वागणे सोयीस्कर ठरते.

### पर्यटनस्थळाचे बंद वार व वेळ महत्त्वाची

अजिंठा-वेरुळ येथील लेणी पाहण्यासाठी सकाळी १० ते ५ वाजेपर्यंतचाच वेळ दिला जातो. ही लेणी बघायला किमान तीन तास तरी हवेत. येथे सायंकाळी चार वाजता पोहोचल्यावर सर्व लेणी पाहणे शक्य होत नाही. नागपूर येथील अजब बंगला आठवड्यातून एक दिवस बंद असतो. त्यामुळे अशा ठिकाणी पर्यटनाला जाताना त्या दिवशी संबंधित ठिकाणी जाण्यास बंदी तर नाही ना किंवा आपण त्या ठिकाणी वेळेत पोहोचू शकतो

आहेत. तापमान जास्त असेल तर सैल कपडे आवश्यक असतात. कपड्यांची निवड चुकली की, त्या ठिकाणी गेल्यावर अनेकांची प्रकृती ढासळते व त्यांना परत यावे लागते. काश्मीर किंवा लडाखसारख्या अतिशीत प्रदेशात जाताना हातमोजे, पायमोजे सोबत घेऊन जाणे व ते आपल्यासोबत असलेल्या छोट्या बॅगमध्येच असणे आवश्यक असते.

– अंकूश बाहे

संपर्क: ०९६२३४५९२३०

## निवास व्यवस्था

सर्वांना भेडसावणारी समस्या असते ती निवासव्यवस्थेची. बहुतांश पर्यटनस्थळावर पर्यटक ठरावीक काळातच जातात. त्यामुळे या ठिकाणी निवासाची स्वस्त व उत्तम व्यवस्था सहसा उपलब्ध होत नाही. ऐनवेळी मिळेल त्या ठिकाणी निवास करावा



लागतो. त्यामुळे 'मूड ऑफ' होतो व पर्यटनाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे पर्यटनाला जाताना आधीच नियोजन करून जेथे जायचे आहे तेथे इंटरनेटच्या मदतीने किंवा दूरध्वनीद्वारे निवासव्यवस्था करणे अत्यंत आवश्यक असते. आपण ज्या हॉटेलमध्ये किंवा विश्रामगृहात राहणार, त्याबाबतही आधीच माहिती घ्यावी व नंतरच तेथे मुक्काम करावा. सध्या पर्यटनस्थळी असलेल्या हॉटेल्सची माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे.

# स्मार्ट डिजिटल व्हिलेज



हरिसाल... या स्मार्ट डिजिटल गावाविषयी मुख्यमंत्री महोदय बैठकांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये नेहमी अभिमानाने सांगत असतात की, देशातील पहिले स्मार्ट डिजिटल व्हिलेज होण्याचा मान आपल्या राज्यातील हरिसालला मिळत आहे. मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून या गावात जणू डिजिटल युगाची क्रांती झाली आहे.

हरिसाल गावाविषयी कुतूहल होते आणि या गावाला भेटण्याची इच्छादेखील.. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामुळे ही संधी मिळाली. राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी शनिवार, रविवारी मेळघाटचा दौरा केला. त्यात मुख्य कार्यक्रम होता, हरिसाल गावभेटीचा. मुख्य सचिवांच्या या दौऱ्यात मला सहभागी होता आल्याने राज्यातीलच नव्हे तर देशातील पहिल्या स्मार्ट डिजिटल व्हिलेजला भेट देण्याची संधी मिळाली.

### स्मार्ट डिजिटल व्हिलेज

चिखलदरा वगळता सेमाडोह, कोलकाज या ठिकाणी मोबाइल नेटवर्क नाही.. मात्र हरिसालमध्ये आल्यावर वायफाय नेटवर्क मिळते.. त्यामुळे ग्रामस्थांच्या बोलण्यात आत्मविश्वास होता.. साहेब, आमचं हरिसाल गाव डिजिटल नाही, तर स्मार्ट डिजिटल व्हिलेज आहे, ग्रामस्थ मुख्य सचिवांना विश्वासने सांगत होते.

हरिसाल.. मेळघाटच्या दाट जंगलाच्या कुशीत वसलेले सुमारे ४००० लोकसंख्येचे गाव.. मेळघाटच्या सातपुड्याच्या पर्वत रांगांमध्ये असलेल्या दुर्गम गावांप्रमाणे येथेही आदिवासी बांधवांची घरे आहेत.

रविवारी सकाळी अकराच्या सुमारास मुख्य सचिवांचे अमरावतीचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अन्य विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आगमन झाले.

### रोखरहित व्यवहाराची नांदी

डिजिटल व्हिलेज कार्यालयाजवळ मुख्य सचिवांचे कोरकू नृत्याने स्वागत करण्यात आले. हरिसाल ग्रामपंचायतीच्या संकुलात हे कार्यालय आहे. त्याला लागूनच सेतू सुविधा केंद्र आहे. या ठिकाणी सातबारा घेताना त्याचे शुल्क 'पेटीएम'ने स्वीकारण्याची व्यवस्था आहे. रोखरहित व्यवहाराचे एक अनोखे उदाहरण हरिसालने घालून दिले आहे. सेतू केंद्राच्या शेजारीच स्वस्त धान्य दुकान आहे. सर्व सुविधा एकाच छत्राखाली ग्रामपंचायतीच्या संकुलातच उपलब्ध करून दिल्याने, ग्रामस्थांची मोठी सोय झाली आहे. सेतू सुविधा केंद्राच्या कार्यपद्धतीची माहिती मुख्य सचिवांनी करून घेतली. या केंद्रात लाभार्थ्यांना विविध ४२ प्रकारचे दाखले देण्याची व्यवस्था आहे. यामुळे नागरिकांना सहज आणि सुलभ पद्धतीने दाखले मिळतील. या वेळी स्मार्ट रेशनकार्ड प्रणालीच्या माध्यमातून 331 लाभार्थ्यांना स्मार्ट डिजिटल कार्ड देण्यात आली आहेत. या कार्डशिवाय लाभार्थ्यांना धान्य देण्यात



हरिसाल गावातील रोखरहित व्यवहाराविषयी माहिती घेताना मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय. सोबत जिल्हाधिकारी किरण गिते.



येत नाही. अतिदुर्गम गावातल्या स्वस्त धान्य दुकानावर बायोमेट्रिक पद्धतीने धान्यवितरण केले जाते.

राज्यात कॅशलेस व्यवहारासाठी राज्य शासनाने पाच कलमी कृती आराखडा तयार केला आहे. हरिसालने मात्र एक पाऊल पुढे टाकून कॅशलेस व्यवहाराला सुरुवात देखील केली आहे. ‘आम्ही पेटीएम स्वीकारतो’, असे फलक गावातल्या लहान लहान दुकानदारांनी लावले आहेत.

गावातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत महा-ई-सेवा सुरू करण्यात आली आहे. मुख्य सचिवांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या हरिसाल शाखेस भेट देऊन तेथील कॅशलेस व्यवहाराची माहिती घेतली. देशभरात कॅशलेस व्यवहाराचे आवाहन होत असताना हरिसालसारख्या अतिदुर्गम भागात जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन ‘पॉस’ सेवा सुरू केली. ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. पॉस सेवेंतर्गत बँकेकडून व्यापाऱ्यांना छोट्या पीओएस (पॉइंट ऑफ सेलिंग मशिन) पुरवण्यात आल्या आहेत. याद्वारे ग्राहकांना आपल्या आधार कार्ड किंवा एटीएम मशिनद्वारे पैशाचा भरणा करता येतो. या वेळी मुख्य सचिवांच्या हस्ते ‘न्यू मिलन ग्रो’ आणि ‘ब्रँड किराणा स्टोअर्स’च्या चालकांना पीओएस मशिन वितरित करण्यात आले.

### सर्वांगीण विकास

या दौऱ्यात मुख्य सचिवांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. पुरेशी औषधे, गोळ्या उपलब्ध आहेत की, नाही याची माहिती त्यांनी करून घेतली. गावातील अंगणवाडीत चालवण्यात येणाऱ्या बालविकास केंद्रात मुख्य सचिव सुमारे तासभर थांबले. त्यांनी लहान बालकांना देण्यात येणाऱ्या आहाराची पाहणी केली. या ठिकाणी कमी वजन गटातील बालके आहेत त्यांना पुरेसा आहार देण्याच्या सूचना करत, बालकांच्या आरोग्य तपासणी नोंदीची पाहणीदेखील त्यांनी यावेळी केली. लहान बालकांनी यावेळी सादर केलेली गाणी व कवितांमध्ये ते रमून गेले. अंगणवाडीच्या शेजारीच असलेल्या महिलांसाठीच्या कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या शिलाई स्वयंरोजगार प्रशिक्षण वर्गालाही त्यांनी भेट दिली.

## ई-हेल्थ सेंटर

हरिसाल येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात ई-हेल्थ सेंटर आहे. तेथे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून थेट मुंबई किंवा अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी रूग्णालयातील तज्ज्ञांशी सल्लामसलत करून उपचार केले जातात. एचपी कंपनीच्या सहकार्याने टेलिमेडिसिनसाठी सुरू करण्यात आलेल्या ई-हेल्थ सेंटरला मुख्य सचिवांनी भेट दिली. या केंद्रात गावातील एक महिला तिच्या लहान बाळाला घेऊन आली होती. येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संगणकाच्या मदतीने या बाळाला अमरावती येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात बसलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांना दाखवले. त्यानंतर तेथील तज्ज्ञ डॉक्टरांनी बाळाच्या आजाराचे निदान करून पुढच्या आठवड्यातील शस्त्रक्रियेची वेळ दिली. तंत्रज्ञानाने साधलेली प्रगती आणि त्याचा दुर्गम आदिवासी भागातील लोकांना होणारा फायदा पाहून मुख्य सचिवांनी आनंद व्यक्त केला.




### संगणक प्रशिक्षण

शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या प्रांगणात कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत संगणक प्रशिक्षण देणाऱ्या केंद्राचे उद्घाटन मुख्य सचिवांच्या हस्ते करण्यात आले. एचपी कंपनीच्या माध्मयातून सुरू करण्यात आलेल्या या केंद्रामध्ये किमान २० संगणाकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण दिले जात आहे. पोस्ट बेसिक शासकीय आश्रमशाळा तसेच उच्च माध्यमिक आश्रमशाळेस भेट देऊन तेथील सोयी सुविधांची माहिती घेतली. तसेच शाळेतील मुलामुलींशी त्यांनी संवाद साधला.

सुमारे तीन तासांच्या या दौऱ्यात मुख्य सचिवांनी लहान बालकांपासून ते तरुण, ज्येष्ठ नागरिक, स्त्री, पुरूषांशी संवाद साधला. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत महिलांनी वीज आणि पाण्याची समस्या मांडली. मात्र एका युवकाने आमच्या भागात वायफायची पुरेशी रेंज मिळत नसल्याने कनेक्टिव्हिटीला अडचण येते, अशी समस्या मांडल्यावर मुख्य सचिव आश्चर्यचकित झाले. त्यांनी सांगितले की, या भागात मोबाईल कनेक्टिव्हिटी नसल्याने अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे लवकरच बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हरिसालसह संपूर्ण मेळघाटात मोबाइल नेटवर्क उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. वीजपुरवठ्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांची कामे अंतिम टप्प्यात असून काही महिन्यातच शेजारच्या राज्याच्या मदतीने वीज प्रश्नावर उपाय काढण्यात येईल. रोजगाराचा प्रश्न आहे मात्र आता गावात स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण केंद्र सुरू झाले आहे. देशातील पहिल्या डिजिटल व्हिलेजचा मान मिळविणाऱ्या या गावाने तंत्रज्ञानाची कास धरत कॅशलेस व्यवहाराकडे वाटचाल कधीच सुरू केली आहे म्हणूनच हरिसाल आहे बेमिसाल यात काही शंका नाही.

**– अजय जाधव**
विभागीय संपर्क अधिकारी. संपर्क : ०९७०२९७३९४६

# महा-वॉलेट




काळा पैसा आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढाई हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रधानमंत्र्यांनी ५०० आणि १००० रुपयांच्या चलनबंदीचा निर्णय घेतला. देशात कॅशलेस अर्थव्यवस्था आणण्याचे स्वप्न प्रधानमंत्र्यांनी पाहिले. महाराष्ट्रही त्याकडे वाटचाल करीत आहे. येत्या दोन महिन्यात संपूर्ण कॅशलेस व्यवहारासाठी प्रयत्न करण्यात येत असून त्यासाठी रोडमॅप तयार करण्यात आला आहे. राज्यातील नागरिकांना आर्थिक व्यवहार मोबाइलच्या माध्यमातून करता यावा यासाठी 'महावॉलेट' सुरू करण्यात येणार असून असे ई-वॉलेट सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

देशातील काळा पैसा आणि भ्रष्टाचार संपला पाहिजे अशी सामान्य नागरिकांची भावना आहे. पंतप्रधानांनी चलनबंदीचा निर्णय जाहीर केल्यानंतर, देशातील नागरिक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. चलनबंदीचा निर्णय अचानक जाहीर केला असला तरी त्याची तयारी अनेक दिवसांपासून सुरू होती. बँकिंग व्यवहाराच्या कक्षेत नसलेल्या सामान्य नागरिकांना त्यात आणण्यासाठी, जनधन ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून देशातील २३ कोटी लोकांचे बँक खाते उघडण्यात आले. त्यांना रुपे कार्ड देण्यात आले. ही चलनबंदीच्या निर्णयापूर्वीची पहिली तयारी होती. त्यानंतर डिजिटल इंडियाच्या माध्यमातून डिजिटल संवाद वाढवण्यासाठी तयारी सुरू केली. गेल्या दोन वर्षात या दोन महत्त्वपूर्ण तयारीनंतर पंतप्रधानांनी चलनबंदीचा निर्णय जाहीर केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'महावॉलेट' या सेवेची घोषणा करताना सांगितले.

काळ्या पैशाच्या विरोधात देशात पहिल्यांदा कायदा करण्याचे काम पंतप्रधानांनी केले आहे. चलनबंदीच्या निर्णयामुळे पहिल्यांदाच गरीब आणि श्रीमंत यांच्यातील रुंदावणारी दरी कमी होत आहे.

**खरिपाची विक्रमी आवक**

चलनबंदीनंतर राज्यातील जनतेसाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन अनेक उपाययोजना हाती घेतल्या. सामान्यांना चलनबंदीमुळे त्रास होऊ नये, यासाठी शासनाने वेळोवेळी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. शेतकरी बांधवांना या चलनबंदीचा फटका बसू नये यासाठी बाजार समित्यांमध्ये कॅशलेस व्यवहारावर भर देण्यात आला आहे. चलनबंदीनंतरही राज्यामध्ये खरीप हंगामाच्या मालाची विक्रमी आवक गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढली आहे. गेल्या वर्षी ८ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीमध्ये एक कोटी ५१ लाख ६८ हजार क्विंटल मालाची आवक झाली तर यावर्षी याच कालावधीत एक कोटी ६७ लाख ८२ हजार क्विंटल माल राज्यभरातील बाजार समित्यांमध्ये दाखल झाला. चलनबंदीनंतरच्या तिसऱ्या दिवसापासूनच बाजार समित्यांनी बँकांच्या माध्यमातून कॅशलेस व्यवहार सुरू केले.

**शेतकऱ्यांकडून ८० टक्के व्यवहार कॅशलेस**

राज्यात रब्बीच्या पेरणीसाठी शेतकरी बांधवांना बियाणे, खते, कीटकनाशके खरेदी करता यावी, यासाठी बँकांकडून केवळ एका अर्जाच्या माध्यमातून अधिकृत विक्रेत्यांच्या खात्यांवर थेट पैसे जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे रब्बी हंगामाच्या पेरण्यांवर कुठलाही विपरीत परिणाम जाणवला नाही. या वर्षी रब्बीची पेरणी ८२ टक्के झाली असून गेल्या चार वर्षांच्या तुलनेत १०९ टक्क्यांपेक्षा ती अधिक आहे. मागील वर्षातील कर्ज वितरणापेक्षा या वर्षातील कर्ज वितरण ४०० कोटी रुपयांनी जास्त आहे. ग्रामीण भागात या हंगामात शेतकरी बांधवांच्या माध्यमातून ८० टक्के व्यवहार हा कॅशलेस झाला आहे.

**सार्वजनिक वितरण व्यवस्थाही कॅशलेस**

राज्यातील 30 हजार सेवा केंद्रांवर पीओएस मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एक पीओएस मशीन आणि बँकेचा एक वाणिज्य प्रतिनिधी नेमण्यात येणार असून त्यांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करता येणे शक्य होईल. राज्यातील स्वस्त धान्य दुकानांमधील व्यवहारदेखील कॅशलेस करण्याचा निर्णय घेण्यात आला

असून या दुकानांवर देखील पीओएस मशीन उपलब्ध करून दिले जाणार आहेत. चलनबंदीनंतर राज्य शासनाने तत्काळ जुन्या चलनामध्ये सार्वजनिक उपक्रमातील देयके, कर स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. त्या माध्यमातून राज्यातील महापालिकांना सुमारे एक हजार कोटी रुपयांचा तर विद्युत कंपनीला ५०० कोटी रुपयांचा महसूल जमा करता आला. केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील टोलमधून २ डिसेंबर, २०१६ पर्यंत सूट देण्यात आली होती. खासगी रुग्णालयांमध्ये रद्द झालेले जुने चलन स्वीकारण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या होत्या. राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन खासगी रुग्णालयांना धनादेश स्वीकारण्याचे निर्देश दिले. धनादेश न वटल्यास मुख्यमंत्री सहायता निधीतून १० हजार रुपयांपर्यंत मदत देण्याचेही जाहीर केले. खासगी रुग्णालयांच्या संदर्भात तक्रारींसाठी हेल्पलाईन क्रमांक देखील उपलब्ध करून देण्यात आला. बँकांतील गर्दी कमी करण्याकरिता महिला, निवृत्तीवेतनधारक यांच्या स्वतंत्र रांगा करण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले होते. यासारख्या विविध उपाययोजनांतून सामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे.

### कॅशलेससाठी जनधन, आधार क्रमांक, मोबाइल ही त्रिसूत्री

जनधन, आधार क्रमांक आणि मोबाइल या त्रिसूत्रीची सांगड घालत भविष्यातील व्यवहार कॅशलेस केले जाणार आहेत. याचा विचार करता महाराष्ट्रात ९३ टक्के आधार क्रमांक नोंदणी झाली आहे. राज्यात मोबाइलचा वापरही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. विविध शासकीय विभाग आणि त्यांचे व्यवहार हे कॅशलेस करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत महाराष्ट्र स्वत:चे महावॉलेट तयार करणार असून या ई-वॉलेटच्या माध्यमातून सर्व व्यवहार मोबाइलद्वारे करण्यात येतील.

### नागरिकांना प्रशिक्षण

राज्यातील नागरिकांना कॅशलेस व्यवहाराबाबत प्रशिक्षण देण्याकरिता कॅशलेस महाराष्ट्र व्हॉलेंटिअर्स योजना राबवण्यात येणार असून या माध्यमातून एक हजार महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांना प्रशिक्षित करतील.

### इंटरनेटची कनेक्टिव्हिटी पुरवणार

राज्यात ज्या ठिकाणी इंटरनेटची कनेक्टिव्हिटी नाही तेथे ही सेवा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून लवकरच १० गावांमध्ये अशी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. मेळघाटातील हरिसालसारख्या दुर्गम भागात इंटरनेटच्या माध्यमातून ४ महिन्यांपूर्वीच कॅशलेस व्यवहार सुरू झाले असून परिसरातील २८ गावे डिजिटल झाली आहेत. कॅशलेस अर्थव्यवस्थेचा सर्वाधिक फायदा हा गरिबांना होणार असून मजूर, शेतमजूर, शेतकरी यांच्या जीवनात यामुळे परिवर्तन येईल.

## ई-पेमेंटद्वारे मुख्यमंत्र्यांनी केली संत्रा खरेदी

कॅशलेस पद्धतीने संत्रा विक्री उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने पैसे देऊन विधानभवन येथे करण्यात आले.

मोर्शीचे आमदार डॉ. अनिल बोंडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या वेळी शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे, खासदार नाना पटोले, आमदार आशिष देशमुख यांच्यासह शेंदूरजनाघाट येथील संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी चार किलो संत्री खरेदी करून त्याची किंमत मोबाइलद्वारे (ई-पेमेंट) अदा केली. या उपक्रमामुळे संत्रा विक्रीही आता कॅशलेस पद्धतीने सुरू झाली आहे.



**लकी ग्राहक योजना:** रोखरहित व्यवहारांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारने 'लकी ग्राहक योजना' आणि 'डिजी-धन व्यापार योजना' सुरू केली आहे. दररोज, दर आठवड्याला आणि एक भव्यतम सोडत अशा टप्प्यांत ही बक्षिसे मिळतील. या योजनेतील पहिली सोडत २५ डिसेंबरला काढण्यात आली. भव्यतम सोडत १४ एप्रिल २०१७ रोजी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिवशी काढण्यात येईल. 'लकी ग्राहक योजनेंतर्गत २५ डिसेंबर २०१६ ते १४ एप्रिल २०१७ या काळात दररोज १५,००० ग्राहकांना प्रत्येकी १००० रुपयांची कॅशबॅक बक्षिसे देण्यात येतील. याशिवाय दर आठवड्याला ७००० ग्राहकांना १ लाख, १०,००० आणि ५००० रुपयांची बक्षिसे देण्यात येतील. 'डिजि-धन व्यापार योजनेंतर्गत दर आठवड्याला ७००० व्यापाऱ्यांना ५०,०००, ५००० आणि २५०० रुपयांची बक्षिसे मिळतील.

**योजनेसाठीच्या अटी :** ५० ते ३००० रुपयांपर्यंतचे डिजिटल व्यवहार यासाठी पात्र असतील. यूपीआय, यूएसएसडी, आधार कार्डाशी संलग्न डिजिटल पेमेंट यंत्रणा, रुपे कार्ड यांच्या माध्यमातून केलेले कॅशलेस व्यवहार पात्र असतील. ग्राहक व व्यापाऱ्यांच्या डिजिटल व्यवहार आयडींमधून लकी ड्रॉ काढून विजेते ठरवले जातील. मात्र खासगी क्रेडिट कार्ड आणि खासगी कंपन्यांनी दिलेली ई-वॉलेट्स यांच्या माध्यमातून केलेले व्यवहार योजनेत पात्र ठरणार नाहीत, असे निती आयोगाने स्पष्ट केले.

- ग्रामीण क्षेत्रीय बँका आणि सहकारी बँका ४.३२ कोटी किसान क्रेडिट कार्डधारकांसाठी रुपे किसान कार्डस् पारित करतील. नाबार्डद्वारे सरकार त्याला सहकार्य करेल.
- १०,००० पेक्षा कमी लोकसंख्येच्या १ लाख गावांमध्ये २ पीओएस यंत्रे ठेवण्यात येतील. नाबार्डद्वारे सरकार वित्तीय साहाय्याचा विस्तार करणार.
- केंद्र सरकारी विभाग/ पीएसयू हे डिजिटल पेमेंटस्‌वरील ट्रॅन्झॅक्शन फी/ मर्चंट डिस्काऊंट रेट चार्जेसचा भार उचलतील. राज्य सरकारांनाही त्याप्रमाणे करण्याचे सांगण्यात आले आहे.





### ध्वजदिन निधी संकलन रोकडरहीत

महाराष्ट्र शासनाच्या माजी सैनिक कल्याण विभागाच्या वतीने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच रामगिरी या शासकीय निवासस्थानी झाला. शासनाच्या कॅशलेस धोरणाला अनुसरून स्वाइप मशीनद्वारे ध्वजदिन निधी संकलनास मुख्यमंत्र्यांनी कार्ड स्वाईपद्वारे निधी देऊन सुरुवात केली.


विविध आक्रमणे आणि अतिरेकी कारवायांपासून सैन्याने रक्षण केले म्हणून आपण विकासाकडे वाटचाल करू शकलो. देशाचा विकास व जनतेमध्ये आलेली समृद्धी ही सैनिकांनी केलेल्या बलिदानामुळे आली आहे. या गोष्टीचे सामाजिक भान ठेवून जनतेने सशस्त्र दल ध्वज दिन निधी संकलनात सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये रेखा सूर्यवंशी व विठ्ठल सूर्यवंशी, सुमनबाई चंद्रभान शिंदे व चंद्रभान शिंदे, शीतल संतोष जगदाळे, रंजना विनायक काटे, अंबिका नारायण भोंदे, स्नेहा विकास कुळमेथे व विमल जनार्दन कुळमेथे, निशा चंद्रकांत गलांडे, बेबी जानराव उईके व जानराव उईके, शर्मिला राजेंद्र तुपारे व शांता आणि नारायण तुपारे, भानुदास सोमनाथ ठोक यांचा तसेच मोहिमेत अपंगत्व आलेल्या शिपाई राहुल भीमराव मगरे, शिपाई राजू धोंडीराम साळुंखे, हवालदार रमेश तुकाराम मुंढे, नायक शैलेंद्र पांडुरंग चक्रनारायण, सिग्नलमन विठ्ठल सदाशिव इंगळे, शिपाई विवेक पोपटराव मोरे, हवालदार बाळू पांडुरंग लावंड यांचा ताम्रपट, धनादेश देऊन गौरव करण्यात आला. तसेच या वेळी सैन्य सेवेत उत्कृष्ट काम केलेल्या सेवेतील मेजर सचिन सदाशिव पाटील, मेजर आकाश अशोक तापडिया, मेजर रवींद्र शांताराम कोकणे, मेजर जनरल मनोज पांडे या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

### ठाण्यातील रिक्षाचालकही आकारणार कॅशलेस भाडे

ठाण्यातील रिक्षाचालकांनी कॅशलेस पद्धतीने भाडे आकारावे म्हणून त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित कार्यशाळेस रिक्षा चालक व मालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून विविध पर्यायांचा वापर करण्याची तयारी दर्शविली आहे. एटीएम, पेटीएम, नेटबँकिंग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड या सारख्या माध्यमांचा वापर ही काळाची गरज आहे. मुरबाड तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील धसई हे गांव संपूर्णपणे कॅशलेस झाले आहे. तेथे वडापाव किंवा पानटपरीवाल्यापासून सर्वजण कॅशलेस व्यवहार करीत आहेत. डिजिटल मार्केटिंगचे संचालक योगी उदगीर यांच्या मते, रिक्षावाल्यांकडे स्मार्ट फोन नसले तरी चालेल, परंतु आपले बँक खाते असल्यास देखील कॅशलेस व्यवहार होऊ शकतात. अनेक कंपन्या नवनवीन मोबाइल ॲपद्वारे ही सेवा देत आहे. योग्य कंपन्या निवडून तसेच त्यांच्या चार्जेसची माहिती घेतल्यानंतर आपण त्यांची निवड करू शकतो.

**– टीम लोकराज्य**



सहकारी बँकांवर घालण्यात आलेले निर्बंध उठविण्यासंदर्भात केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांच्यासमवेत चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

## सहकारी बँकांवरील निर्बंध लवकरच उठतील...

निश्चलनीकरणामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर घालण्यात आलेले निर्बंध लवकरच उठवले जातील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शिष्टमंडळाने केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांची नुकतीच भेट घेऊन सहकारी बँकांवर घालण्यात आलेले निर्बंध उठवण्यात यावेत, अशी विनंती केली. या शिष्टमंडळात केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री सुभाष भांबरे, राज्याचे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योगमंत्री सुभाष देसाई, सहकार मंत्री सुभाष देशमुख, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते राधाकृष्ण विखे-पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते धनंजय मुंडे, आदी उपस्थित होते.

ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था ही सहकारी बँकांवर अवलंबून आहे. या बँकांवर निश्चलीकरणामुळे बंधने घालण्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणतेही आर्थिक व्यवहार करता येत नाहीत, ही बाब मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केली. महाराष्ट्राच्या निवेदनावर लवकरच सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन अर्थमंत्री श्री.जेटली यांनी सर्वपक्षीय शिष्टमंडळास दिले.

# आता करा, रोखीला टाटा...



८ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रधानमंत्र्यांनी ५०० आणि १००० रूपयांच्या नोटा चलनातून रद्द केल्याची घोषणा केली. खरेतर हा क्रांतिकारी निर्णय अनेक वर्षांपासून अपेक्षित होता. अत्यंत योग्य वेळी घेतलेला आणि दूरगामी परिणाम करणारा हा निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेला पोषक ठरणार आहे. आजवर समांतर चालत असलेल्या काळ्या पैशाच्या अर्थव्यवस्थेला यामुळे तडा गेला आहे.



नॅशनल कौन्सिल फॉर अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अ‍ॅण्ड पॉलिसी आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फायनान्शियल मॅनेजमेंट या तीन सरकारी थिंक-टँक म्हणून गणल्या जाणाऱ्या संस्थांनी वेळोवेळी दिलेल्या अंदाजानुसार, भारताच्या एकूण सकल उत्पन्नाच्या (जीडीपी) २०-२५ टक्के किंवा किमान 30 लाख कोटी रुपये इतकी काळ्या पैशाची अर्थव्यवस्था आहे. १९४८ ते २००८ या ६० वर्षांत ग्लोबल फायनान्शिअल इंटिग्रिटी या वॉशिंग्टनस्थित थिंकटँकने केलेल्या अंदाजानुसार ४६२ बिलियन डॉलर म्हणजे २०,७९,००० कोटी रुपये इतका काळा पैसा भारताबाहेर पाठवला आहे. अर्थतज्ज्ञ अरुणकुमार यांच्या मते विद्यमान एकूण सकल उत्पन्नाच्या अंदाजानुसार भारताच्या एकूण संपत्तीच्या ४० टक्के संपत्ती काळ्या पैशाच्या रूपाने देशाबाहेर गेली आहे. २००० ते २००८ या आठ वर्षांत भारताचा १.०४ बिलियन डॉलर्स एवढा काळा पैसा परदेशात स्थलांतरित झाला. स्थावर मालमत्तेत सर्वात अधिक काळा पैसा गुंतलेला असून त्यानंतर सोन्याचा किंवा अलंकारांचा क्रमांक लागतो. ग्राहकोपयोगी वस्तूंमध्येही काळ्या पैशाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत असते.

त्याशिवाय शेअर बाजारात नोंदणीकृत नसलेल्या कंपन्यांच्या परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या माध्यमातून काळ्या पैशाचे पांढऱ्या पैशात रूपांतर करण्याचे केले जाणारे प्रयत्न आता सरकारच्या लक्षात आले आहेत. (उदा. एका मोठ्या कंपनीच्या उपकंपनीने केलेले अशाप्रकारचे उद्योग सेबीने पकडले आहेत.) अशा शंभरहून अधिक कंपन्यांवर आता सरकारची कडक नजर आहे.

### काळ्या पैशाला पायबंद

पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा असे चक्र सुरूच असते. सरकारी आणि निमसरकारी कार्यालयातील होणारे भ्रष्ट व्यवहार, सार्वजनिक कामांमध्ये ठेवली जाणारी दलाली, उद्योगपती - व्यावसायिकांकडून होणारी करचुकवेगिरी, अपेक्षित परवाने आणि मंजूरी प्राप्त करण्यासाठी आर्थिक मलिदा देऊन उद्योगसमूहाची केली जाणारी भरभराट इत्यादी अनेक प्रकारात काळा पैसाच वापरला जातो. या सर्व पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हा ऐतिहासिक निर्णय अमलात आणला. या परिस्थितीत आर्थिक निरक्षरतेमुळे सामान्य जनतेचे माध्यमांनी नेमके प्रबोधन करणे आवश्यक आहे.

### यापूर्वीही नोटाबंदी

याआधीसुद्धा आपल्या देशाची चलने रद्द केली गेली आहेत. त्यामागचे मुख्य कारण काळ्या पैशाला पायबंद घालण्याबरोबरच अर्थव्यवस्था गतिशील करण्याचे उद्दीष्ट होते. १९५४ साली भारतात एक हजार, पाच हजार आणि दहा हजार रुपयांच्या जारी केलेल्या नोटा १६ जानेवारी १९७८ रोजी चलनातून रद्द केल्या होत्या. एकूण चलनाच्या फक्त तीन टक्के प्रमाण असलेल्या या नोटा, तत्कालीन राहणीमानाचा विचारकरता; त्या वेळी सामान्यलोकांना नजरेससुद्धा पडत नव्हत्या. २००० साली पुन्हा महात्मा गांधी यांचे छायाचित्र असलेल्या १००० आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनात आणल्या. त्या वेळी



१९८७ मध्ये जारी केलेल्या जुन्या ५०० रुपयांच्या नोटा हळूहळू चलनातून रद्द केल्या होत्या. मागील पाच वर्षात म्हणजे २०११ ते २०१६ मध्ये चलनातील नोटांची संख्या ४० टक्क्यांनी वाढ झाली होती. त्यापैकी ५००




च्या नोटा ७६ टक्क्यांनी तर १000च्या नोटा १०९ टक्क्यांनी वाढल्या होत्या. याच काळात आपल्या अर्थव्यवस्थेचा 30 टक्क्यांनी विस्तार झाला.

१४ ऑक्टोबर २०१६ रोजी जनतेकडे एकूण १६,९८,५४0 कोटी रुपयांच्या नोटा चलनात होत्या. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार आजच्या घडीला १७ लाख ५४ हजार कोटी रुपये मूल्याचे चलन व्यवहारात आहे. एकूण चलनात दहा आणि शंभर रुपयांच्या नोटांचे प्रमाण ५३ टक्के आहे तर ५००च्या साडे सोळा अब्ज नोटा तर १000च्या ६.७ अब्ज नोटा चलनात आहे. त्यापैकी ८८ टक्के नोटा जनतेकडेच व्यवहारात होत्या.

या सर्व आकडेवारीतून एक बाब सरकारच्या लक्षात आली की २०१५-२०१६ मध्ये सुमारे साडेसहा लाख खोट्या/नकली नोटा बँकांत आढळून आल्या. त्यापैकी सुमारे चार लाख नोटा ५०० आणि १000 रुपयांच्याच होत्या. २000-२00१ मध्ये एकूण चलनाच्या किमतीच्या २५ टक्क्यांहून कमी असलेल्या ५०० आणि १000 रुपयांच्या नोटांच्या संख्येत, पंधरा वर्षात अवास्तव झालेली वाढ संशयास्पद होती. भारताच्या एकूण चलन मूल्यात ५०० आणि १000 रुपयांच्या चलनाचा हिस्सा ८६ टक्के असल्याने खोट्या किंवा नकली नोटांना पायबंद घालणे आवश्यकच होते.

### पूर्वसूचना

याआधी श्री. मोदींनी सर्व जनतेला बँक खाती उघडण्यास जनधन योजनेद्वारे प्रवृत्त केले होते. तरीही अपेक्षेएवढी खाती उघडली गेली नाहीत. स्वयंघोषित उत्पन्न योजना २ सप्टेंबर ते 30 सप्टेंबर २०१६ मध्ये सरकारने आणून, काळ्या पैशाच्या साठवणूकदारांना ताकीद दिली होती. तरीही काळ्या पैशाच्या धारकांनी, ही ताकीद मनावर घेतली नाही. म्हणूनच कोणतीही पूर्वसूचना न देता घेतलेला हा निर्णय जाचक ठरतोय तो फक्त काळ्या पैशाच्या धारकांनाच. या निर्णयामुळे सगळे व्यवहार कराच्या अखत्यारीत येऊन, सरकारी महसुलात मोठी वाढ होईल. महागाई कमी होण्यास मदत होईल. बँकांकडे पुरेसा निधी उपलब्ध झाल्याने पत/कर्ज पुरवठा व्यवस्थित आणि स्वस्त दराने होईल. स्थावर बांधकाम क्षेत्रातील किंमत फुगवटा फुटून, त्या किंमती वास्तव दरात येतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दहशतवादी यंत्रणेला होणाऱ्या अर्थसाहाय्याला, शस्त्रांच्या तस्करीला, हेरगिरीला आणि भ्रष्टाचाराला मोठ्या प्रमाणात आळा बसेल.



### जपून करा व्यवहार

आज लोकांना कदाचित तात्पुरता सोन्या-चांदीच्या माध्यमाचा काळ्या पैशाच्या तजविजीसाठी आधार वाटेल. पण हा आधार कधी निराधार करील, याची शाश्वती देता येत नाही. सर्वसामान्यांनी अशी जोखीम घेण्याआधी विचार करणे आवश्यक आहे. ज्या लोकांच्या घरांचे व्यवहार चेकद्वारे असतील तर जराही अडचण नाही. पण काही हिस्सा काळ्या पैशात असेल तर मात्र खरेदीदार आणि विक्रेता यांनी समजूतदारपणा दाखवून एकतर व्यवहार पूर्ण चेकने करणे किंवा रद्द करणे त्यांच्याच हिताचे ठरेल. एकूणच सर्वच व्यवहारातून रोख रकमेचे केले जाणारे उच्चाटन मोठे क्रांतिकारी पाऊल असेल.

– विनायक कुळकर्णी

(लेखक अर्थतज्ज्ञ आहेत.) संपर्क : ०९८९२१५२९२८

## सेवाकरातून मुक्ती



आपण नियमित व्यवहार डेबिट कार्ड किंवा ऑनलाइन इंटरनेट बँकिंग किंवा मोबाइल वॉलेट्ससारख्या माध्यमांद्वारे करू शकत आहात. आज भारतात २१ कोटी मास्टर कार्डस् आणि मेइस्ट्रो डेबिट कार्डस् आहेत. भारतात आजवर एकूण व्यवहारांपैकी सुमारे ८५ ते ९0 टक्के व्यवहार रोखीनेच केले जात होते. भारताची ६५ टक्के लोकसंख्या कृषी उत्पन्नाधारित व्यवसायाशी निगडित असल्याने उत्पन्न आणि खर्च रोखीनेच होत आले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेतील रोख व्यवहारांचे प्रमाण भविष्यात खूप कमी होऊन प्लास्टिक मनीचे म्हणजेच डेबिट-क्रेडिट कार्डाचे आणि नेट बँकिंग व्यवहार वाढलेले असतील. अर्थातच हे प्रमाण वाढण्यासाठी आर्थिक साक्षरता वाढीची गरज आहे. रोखरहित आर्थिक व्यवहार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयीसुविधा तातडीने जनतेला उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने केंद्र आणि राज्य सरकारांनी योजना आखल्या असून ज्या गावांमध्ये दहा हजारपेक्षा कमी लोकवस्ती असेल त्या ठिकाणी कृषी आणि दुग्ध सहकारी संस्थांमध्ये दोन सेवा केंद्रे उभारली जात आहे. याचा लाभ एक लाख गावांना होणार आहे. ४ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांना रुपे डेबिट कार्डस् प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँकामार्फत दिली जाणार आहेत. दोन हजार रुपयापर्यंतचे डिजिटल व्यवहार सेवाकरातून मुक्त केले आहेत.

# कॅशलेस धसई

कल्याण ते मुरबाड हे २७ किलोमीटर अंतर. कल्याण एसटी स्थानकातून माळशेजकडे बऱ्याच बसेस जातात. याच मार्गावर सरळगावच्या पुढे उमरोली गाव लागते. मुरबाड ते उमरोली हे अंतर १५ किमी आहे. तिथूनच उजवीकडे वळण्यासाठी छोटासा रस्ता आहे तो थेट धसईला जातो.

मुरबाड तालुक्यातील धसई हे एक मोठे गाव आहे. अगदी ऐतिहासिक काळापासून या गावाला महत्त्व आहे ते येथील व्यापारउदिमामुळे. याठिकाणी बाजारपेठ आहे. गाव सुमारे १० हजार लोकवस्तीचे आहे. इथे सुमारे १५० पेक्षा जास्त व्यापारी आहेत






धसई गावातील कॅशलेस व्यवहार

आणि त्यांची उलाढालही भरपूर आहे. या गावात सहकारी सोसायट्याही असून दूध, भाजीपाला, धान्य, किराणा असा व्यापार या संस्थांच्या माध्यमातून होत असतो. सभोवतालची सत्तर एक गावे देखील व्यापारासाठी धसईवर अवलंबून असतात, त्यामुळे हे गाव आदिवासी भागातले असले तरी वर्दळीचे आहे.

नोटाबंदीनंतर गावातील सर्व व्यवहार कॅशलेस पद्धतीने करण्याचा निर्धार स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाने केला. त्यासाठी विजया बँक व बँक ऑफ बडोदाची मदत घेण्यात आली. सरपंच, तहसीलदार यांच्याबरोबर प्राथमिक बैठक घेऊन गावकऱ्यांच्या मदतीने कॅशलेससाठी नक्की काय करायचे ते ठरवण्यात आले.

गेल्या महिन्याभरात धसई या आदिवासी गावातील वर्दळ खूप वाढली आहे. अर्थशास्त्र शिकणारे मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी, राजकीय मंडळी, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय माध्यमांचे प्रतिनिधी येथे येऊन गेले. प्रधानमंत्र्यांनी ५०० आणि १००० च्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय झाल्यानंतर धसई भागात कार्य करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाने हे आव्हान म्हणून घ्यायचे ठरवले. एक प्रयोग म्हणून कॅशलेस गावाची संकल्पना या गावात प्रथम राबवायची असे ठरवण्यात आले.

मुख्य प्रश्न होता कार्ड स्वाईप मशीनचा. येथील प्रत्येक कुटुंबाकडे जन-धन खाते असून डेबिट कार्डही आहे. त्यामुळे लोक सहजपणे स्वाईप मशीनचा वापर करू शकतील, याची खात्री होती. बँक ऑफ बडोदाने गावातील व्यापाऱ्यांना स्वाईप मशीन निःशुल्क पुरवण्याचे मान्य केले. टप्प्याटप्प्याने मशीन्स आणण्यात आली. बघता बघता एकंदर १३७ मशीन्स कार्यरत झाल्या. वडापावपासून भाजीपाला, धान्य, औषधे, खते व इतर सर्व गरजांसाठी डेबिट कार्ड वापरणे सुरू झाले. विशेष म्हणजे हे कार्ड केशकर्तनालय, दवाखाने, मोटार गॅरेजेस पासून अगदी शेतीकामासाठी ट्रॅक्टर भाड्याने घेण्यासाठीही वापरणे सुरू झाल्याने किमान ५० हजार लोकांना फायदा झाला.

'धसई गाव हे देशातील पहिले कॅशलेस गाव म्हणून समोर येणे ही महाराष्ट्राचा अर्थमंत्री म्हणून माझ्यासाठी गौरवाची बाब आहे,' अशी भावना या गावाला नुकतीच भेट दिल्यावर वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. श्री. मुनगंटीवार यांनी आपल्या भेटीत यावेळी स्वतःचे डेबिट कार्ड वापरून मुरबाड तांदूळ खरेदी करत कॅशलेस गाव उपक्रमाचा शुभारंभ केला. येत्या काळात महाराष्ट्रातील बहुसंख्य गावेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र देशातील पहिले कॅशलेस राज्य ठरावे यावर आपला भर राहील, असे प्रतिपादनही त्यांनी केले. देशातील पहिल्या कॅशलेस गावाचा मान धसई गावाला मिळणे, हा महाराष्ट्राचा सन्मान आहे.

'धसईने महाराष्ट्रच नव्हे तर देशासाठी एक नवा आर्थिक राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यास सुरुवात केली आहे,' असे वित्तमंत्र्यांनी काढलेले कौतुकोद्गार कॅशलेसच्या चळवळीला बळ देणारे आहे.

**- अनिरुद्ध अष्टपुत्रे**

जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

# रोखमुक्त आघाडी



८ नोव्हेंबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक हजार आणि पाचशे रुपयांच्य नोटा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयानंतर देशभरांत रोकडविरहीत व्यवहार करण्याची मोहिम सुरु झाली. राज्यातील सिमावर्ती असणारा गडचिरोली जिल्हा यात अग्रेसर रहावा या दृष्टीकोणातून घोषणेच्या दुसऱ्याच दिवशी सुरुवात करण्यात आली.

**तातडीचे संदेश**

जिल्हाधिकारी ए.एस.आर. नायक यांनी दुसऱ्याच दिवशी स्थानिक बँकांना भेटी दिल्या. लिड बँकेच्या माध्यमातून जिल्हाभरात असलेल्या विविध बँकांच्या ११९ शाखांना तातडीने संदेश देण्यात आले. स्वत: नायक यांनी बँकेत ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र रांगांसाठी सूचना दिल्या. नागरिकात घबराट पसरू नये, यासाठी तत्काळ एक आवाहन करणारे पत्र छापून १० तारखेला सर्व वृत्तपत्रांसोबत हस्तपत्राच्या रूपाने पोहोचवण्यात आले.

प्रशासनाने पुढाकार घेतल्याने गडचिरोलीत फारसा गोंधळ झाला नाही. पैसे खात्यात भरण्यासाठी 30 डिसेंबर ही अखेरची मुदत आहे. त्यामुळे बँकांमध्ये गर्दी करू नका, असे आवाहन करण्यात आले. या सकारात्मक पुढाकाराचे सर्वांनी स्वागत केले.

बँकांचे व्यवहार सुरळीत होताना इतर माध्यमातून नागरिकांना प्रेरित करून शासकीय देयकांचा भरणा जुन्या नोटांमध्ये करावा, असेही सांगण्यात आले होते. नगरपालिका आणि नगरपंचायती यांना निर्देश देऊन दर तासाला आढावा घेण्यास सुरुवात करण्यात आली.

**खरेदीत १ टक्का सूट**

येथे ज्यांनी रोखरहीत व्यवहार सुरु केले अशांची संख्या वाढत आहे. पे टीएम स्वीकारणारा पानटपरी चालक ते कार्डाव्दारे खरेदीत १ टक्का सूट देणारा मॉल यांना प्रसिद्धी देण्यात आली. असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे बँक खाते उघडण्यासाठी शहरासह विविध तालुक्यांच्या ठिकाणी खास शिबिरे लावण्यात आली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे रोखरहीत महाराष्ट्र करण्याचे आवाहन केले. त्याचवेळी मोठ्या प्रमाणात रोखरहीत गडचिरोली जिल्हा बनवण्याची सुरुवात झाली होती. गडचिरोली आता तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. सोबतच स्मार्टफोन धारकांची संख्या वाढली आहे. या सर्वांना आता मोबाइलवरून व्यवहार करणे शक्य व्हावे यासाठी बँकांच्या सहकार्याने वित्तीय साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

**रोखमुक्त चामोर्शी**

गडचिरोली जिल्हयात चामोर्शी नगरपंचायतच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अर्शिया जुही यांनी पुढाकार घेऊन रोखमुक्त चामोर्शी बनवण्यासाठी कामकाज सुरू केले. यात गावातील प्रत्येक लहान मोठया व्यावसायिकाला पॉईन्ट ऑफ सेल अर्थात यंत्रे उपलब्ध करून देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. उपलब्ध बँकांच्या सहकार्याने ही व्यवस्था उपलब्ध करून दिली जात आहे. यासाठी सर्व व्यापारी तसेच नागरिकांची मोठी कार्यशाळा यासाठी घेण्यात आली. याला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला असून जिल्ह्यात सर्वप्रथम रोखरहीत नगरपंचायत होण्याचा मान मिळावा यासाठी सर्वांनी जोमाने तयारी केली आहे. नगरपंचायत देखील कर वसूलीसाठी कर्मचाऱ्यांना पीओएस देण्यात येणार आहेत. घरोघरी जाऊन क्रेडिट किंवा डेबीट कार्ड स्वाईप करून करवसूली करण्याची सर्व तयारी आता झाली आहे.

बदलत्या काळानुसार बदलता आले पाहिजे. या सकारात्मक भुमिकेतून चालू असलेली रोखरहीत चामोर्शीची वाटचाल सर्वांना नक्कीच पथदर्शी ठरू शकेल अशीच आहे.

**शब्दांकन: प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी
संपर्क: ०९८२३१९९४६६



# सुरक्षेचा मूलमंत्र

आपले जीवन अधिक सुखकर करणारी नवनवीन विद्युत उपकरणे बाजारात उपलब्ध आहेत. या उपकरणांची योग्यरीत्या हाताळणी न केल्यामुळे विद्युत अपघाताने जीवितहानी होण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. विद्युत सुरक्षेविषयी शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ११ ते १७ जानेवारी २०१७ या कालावधीत राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताह राबवला जात आहे.

विजेचे आपल्या जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. विजेशिवाय जनजीवन याची आपण कल्पनादेखील करू शकत नाही. कारण वीज हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. सर्वसामान्य लोकांचे जनजीवन सुरक्षित राहावे, याकरिता वीजेचा सुरक्षितरीत्या वापर होणे अत्यंत आवश्यक आहे. विद्युत सुरक्षिततेचे महत्त्व सर्व स्तरावर तसेच जनमानसात पोहोचवण्याकरिता उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे विद्युत निरीक्षणालय कार्यरत आहे.

### उपकरणांची योग्यरीत्या हाताळणी

विद्युत उपकरणांची योग्यरीत्या हाताळणी न केल्यामुळे विद्युत अपघाताने जीवितहानी होण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १५०० माणसे विद्युत अपघताने दगावतात अथवा जायबंदी होतात. विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागून दरवर्षी कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान होते. विद्युत अपघातामुळे बरीच कुटुंबे उद्ध्वस्त होतात.

वरील घटनांच्या चौकशीत असे आढळून येते की, यातील बहुतेक सर्व अपघातांचे कारण हे अप्रमाणित वीजसंच मांडण्या, शासनमान्य विद्युत ठेकेदार व विद्युत पर्यवेक्षकाकडून वीजसंच मांडणीची उभारणी व देखभाल न करणे, हलक्या दर्जाची वीज उपकरणे वापरणे, कमी खर्चात वीजसंच मांडणी उभारण्याचा मोह व अपुरी चुकीची देखभाल व दुरुस्ती करणे हेच आहे.

### अचूक विद्युत सुरक्षा यंत्रणा

२१ व्या शतकात विद्युत क्षेत्रात आमूलाग्र तांत्रिक बदल घडून आले आहेत. स्वयंचलित व अचूक विद्युत सुरक्षा यंत्रणा निर्माण झाल्या आहेत. तरीसुद्धा विद्युत उपकरणे सुरक्षितपणे हाताळण्याचे अज्ञान, बेफिकिरी अथवा फाजील आत्मविश्वास अथवा अतिउत्साह हे मानवी घटकसुद्धा विद्युत अपघातास तेवढेच कारणीभूत आहेत. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विद्युत सुरक्षिततेबाबत सर्वसामान्य जनतेत जागरूकता निर्माण करण्याच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे मुख्य विद्युत निरीक्षक यांच्यामार्फत जिल्ह्यातील विद्युत निरीक्षक, सर्व विद्युत पुरवठाकार, परवानाधारक, विद्युत ठेकेदार त्यांच्या संघटना संघटना उद्वाहन निर्मिती करणारे उत्पादक, उद् वाहन उभारणी करणारे ठेकेदार, महावितरण, टाटा, बेस्ट, रिलायन्स औद्योगिक प्रतिष्ठान इत्यादींच्या सहभागाने व आर्थिक



सहकार्याने ११ ते १७ जानेवारी २०१७ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत आहे.

प्रत्येक जिल्ह्यात विद्युत निरीक्षणाचे विभागीय कार्यालय आहे. त्यांच्यामार्फत विद्युत कायदा २003 व केंद्रीय विद्युत प्राधिकरण विनियम २०१० यातील तरतूदींचे अनुपालन वीज उपभोक्त्यांनी करून विद्युत अपघात टाळण्यास मदत करणे अपेक्षित आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये विद्युत सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या विद्युत सुरक्षा सप्ताहामागचा प्रमुख उद्देश आहे.

विद्युत उपकरणे हाताळणे वा त्यावर काम करणे हे या क्षेत्रातील निष्णात लोकांचेच काम आहे. कोणीही उठून नळाला पाईप जोडून हवे तिथे पाणी वाहून नेऊ शकतो इतके ते सोपे काम निश्चितच नाही. एखादा

फ्यूज झालेला बल्ब अथवा टयूब नळी बदलणे इतपत ठीक आहे. पण लोक नको त्या धोकादायक पातळीला जाऊन काम करतात आणि त्याचे दुष्परिणाम ओढवून घेतात. तेव्हा ही गोष्ट त्यांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे की तुमच्या चुकीमुळे केवळ तुम्हालाच नाही तर इतरांनाही मोठा धोका होऊ शकतो. आणि प्रसंगी होणारी जिवीत अथवा वित्त हानी ही सर्वस्व उध्वस्त करून टाकणारी असू शकते.

**निष्काळजीपणा नको**

आपल्यातील अनेक लोक अगदी व्यावसायिकसुद्धा विद्युत हाताळणीविषयी निष्काळजीपणाने वागतात असे लक्षात येते. उदा. विद्युत पुरवठा करणारी उपकरणे, वापर, त्यावर असलेला लोड इ. अनेक उदाहरणे दाखवता येतील. जोपर्यन्त हे कामचलाऊ प्रकार टिकतात तोपर्यन्त ठीक असते. पण जेव्हा काही बिघाड होतो तेव्हा निर्माण होणारा धोका हा वाचवलेला वेळ, पैसा आणि श्रम यांच्यापेक्षा कितीतरी पटीने मोठा आसतो. किंबहुना परत कधीही भरून निघणार नाही असे भयंकर परिणाम असू शकतात. म्हणजे विजेविषयी अज्ञान असणे ही गोष्ट जितकी भयानक आहे. त्याहीपेक्षा ज्ञान असूनही निष्काळजीपणा, फाजील आत्मविश्वास दाखवणे अधिक भयंकर म्हटले पाहिजे. या बाबतीत सर्व स्तरांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यामागच्या उद्दिष्टांपैकी एक आहे.

**अतिउत्साह नको**

अनेक लोक विद्युत उपकरणे हाताळताना दाखवतात आणि त्यामुळे अपघात घडतात आणि यांचे प्रमाण आज इतके वाढले आहे की, या बाबतीत खरंच लोकांना पुन्हापुन्हा जागृत करणे ही अत्यावश्यक बाब होऊन बसली आहे. या अतिउत्साहात अगदी निष्णात लोकदेखील हातात रबरी ग्लोव्हज घालणे, पायात सेफ्टी शूज वापरणे, इतकेच काय तर विद्युत पुरवठा बंद करून मग काम करणे इतके छोटे उपायसुद्धा करत नसल्याने जीवितहानी झाल्याची अनेक उदाहरणे दिसून येतात.

## सावधगिरी



सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केंद्रीय विद्युत नियम हे उपभोक्त्याच्या वायरिंगचे नियंत्रण व सुरक्षा यासाठी बनविले आहेत. यासाठी उपभोक्त्याने आपल्या विद्युतसंच मांडणीसाठी भारतीय मानक संस्थेने (आयएसआय) प्रमाणित केलेले साहित्य व दर्जा नियंत्रण मंडळाने प्रमाणित केलेली घरगुती विद्युत उपकरणे वापरावीत. कृषी, वाणिज्य, औद्योगिक विद्युतसंच मांडणीची संकल्पचित्र उभारणी व चाचणी ही कामे शासन मान्यताप्राप्त अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदारांकडून करून घेणे बंधनकारक आहे. विद्युत कायदा २००३ व केंद्रीय विद्युत प्राधिकरण विनियम २०१० नुसार १५ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतीच्या नवीन वायरिंगचे निरीक्षण व परवानगी, नवीन उच्चदाब, अती-उच्चदाब, जनित्र विद्युतसंच मांडणीचे विद्युत निरीक्षण विभागातर्फे करून घेणे, परवानगी घेणे आणि आपले वायरिंग सुरक्षित असल्याची खात्री करून घेणे बंधनकारक असून जबाबदारीदेखील आहे. या विद्युत नियमानुसार वाणिज्य, मध्यमदाब, जनित्रसंच, उच्चदाब आणि अति उच्चदाब या प्रकारच्या वीजसंच मांडण्याचे, विद्युत निरीक्षकांमार्फत दरवर्षी निरीक्षण करून घेणे आणि वायरिंग निर्धोक असल्याची खात्री करून घेणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

**निर्देशांचे पालन**

प्रत्येक विद्युत संच मांडणीचे संकल्पचित्र, ज्यामध्ये सर्व तांत्रिक बाबी, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नियंत्रण, सुरक्षेची योग्य व्यवस्था व वायरिंगवर योग्य भार (लोड) जोडणी, याचा विचार केल्यास त्यायोगे अतिभारामुळे होणारे धोके, स्पार्कींग होऊन आग लागणे, वायरींग नादुरुस्त झाल्याने काम बंद पडणे हे प्रभावीपणे व यशस्वीरित्या टाळता येईल. त्याचप्रमाणे ई.एल.सी.बी./एम. सी.बी. सारखी सुरक्षिततेची साधने सर्वसाधारण वायरिंगवर वापरून होणारे नुकसान टाळता येईल.

**सुरक्षा सप्ताहाचे महत्त्व**

या विद्युत सुरक्षा सप्ताहात मुख्यत्वे विद्युत संच मांडणी सुरक्षित ठेवण्यासाठी काय करावे, काय करू नये, विद्युत उपकरणे हाताळणीबाबत, उदवाहनांचा सुरक्षित वापर करण्याबद्दलचे निकष, सुरक्षेच्या बाबी लक्षात घेऊन बनवले गेलेले नियम, गुणवत्ता, प्रशिक्षण, मार्गदर्शन, नियम न पाळल्यास होऊ शकणारी कारवाई अशा अनेक गोष्टींबाबत प्रबोधन केले जाणार आहे. पथनाट्य, चर्चासत्रे, बॅनर, रॅली, होर्डिंग्ज, विविध प्रचार माध्यमांचा वापर जनजागृती केली जाणार आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अपघातांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भागात जनजागृती केली जाणार आहे. प्रत्येकाने 'नियम व निकष पाळा आणि विद्युत अपघात टाळा' हाच सुरक्षेचा मूलमंत्र जपावा!

**– सुहास बागड**
मुख्य विद्युत निरीक्षक
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई

# शूरता आणि सुप्रशासनाचे प्रेरणास्थळ

अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे भूमिपूजन व जलपूजन, मेट्रो २ बी - डीएन नगर-वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स-मानखुर्द, मेट्रो ४- वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, कुर्ला-वाकोला उन्नत रोड, कलानगर जंक्शन उड्डाणपूल, एमयुटीपी-३ या प्रकल्पांच्या कामांचे भूमिपूजन नुकतेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. याशिवाय भारतीय रेल्वेसोबत ५५ हजार कोटी रुपयांचे दोन सामंजस्य करार करण्यात आले.



अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे जलपूजन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेच्या कल्याणाकरिता आपले जीवन समर्पित केले. त्यापासून सामान्यांना प्रेरणा मिळावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक मुंबईच्या अरबी समुद्रात उभारण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुशासनाची परंपरा पुढे नेली, त्याच धर्तीवर सामान्य माणसाचा विकास हाच केंद्रबिंदू मानून, केंद्र व राज्य शासनातर्फे विकासाच्या योजना सुरू करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मुंबईमध्ये १ लाख ६ हजार कोटी रुपयांचे विकास प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या वेळी पार पडलेल्या कार्यक्रमात केले.

### उत्कृष्ट प्रशासक

प्रधानमंत्री या कार्यक्रमात आपल्या मनोगतात म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांच्या अनेक पैलूंचा भारतीयांच्या जीवनावर प्रभाव दिसून येतो. संघर्षातून त्यांनी सुशासनाची उत्तम परंपरा पुढे नेली. ते पराक्रमी होते. उत्तम संघटनकौशल्य त्यांच्याकडे होते. जलव्यवस्थापनाचे त्यांनी घालून दिलेले आदर्श आजही सर्वांना मार्गदर्शक आहेत. जागतिक स्तरावर सागरी सुरक्षेला खूप महत्त्व दिले जात आहे. मात्र शेकडो वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी सुरक्षेसाठी स्वत:चे आरमार उभारले. यातूनच त्यांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाची आपल्याला ओळख होते.'

जगभरात पर्यटनासाठी अनेक आदर्शवत अशी प्रतीके निर्माण झाली आहेत. त्यामुळे त्या त्या देशांची ही प्रतीके ओळख बनली आहेत. जागतिकस्तरावर नोंद घेण्याजोगी अनेक पर्यटनस्थळे भारताच्या कान्याकोपऱ्यात आहेत. जगभरात पर्यटन व्यवसायाला आलेले




अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे भूमिपूजन व जलपूजन, मेट्रो-२ब, मेट्रो-४, एमटीएचएल, कुर्ला-वाकोला उन्नत मार्ग, एमयुटीपी-३ व कलानगर जंक्शन उड्डाणपुलांच्या कामांचे भूमिपूजन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यानिमित्त वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मैदानावर झालेल्या जाहीर सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि जलवाहतूक मंत्री नितीन गडकरी, रेल्वे मंत्री सुरेश प्रभू, नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू, राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, भाजप प्रदेशाध्यक्ष खासदार रावसाहेब दानवे आदी मान्यवर उपस्थित होते.

महत्त्व लक्षात घेता भारतातही साहसी पर्यटनाला चालना देण्याकरिता केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून देशातील गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करण्यात येईल. त्याची सुरुवात महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांपासून करू, असे प्रधानमंत्री या वेळी म्हणाले.

**प्रेरणास्थळ**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकाच्या कामास जानेवारी २०१७ मध्ये सुरुवात होणार आहे. ३५२ वर्षांपूर्वी याच महिन्यात याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याचे जलपूजन केले होते. आता याच दिवशी आपण अरबी समुद्रात शिवछत्रपतींच्या स्मारकाचे जलपूजन केले आहे.

अमेरिका देश 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी'मुळे ओळखला जातो. यापुढे भारत देशही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकामुळे ओळखला जाईल. या स्मारकापासून शूरता आणि सुप्रशासनाची प्रेरणा मिळेल. महाराजांच्या स्वप्नातील महाराष्ट्र बनण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.

– टीम लोकराज्य




पुणे मेट्रो प्रकल्प भूमिपूजनप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि जलवाहतूक मंत्री नितीन गडकरी, नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू, मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट, ज्येष्ठ नेते व खासदार शरद पवार, खासदार अनिल शिरोळे आदी मान्यवर.

लोकराज्यच्या प्रत्येक अंकातून माझ्यासारख्या युवकांना सदैव प्रेरणा मिळते.

**– चेतन सोनुले, नांदेड**

लोकराज्यचा डिसेंबरचा अंक ज्ञानात भर घालणारा आहे. या अंकातून अधिवेशनविषयक व संसदीय कामकाजाबाबतच्या माहितीचा अनमोल खजिना सर्वांपर्यंत पोहोचला. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा खूप फायदा होईल.

**– तानाजी काळे, माढा, सोलापूर**

लोकराज्य ग्रामीण भागातील जनतेपर्यंत शासनाला पोहोचवते.

**– धनाजी जाधव, घोडेश्वर, मोहोळ, सोलापूर**

'लोकराज्य'च्या माध्यमातून सरकारच्या नवीन योजना, आराखडे तसेच सर्व प्रकारचे निर्णय याविषयीची सर्व माहिती मिळते.

**– आनंद पोहेकर, अंबा कॉलनी, अमरावती**

लोकराज्यचे उत्कृष्ट सादरीकरण आणि अभ्यासपूर्ण लेख संग्रहात्मक असतात.

**– सतीश नाईक, आंबोडा, नांदुरा, बुलढाणा**

सर्व चालू घडामोडी लोकराज्यमधून यथारूप समजतात. लोकराज्य वाचून खूप आनंद मिळतो व ज्ञानात भर पडते.

**– समाधान कुटे, नांदुरा, बुलडाणा**

लोकराज्यच्या नोव्हेंबर २०१६ च्या निवडणूक विशेषांकाच्या माध्यमातून आपल्या देशातील लोकशाही प्रणालीत, सामान्य नागरिकांच्या मतामध्ये अंतर्भूत अपार शक्तीची अत्यंत प्रभावीरीत्या व योग्यप्रकारे समीक्षा करण्यात आली आहे. हा अंक अप्रतिम दर्जाचा आहे.

**– अनुप कुमार, विभागीय आयुक्त, नागपूर**

### –: आपली पत्रे मिळाली :–

- दीपक सातोरे, नांदेड,
- हाजी जे.एस.शिकलकर, सोलापूर
- मधुकर धोंडोपंत जोशी, नांदेड
- च.य.बिराजदार, केगाव, अक्कलकोट
- संतोष केगार, साकूर, अहमदनगर
- अनंत सुनार, चिपळून,रत्नागिरी
- ग्वालदास आचार्य, हिंगणघाट,वर्धा
- गोपाळ परब, बोर्ले, कर्जत, रायगड
- काशीराव राऊत, कुसमकोट
- सोयसे सागर निनू
- शैलेंद्र चौधरी पाटील, सोलापूर
- प्रा. दिनेश कोटांगले, नागपूर
- रवी तायडे, खामगाव, बुलडाणा
- हरिभाऊ नातू, पंढरपूर
- प्रा. किरण बडगुजर, अकुलखेडे, जळगाव
- एम.बी. बसरे, कोल्हापूर
- अशोक परब, सावरकर नगर, ठाणे
- दे.ना. जोशी, चिखली, बुलढाणा
- प्रकाश पवार, खुंटेवाडी, देवळा, नाशिक
- प्रा. सचिन पुजारी, कुंभारगाव, सातारा




### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr
लाइक करा...YouTube/MaharashtraDGIPR

### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.
(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

वेगवान...
# महामुंबई

मुंबईतील प्रवासी वाहतूक क्षमता होणार दुप्पट!

मुंबईकरांचा प्रवास होणार.... अधिक जलद आणि सुखद !

मुंबई मेट्रो
एमएमआरडीए
Mumbai Metro
MMRDA
मुंबईची स्वप्न रेषा



मेट्रो मार्ग २ मेट्रो मार्ग ४
मुंबई पारबंदर प्रकल्प (एमटीएचएल)
कुर्ला-वाकोला उन्नत मार्ग
या प्रकल्पांचे भूमिपूजन
शुभहस्ते
**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री





**मेट्रो मार्ग २**
डी.एन.नगर-वांद्रे-कुर्ला संकुल-मानखुर्द
**मेट्रो मार्ग ४**
वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली

**मुंबई पारबंदर प्रकल्प**
शिवडी ते न्हावाशेवा

**शनिवार, दि. २४ डिसेंबर २०१६**
**एम.एम.आर.डी.ए. मैदान,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई**



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१
Tel. : 2659 1234 I Fax : 2659 1112

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th January 2017
Date of Publication : 10th of every Month




प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

प्रवीण टाके
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह